
# जय जय रघुवीर समर्थ



स. कृ. जोशी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. ७५८२

REFBK-0014364



अभिनव
स्वस्त पुस्तक योजना
प्रकाशन पांचवें



# जय जय रघुवीर समर्थ

कृ. जोशी

REFBK-0014364

जयहिंद प्रकाशन
... वाडी मुंबई २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८३२८ वि: निबंध
क्रमांक १९०२ ता. दि: १२.३.६५

मूल्य : चार रुपये

▭ मुखपृष्ठ
स. कृ. काळे

▭ आंतील रेखाचित्रें
रा म कृ ष्ण का रे क र

▭ मुद्रक
व्ही. बी. खळे
जय गुजरात प्रिंटिंग प्रेस
व्हिक्टोरिया मिल्स कंपाउंड
गां व दे वी – मुं ब ई ७

▭ प्रकाशक
गजानन काशिनाथ रायकर
झावबाची वाडी – मुंबई २

▭ विक्रेते
ज य हिं द प्र का श न
झावबाची वाडी, मुंबई २

▭ मूल्य
चार रुपये

© सौ. कुसुमावती जोशी

▭ प्रथमावृत्ति
दासनवमी – शके १८८७
२४ फेब्रुवारी १९६५

# प्रस्तावना

स्वतः आत्मज्ञानसंपन्न होऊन भागवतधर्माचा प्रसार करण्यांत ज्या थोर महाराष्ट्रीय संतांनीं आपलें जीवन वालविलें त्यांपैकीं श्रीसमर्थ रामदासस्वामी हे एक अलौकिक पुरुष होऊन गेले. व्यक्ति आणि समाज भगवंताच्या मार्गाला लावणें म्हणजे भागवतधर्माचें आचरण करण्यास शिकविणें होय. भगवंताचा मार्ग हा बलहीनांचा मार्ग नव्हे. त्या मार्गावर चालण्यास व्यक्ति आणि समाज शरीरानें, मनानें, बुद्धीनें आणि संघटनेनें सामर्थ्यसंपन्न बनावा लागतो. श्रीसमर्थांचें चरित्र म्हणजे या सामर्थ्याचा साक्षात् परिचय होय. श्री. जोशी यांनीं लिहिलेल्या श्रीसमर्थचरित्रावरून समर्थांच्या बलसंपन्न पण भक्तिमान आणि लोकसंग्रही व्यक्तिमत्वाचा उत्तम ठसा वाचकाच्या मनावर उमटतो. श्री. जोशी यांनीं श्री समर्थांच्या वाङ्मयाचा मनापासून परिचय करून घेतल्यानें चरित्र लिहितांना ते त्या त्या प्रसंगाशीं अगदीं तद्रूप झाल्याप्रमाणें वाटतात. आणि यामधेंच त्यांच्या ओघवती लेखमालेचें वैशिष्ट्य आहे असें मला निश्चितपणें वाटतें. श्रीसमर्थ प्रथम भक्त आणि मग इतर सर्व कांहीं होते ही गोष्ट श्री. जोशी यांच्या बरोबर ध्यानांत आल्यानें कोणताहि प्रसंग वर्णन करतांना घटनेंतील रसहानि होत नाहीं. आपल्याभोंवतीं पसरलेल्या दीन समाजाच्या उद्धाराची तळमळ श्रीसमर्थांना किती लागलेली होती याची कल्पना लेखकाला आहे. म्हणून चरित्रामधील अनेक नाट्यपूर्ण प्रसंग वर्णन करतांना ( पाल्हाळ न होऊं देतां ) श्री समर्थांचें व्यक्तिमत्व आपल्यापुढें उभें करण्याचा श्री. जोशी यांचा प्रयत्न दिसतो आणि तो उत्तम प्रकारें यशस्वी झाला आहे यांत शंका नाहीं. श्री. जोशी यांचें हें श्रीसमर्थचरित्र वाचून समर्थवाङ्मय परिशीलन करण्याची बुद्धि वाचकांना होवो अशी इच्छा मी प्रकट करतों. आत्मबल, प्रज्ञाबल, मनोबल, ऐश्वर्यबल, ऐक्यबल

आणि शरीरबल – अशा सर्व प्रकारच्या बलांची योग्य प्रमाणांत धारणा साधून प्रथम या जगांतील आणि नंतर परलोकांतील मानवीजीवन अत्यंत समृद्धपणें व ऐटीनें जगणें हें माणसाचें खरें काम आहे असा श्री समर्थ वाङ्मयाचा भावार्थ आहे. सध्यांच्या कालीं त्या वाङ्मयाच्या अभ्यासाची किती जरूर आहे हें सांगणें नको. श्री. जोशी यांच्या श्रमाचें चीज श्री समर्थ करतील यांत शंका नाहीं.

—प्रा. के. बि. बेलसरे

# लेखकाचे दोन शब्द

'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' हें माझें पहिलें पुस्तक. एका वर्षांत त्याची दुसरी आवृत्ति निघाली. त्यामुळें संतवाङ्मय लिहिण्यास हुरूप आला. संतांना वाट पुशीत त्यांच्या अभंग वाङ्मयाशीं मी ओळख करून घेतली. संतांनीं मला 'अमृताची पाऊलवाट' दाखविली. त्या वाटेवरून जातांना अनेक दिंड्या लागल्या. माझी चाल 'पंढरपुरा नेईन गुढी' पर्यंत गेली. 'तुका झालासे कळस' उभारला. 'भक्तीच्या कवाडांतून' 'कळसाची चमक" पाहिली. 'स्वकरें चंदन घाशी'त बसलेल्या श्रीखंडयाचेंहि दर्शन झालें. 'भक्तीचा सुंगध' सुटला.

आणि आतां—

ज्या सज्जनगडाच्या दरवाजांतून साक्षात् ऐश्वर्य डोकावीत आहे, त्या दरवाजांत उभे राहून तृप्त मनानें मी 'जयजय रघुवीर समर्थ' ही समर्थांना साद घालीत आहे.

ज्ञानदेवांनीं भागवत धर्माचा पाया घातला. तुका त्यावर कळस झाला. निळोबा ही त्या कळसाची चमक! आणि त्याच देवयानी पंथांतले श्रीसद्गुरु समर्थ रामदास हे शेवटचे संत! भागवतधर्म आणि रामदासीपंथ हे दोघेहि देवयानी पंथ आहेत. त्यांच्या प्रकृतींत फरक दिसला तरी त्यांच्या तत्त्वज्ञानांत फरक नाहीं. सांप्रदायिक आचार भिन्न दिसले तरी विचारांत भिन्नता नाहीं. ज्ञानाचें एक पूर्ण विकसित कमळ आळंदीच्या इंद्रायणींत उमललें, तर दुसरें कर्मयोगाचें परिपक्व फळ जांबेच्या परिसांत प्रगट झालें. दोघांच्याहि व्यक्तित्वानें महाराष्ट्र मोहीत झाला आहे. त्यांच्या प्रभावी वाङ्मयानें तो पुरा वेडावला आहे. त्यांच्या चरित्रानें नि चारित्र्यानें तो भारावला आहे. दोघांच्या भक्तितत्त्वज्ञानावर महाराष्ट्र पोसला आहे. ज्ञानी नि विरागी अशा ह्या संतांकडून महाराष्ट्राला बुद्धिशक्तीचा वारसा मिळाल्यामुळें आपण गर्भश्रीमंत झालों आहोंत. आपल्याला कधीं कमी पडणार नाहीं. फक्त करंटेपणानें आपण पंथभेद मानला नाहीं म्हणजे झालें.

आभार तरी कुणाचे मानावे? सर्वच आपले! प्रकाशक नि वाचकहि. तरीसुद्धां रसिक वाचकांचे आणि माझे प्रकाशक मित्र श्री. ग. का. रायकर ह्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानायलाच हवेत.

माझे तरुण कवि मित्र श्री. मधुकर जोशी ह्यांनीं आपलें ‘जय जय रघुवीर समर्थ’ हें काव्य ह्या पुस्तकांत घालण्यास परवानगी दिली म्हणून त्यांचे आभार मानतों. ‘भक्तीचें कवाड’ ह्या माझ्या पुस्तकांतली काव्य-सुमनेंहि ह्या रसिक कवीचींच.

सर्वसमर्थ चरित्रकार नि रियासतकार श्री. गो. स. सरदेसाई ह्यांच्या पुस्तकांनींहि मार्गदर्शन केलें.

‘ताटी उघडा ज्ञानेश्वरा’ ह्या पुस्तकापासून ‘जय जय रघुवीर समर्थ’ ह्या पुस्तकापर्यंत, ज्ञानदेवापासून रामदासापर्यंत झालेल्या महाराष्ट्रांतल्या सर्व संतांचा, संतवाङ्मयाचा, संतक्षेत्राचा परिचय करून देण्याचा जो कांहीं संकल्प मी केला होता तो केवळ वाचकांच्या प्रेमामुळेंच पार पाडतां आला. हें पुस्तक वाचकांच्या हातीं देऊन मी रसिकांच्या ऋणांतून मुक्त झाल्याचें मला समाधान वाटत आहे.

माझ्या रसिक वाचकांना शतशः धन्यवाद !

जय जय रघुवीर समर्थ !!!

कृष्णस्मृति, डोंबिवली. —स. कृ. जोशी

“ आधीं प्रपंच करावा नेटका ” ह्या समर्थांच्या
उक्तिप्रमाणें ज्यांनीं प्रपंच नेटका करून परमार्थ
साधला ते माझे श्वशुर
कै. आप्पाजी निमगांवकर
यांस
सविनय सादर समर्पण

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों दि ........................

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ......................

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठा. क्र. .......

# जांबेची रामकथा

जांबेच्या देवळांत रामजन्माची कथा रंगांत आली होती. उपरण्यानें डोक्यावरचा घाम पुशीत कथेकरीबुवा अयोध्या नगरींत दशरथाघरीं उडालेल्या धांवपळीचें वर्णन करीत होते. रामजन्माची घटका जवळ जवळ येत चालली होती. हातांत फुलं, गुलाल घेऊन लोक पाळण्याच्या दिशेनें रेटारेटी करीत होते. बुवांनीं राम जन्मल्याचें जाहीर केलें नि सगळीकडे गुलालाची उधळण झाली. रामाच्या जयजयकारांत पाळणा हलूं लागला. सुहासिनी मधुर गळ्यानें गाऊं लागल्या. सूर्याजीपंत मनानें अयोध्येंत वावरत होते. पाळण्यांतल्या रामाकडे ते भावपूर्ण अंतःकरणानें बघत होते. मन भारावलें होतें, डोळे पाणावले होते. स्वतःला ते विसरून गेले होते. इतक्यांत घरून निरोप आला. राणूबाई प्रसूत झाल्या. पुत्ररत्न झालें. घर, दार, गांव, सारी पंचक्रोशी रामनामानें दुमदुमली असतां सूर्याजीपंतांना मुलगा झाला. रामजन्माच्या दिवशींच जांबेला ठोसरांच्या घरीं एक कौतुक जन्माला आलें.

शके १५३० कीलकनाम संवत्सरीं चैत्र शुद्ध नवमी. भर दुपारीं बारा वाजतां बरोबर रामजन्माच्या वेळींच जांबेस एक रामभक्त जन्माला आला. त्याच दिवशीं जन्म घेऊन नारायणानें आपलें नि रामाचें नातें जन्मतःच जाहीर केलें.

सूर्याजीपंत मोठे कडक. सूर्योदयापूर्वीं स्नान, संध्या, पूजा, १०८ नमस्कार झालेच पाहिजेत. जन्मभर रामाची नि सूर्यनारायणाची सेवा केलेली. दुसरा मुलगा म्हणजे सूर्यनारायणाचाच प्रसाद समजून त्यांनीं त्याचें नांव नारायण ठेवलें.

नारायण मोठा होऊं लागला तशा खोड्या वाढूं लागल्या. घटकाभर म्हणून घरांत नसायचा. नित्यनव्या तक्रारी येऊं लागल्या. नारायणाच्या तक्रारीशिवाय जांबेचा सूर्य जणूं मावळेनासा झाला.

* * *

झाडाचीं पांच पानं गळावीत तशीं नियतीनें पांच वर्षे उलटविलीं. नारायण पांच वर्षांचा झाला. सूर्याजीपंत ठोसरांच्या घरीं सनई वाजत होती. शेंडी ठेवलेला नारायण राणुबाईच्या पानांत मातृभोजन करीत होता. "तुझ्या मांडींत बेटकुळी घालणार" म्हणून मुलं त्याला चिडवीत होतीं. सुवासिनींची धांवपळ चालली होती. उष्टीं खरकटीं ह्यांत दिवस हां हां म्हणतां सरला. रात्रीं रामाच्या देवळांत भिक्षावळ जाऊन आली. उपाध्ये घरीं जातांना नारायणाला जवळ घेऊन म्हणाले,

"नारायणा, संध्या नीट करीत जा हो."

"करीन."

"चांगलें वागायचें."

"नीट वागेन मी."

"सोडमुंज होईपर्यंत झाडावर चढायचें नाहीं हं."

"नाहीं चढणार."

मध्येंच सूर्याजीपंत म्हणाले, "नमस्कार घालीन म्हणून कबूल करून घ्या त्याच्याकडून."

"घालीन घालीन – चांगले शंभर नमस्कार घालीन मी –" छोटा नारायण गाल फुगवून दंडांतली बेटकुळी दाखवूं लागला; तेव्हां सारेजण हंसू लागले.

त्याला जवळ घेत गुरुजींनीं त्याच्या मस्तकाचें चुंबन घेतलें व जातांना त्याला आशीर्वाद दिला, "औक्षवंत हो!"

मौंजीबंधन झाल्यावर मुलाला देवाच्या दर्शनाला न्यावं म्हणून नारायणाला नि थोरल्या गंगाधराला घेऊन सूर्याजीपंत पैठणास गेले श्री एकनाथांच्या दर्शनाला. कारण संत तोचि देव! पैठण म्हणजे महाराष्ट्राची काशी. गोदाकांठ म्हणजे गंगाकांठ, नि नाथांसारखा पुण्यपुरुष म्हणजे प्रत्यक्ष काशीविश्वेश्वर. त्यांच्या दर्शनानें नारायण कृतार्थ झाला. नाथांच्या कृपाशीर्वादानें तो पावन

झाला. जांबेला येऊन मोठ्या उत्साहानें तो अभ्यास करूं लागला. अभ्यास नि खोड्या पण !

बालपणापासूनच नारायण भारी हूड, आनंदी नि निर्भयवृत्तीचा. झाडावरच्या चिंचा जशा तो अचूक पाडी तशीच आतां गणितेंहि तो अचूक सोडवूं लागला होता. बुद्धि अगदीं एकपाठी; त्यामुळें अल्पावकाशांतच त्यानें लेखन, वाचन संपविलें. संस्कृताचें नि ब्रह्मविद्येचें अध्ययन केलें. नारायणाचें शरीर मुळांतच चपळ, सोशीक नि आरोग्याचें निधान होतें. त्यांत नमस्कारांची भर पडली. बुद्धीबरोबर शरीरहि आकार घेऊं लागलें. नारायणाचें घर म्हणजे एक तपोभूमीच होती !

नारायण दिवसेंदिवस चंद्रासारखा वाढत होता, खोड्या वाढत होत्या. अवघड झाडांच्या शेंड्यावर चढून बसावें, भरल्या विहिरींत उडी ठोकावी. राणुबाईंना काळजी वाटायची. पण गम्मत अशी की प्रहरोप्रहर पाण्यांत डुंबत राहिलें तरी नारायणाचें शरीर थकत नसे, कीं त्याला पडसं, खोकला येत नसे. खेळण्या–बागडण्यांत नि विद्याभ्यासांत त्याचे दिवस मजेंत चालले होते.

★ ★ ★

# चिंता करतो विश्वाची

शके १५३७ उजाडलं. नारायणानें वडिलांबरोबर नव्या वर्षाची गुढी उभारली. वाऱ्यानें पुस्तकाचीं पानें फडफडत उलटावीत तसें नव्या वर्षाचे दिवस गेले. मार्गशीर्ष शुद्ध नवमी आली. सूर्याजीपंत आतां थकले होते. कालपुरुषानें आपली मूठ उघडली नि काळें भविष्य बाहेर पडलें. पंतांना मृत्यूची चाहूल लागली. गंगाधराला जवळ बोलावून त्यांनीं अवखळ नारायणाची काळजी घेण्यास सांगितलें. शेवटचे शब्द अस्पष्ट झाले. सूर्याजीपंत इहलोक सोडून गेले. राणुबाईवर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. नारायण पोरका झाला. सूर्याजीपंत गेले नि अनुग्रह देण्याचें राहून गेलें. गंगाधरावरची जबाबदारी वाढली. आतां तो श्रेष्ठी झाला. वडिलांचें कुळकर्णीपण सांभाळूं लागला. आल्यागेल्याला अनुग्रह देऊं लागला.

एक दिवस वडीलबंधु गंगाधर कुणास अनुग्रह देत असतां नारायण तेथें जाऊन उभा राहिला. गंगाधर कडाडले,

" इथं कां उभा राहिलास तूं ? "

" आज मलाहि अनुग्रह द्या. "

" अनुग्रह म्हणजे रे काय ? " श्रेष्ठीनें कौतुकानें विचारलें.

" मला नाहीं माहीत. " त्यानेंहि बालभावानें चटकन उत्तर दिलें.

" आम्हीं तुम्हांला अनुग्रह नाहीं, पण खाऊ देणार आहोंत आज. "

" मला नको खाऊ, मला राम दाखवा. मला मारुति दाखवा. "

" दाखवूं, दाखवूं बरं, पण अजून तूं लहान आहेस. "

" मग लहान मुलांना काय देव दिसत नाहीं ? "

" असं नाहीं कांहीं. पण आतां आम्हीं कामांत आहोंत. मारुतीच्या देवळांत जा बघूं तूं. "

नारायण रागावून मारुतीच्या देवळांत गेला.

* * *

नारायण अलीकडे उदास दिसत होता. दिवसेंदिवस अधिकच उदास होत होता. दिवसभर तो बाहेरच असायचा. वडील गेले नि मंत्र देण्याचें राहून गेलें म्हणून त्याला चुटपुट लागली. तो विचार करायचा. दिवसभर बाहेरच असायचा. पोराकडे पाहून राणुबाईच्या पोटांत तुटायचें. एक दिवस नारायणाला जवळ घेत त्या म्हणाल्या —

" नारायणा ! "

" काय ग आई ? "

" गंगाधर तुझ्यापेक्षां तीनच वर्षांनीं मोठा. कुळकर्णीपणाचें काम त्याला पहावें लागतें, घरकामांत तूंहि थोडं लक्ष घालीत जा. आपल्या प्रपंचाची थोडी तरी काळजी घ्यावी. "

" आतां घेईन हो मी काळजी. "

" शहाणं आहे माझं बाळ ! "

नारायण निघून गेला नि राणुबाईनीं सुस्कारा सोडला, पण संध्याकाळ झाली तरी हें शहाणें बाळ घरीं आलें नाहीं. घरांत शोधाशोध सुरू झाली. श्रेष्ठी शोधूं लागले. राणुबाई शोधूं लागल्या. राणुबाईना वाटलें, सकाळीं आपण नारायणाला बोललों त्याचा तर राग नाहीं ना आला त्याला ? म्हणून " नारायणा, अरे नारायणा ! " — राणुबाई आर्ततेनें हांक मारूं लागल्या. ती आर्त हांक संध्याकाळचा काळोख कापीत अडगळीच्या खोलींत गेली— " नारायणा, अरे नारायणा, कुठें आहेस रे तूं ? "

" आई, हा बघ मी इथं आहे. "

आवाजाच्या रोखानं राणुबाई अडगळीच्या खोलींत गेल्या. नारायण अडगळीच्या खोलींत ध्यानस्थ बसला होता. त्याच्या डोक्याला जाळींजळमटं चिकटलीं होतीं. आईनें काळजी करायला सांगितलें होतें प्रपंचाची नि नारायण अडगळीच्या खोलींत काळजी करीत बसला होता विश्वाची ! त्याचा अवतार पाहून राणुबाईना हंसू आलें. कौतुकानं त्यांनीं विचारलें.

“ इथं रे काय करीत होतास, नारायणा ? ”


“ आई, चिंता करीत होतों विश्वाची ! ”

“ काय म्हणालास ? ”

“ चिंता करीत होतों विश्वाची ! ”

“ विश्वाची ? ”

“ हो, हो विश्वाची ! ”



“ कुणी सांगितले तुला हे उद्योग ? ”

“ तूंच सांगितलेस. ”

“ पुरे पुरे, चल आतां. दिवेलागणी झाली. ”

“ आई चिंता करतों विश्वाची ! ”

“ अरे, असें अंधारांत बसून का कोणी विश्वाची चिंता करतो ? ” नारायण आईच्या मागें निघाला. जांबेतल्या ठोसरांच्या वास्तूनें त्या बालकाची वाणी ऐकली, “ आई, चिंता करतों विश्वाची ! ” – आणि ती वास्तु थरारून गेली.

त्या रात्रीं श्रावणाचा पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. आकाशांत विजांनीं थैमान घातलें होतें; गडगडाटांनीं कानठळ्या बसत होत्या. निसर्गा-प्रमाणें नारायणाच्या चित्तालाहि स्वस्थता नव्हती. अंथरुणांतून उठून खिडकींतून त्यानें बाहेर पाहिलें. सगळीकडे अंधार होता. बराच वेळ तो पहात होता. एक मोठा विजेचा लोळ खालीं आला. नारायणाचे डोळे दिपून गेले. त्याला मार्ग दिसूं लागला. अंतःकरणाची तळमळ शिगेला पोहोंचली. राणुबाई नि श्रेष्ठी शांत झोपले होते. दाराची कडी काढून एवढ्या मध्यरात्रीं नारायण मारुतीच्या देवळाची वाट चालूं लागला. मोक्षाच्या मार्गांत शेवटीं हनुमंतच त्याचा वाटाड्या झाला. मारुतीच्या देवळांत जाऊन त्यानें करुणा भाकली. ती सुफलित झाली. मारुतीचें देऊळ तेजानें नहात होतें. जांबेच्या झाडांवर नारायणानें वानरें पाहिलीं होतीं. तसाच एक वानर त्याला शिळा-मारुतीच्या जागेवर दिसला. अगदीं तसाच वानर ! पण किती तेजस्वी ! ! बाहुबलाढ्य ! ! ! मूर्तिमंत शक्तीच जणूं नारायणानें पाहिली. ती सेवाशक्ति प्रभु रामचंद्रापुढें हात जोडून उभी होती. तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध अष्टमी शके १५३८.

रामानें केलेला अनुग्रह नारायणानें कस्तुरीसारखा जपून ठेवला. पण त्याचा दरवळ सुटायचा राहिला नाहीं. तें श्रेष्ठींना समजलें, त्याच्या मातेला समजलें, साऱ्या जांबेला समजलें. रामप्रभूचें दर्शन झाल्यामुळें त्याचा काया-पालट झाला. बोलणें कमी झालें. खेळांत गोडी वाटेनाशी झाली. अंगचा हूडपणा नाहींसा होऊन मन विचारमग्न झालें. खऱ्या सुखाची ओढ लागली. अवीट गोष्टींत मन रंगून गेलें. वाटेंतून जातां येतां मिळालेला अमृतमंत्र तो जपूं लागला.

“ श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम ”

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों दि ........................

# शुभलग्न सावधान !

आईला वाटलें, मुलगा सुधारला. त्याचे दोनाचे चार हात करावेत. घरांत दुसरी सून आणावी. सारें जांब आतां नारायणाच्या लग्नाच्या गोष्टी बोलूं लागलें. रस्त्यानें जातांना एक दिवस नारायणाच्या सवंगड्यांनीं त्याला हटकलें देखील —

" नारायण — "

" काय रे गोपाळ ? "

" तुझें लग्न होणार ! खरें का रे ? "

" मला नाहीं माहीत ! "

नारायणाचें उत्तर ऐकून मित्रमंडळी हंसूं लागली. नारायणानें चिडून विचारलें —

" हंसायला रे काय झालें तुम्हांला ? "

" आतां काय बुवा ! थाट आहे तुझा ! " गोपाळ तोंडाचा चंबू करीत म्हणाला.

" ए, आसनगांवची सासुरवाडी बरं का " – माधवानें री ओढली.

नारायण रागारागानें पहात होता तरी एक वात्रट पोर म्हणालें —

" आसनगांवच्या भानाजीपंतांचं उंसाचं गुऱ्हाळ आहे बरें कां रे ! "

" आम्हीं येणार बुवा जांवयाबरोबर रस प्यायला " – सगळ्यांनीं एक सूर काढला तेव्हां नारायण रागावला. पाय आपटीतच तो तेथून निघून गेला.

नारायण अंगणांत आला तेव्हां राणुबाई तुळशीजवळ दिवा लावीत होत्या. हातपाय धुवून आल्यावर हात जोडून तो तुळशीपुढें उभा राहिला. " शुभं करोति " झाल्यावर रामरक्षा झाली. राणुबाईनें त्याच्यावरून मीठ-

मोहऱ्या ओंवाळून टाकल्या. सूनमुख पहाण्याची स्त्रियांना स्वाभाविक हौस असते. त्यांतून तें तर आईचें हृदय! नारायणाच्या लग्नाशिवाय हल्लीं दुसरा विचारच राणुबाईच्या मनांत नव्हता; पण विषय काढला कीं नारायणानें रागवावें, रुसावें नि तिथून निघून जावें. त्याच्याजवळ कसें बोलावें हेंच त्या माऊलीला समजत नव्हतें. एकदां विषय काढला तेव्हां त्यानें झाडावरून डोहांत उडी टाकली. डोक्याला केवढं मोठं आवाळूं आलें. पण मनाचा हिय्या करून विषय काढायचा नि नारायणाकडून आज कबूल करून घ्यायचें म्हणून त्यांनीं अगदीं ठरवून टाकलें होतें. नारायणाला जवळ घेत त्या म्हणाल्या,

" नारायणा, तुला कांहीं तरी सांगावं असं सारखं मनांत येतं रे— "

" मग सांगत कां ग नाहींस आई ? "

" सांगू का नको म्हणून मन द्विधा होतं बघ. "

" कां ? "

" समजा, मी सांगितलं, नि तूं नाहीं म्हणालास तर ? "

" अजूनपर्यंत म्हटलंय् का कधीं असं ? "

" पहा बरं. "

" तुला मी ' नाहीं ' म्हणणार नाहीं, अगदीं रामाची शपथ, आई. "

" तर मग तूं लग्न करशील ? माझी तेवढीच इच्छा आहे रे बाळा. "

" आई ? "

" माझं ऐकशील ना एवढं ? "

" रामाची शपथ घेतलीय मी, तुझं ऐकलंच पाहिजे मला. "

" अंतरपाट धरीपर्यंत तरी नाहीं म्हणूं नकोस रे, नारायणा ! "

" रामाची इच्छा असेल तसं होईल आतां. " एवढं बोलून नारायण झपाट्यानें देवघरांत निघून गेला.

खांबाआडून मायलेकरांचा संवाद श्रेष्ठी ऐकत होते. नारायण गेल्यावर पुढें होऊन ते म्हणाले —

" आई, एकदां विषय काढलास तेव्हां नारायणानें कपाळमोक्ष करून घेतला होता तें विसरलीस वाटतं ? "

" माहीत आहे मला. "

" तरी पुन्हां विषय काढलास ? "

" हो "—

" आतां पुन्हां विषय काढलास तर पोरगा हातचा जाईल हो. "

" कातरवेळीं असं अशुभ बोलूं नकोस, गंगाधरा. "

" माझी का तशी इच्छा आहे, आई ? "

" जा तूं. माहीत आहे मला. "

श्रेष्ठी जाऊं लागले तेव्हां राणुबाईनीं त्यांना हांक मारून सांगितलें, —

" उद्यां आसनगांवला निरोप धाडा. मुलगी पसंत आहे म्हणावं आम्हांला. "

* * *

जांबेच्या नारायणाचें लग्न ठरलें. आसनगांवच्या बोधलापूरकरांची मुलगी ठरली. ठोसरांच्या नारायणाचें लग्न ठरलें म्हणून जो तो एकमेकाला सांगूं लागला. लग्नाच्या दोन दिवस आधीं वऱ्हाडीमंडळी बैलगाडींतून जांबेहून आसनगांवला निघाली. सीमान्तपूजन थाटांत झालें. नारायण कांहीं बोलला नाहीं. चारचौघांसारखे सारे सोपस्कार त्यानें करून घेतले, अगदीं मुकाट्यानें ! मुहूर्त समय आला. लग्नमंडपांत गर्दी उसळली. नारायण बोहोल्यावर चढला. मध्यें अंतरपाट धरला गेला. पलिकडे वधू येऊन उभी राहिली. वधूच्या मागें दिवा घेऊन करवली उभी राहिली. मंगलाष्टकें सुरू झालीं ... " शुभमंगल सावधान " ...

नारायणाचें चित्त थाऱ्यावर नव्हतें. सावधान ऽऽ सावधान ऽऽऽ सावधान ! शब्दावर शब्द आदळत होते. त्याच्या कानांत कुणींतरी ओरडत होते. नारायणा, सावधान ! नारायणा सावधान ! ! —नारायण खडबडून सावध झाला. त्याला आईचे शब्द आठवले — " अंतरपाट धरीपर्यंत तरी नाहीं म्हणूं नकोस, अंतरपाट धरीपर्यंत तरी नाहीं म्हणूं नकोस " विजेसारखे शब्द त्याच्या कानांत घुसले, काळीज हललें. मातोश्रींच्या शब्दांतून नारायण मोकळा झाला होता.

सावधान, नारायणा सावधान ! कोण बोलत होतें हें ? कोण चेतवित होतें ? नारायणाच्या आत्मारामानें उत्तर दिलें, " आहे, मी सावध आहे "—आणि भटजींनीं पुन्हां एकदां गजर केला, " सावधा ऽ न ऽ " तसें त्याचें डोकें भणाणलें. त्याची आंतडीं पिळवटून निघालीं. तो बेभान झाला.

अंधारी रात्र. मंडपांत गर्दी झालेली. भराभरा दिवे विझवून नारायण पळाला. भटजी, आई, नातेवाईक, श्रेष्ठी, व्याही, वऱ्हाडी सगळ्यांच्या हातांवर तुऱ्या देऊन नारायण पळाला. तो खरोखरच सावध होता. बेसावध होते लोक ! वर पळाला. जसा धनुष्यांतून सुटलेला बाणच ! वधू गोंधळून गेली. करवलीच्या हातांतला दिवा विझला. नारायण गेला नि लग्नांत केवढा गोंधळ उडाला. कल्पनेंतहि न येणारी गोष्ट प्रत्यक्षांत घडली. सर्वजण आश्चर्यांत बुडून गेले. मुलगा हातचा गेला नि रडत बसणेंच राणुबाईच्या कपाळीं आलें. आपण उगाचच नारायणाच्या लग्नाचा हट्ट धरला असें त्या माऊलीला झालें.

लग्नमंडपांतून नारायण जो पळाला तो आपल्या जन्मभूमींत, जांबेस आला. जन्म देणाऱ्या आईला सोडून तो आपल्या जन्मगांवीं आला. गांवाबाहेरच्या मारुतीचें, आनंदी ओढ्याचें, गांवाबाहेरच्या त्या पंचवटवृक्षांचें, पांच विहिरींचें, शंकराच्या देवळाचें त्यानें अखेरचें दर्शन घेतलें व मागें पहात तो पुढें चालूं लागला. गांवाभोंवतालचा तट अस्पष्ट होऊं लागला नि सारें जांब गांव दृष्टीच्या टप्प्यांतून निसटलें. रातोरात तो गोदावरीपर्यंत गेला व तिच्या दक्षिण तीरानें नदीच्या उगमाकडे चालूं लागला.

अंगावरल्या नेसत्या वस्त्रानिशीं सर्वसंगपरित्याग केलेला तो बालक अकरा दिवस सतत चालत होता. भूक नाहीं, ऊन नाहीं कीं झोंप नाहीं. कशाची म्हणून त्यानें पर्वा केली नाहीं. न थांबतां तो सारखा चालतच राहिला.

* * *

**पंचवटीच्या गर्द छायेंत**

अकराव्या दिवशीं सूर्योदयाला त्याच्या डोळ्यांना घाट दिसला. देवळांचीं शिखरें दिसलीं, घंटांचे गंभीर नाद कानांवर आले. डोळ्यांनीं रामाची पंचवटी पाहिली नि पाय स्थिर झाले. जिथें राम आला तिथें त्याचा भक्त आला. पाय थांबले. मनाची धांव थांबली. शरीर शीतल झालें. गोदावरींत स्नान करून त्यानें रामाचें दर्शन घेतलें. नाशिक हें रामोपासनेला अत्यंत अनुकूल असें त्याला वाटलें. रामाची मूर्ति पाहून डोळे पाझरूं लागले. गहिंवरून नारायग म्हणूं लागला —

अंकित मी तुझें दीन। नको करूं पराधेन। न पाहे माझें निर्वाण। रे रामा ॥
मी तुझें पाडस। वरी पडिले भवपाश। धीर धरवेल कैसा। रे रामा ॥

कूर्मी अवलोकन । न करितां बाळां मरण । तैसा तूं निश्चयें जाण । रे रामा ॥
निजब्रीद साच करी । दीनासी अंगिकारी । रामदास चरण धरी । रे रामा ॥

रामदर्शन घेऊन नारायण बाहेर आला, तर गोदेच्या कांठीं एक प्रेत जळत होतें. माणसाचा शेवट ते चिमुकले नेत्र एकटक पहात होते. मग काय विचारतां ? वैराग्य वृत्तीस अधिकच बहर आला. पंचवटीला जीवनाचें दर्शन घडलें. आतां जीवनाचें रहस्यहि इथेंच उलगडायचें. ब्रह्मांड भेदून रामभक्ति पल्याड न्यायची असा नारायणानें निश्चय केला.

गोदेकांठीं माणसांची वर्दळ. एकान्त कमी म्हणून नारायणानें तपश्चर्येसाठीं दूरची जागा निवडली. जिथें सभोंवार गर्द झाडी आहे. लपंडाव खेळणाऱ्या मुलीप्रमाणें छोट्या टेकडीआड लपत नंदिनी गोदेला भेटायला आली आहे. टाकळी त्याला आवडली, आणि साधनेला इथं सुरुवात झाली. नाशकास रामाचें दर्शन घेऊन नारायण टाकळीस पुरश्चरणाच्या योजनेस लागला. घरून निघतांना वैराग्य, निर्मलभाव, ध्येयनिष्ठा, सुदृढ शरीरयष्टि यांची शिदोरी त्यानें बरोबर आणली होती. ती पुरचुंडी त्यानें टाकळीच्या संगमांत उघडी केली.


शके १५४२ माघ शुद्ध सप्तमी. अगदीं पहांटेची काळोखी वेळ. पहांटेचा गारवा जाणवत होता. संगमाच्या पात्रांत आभाळ चांदण्याची दौलत घेऊन उतरलें होतें. त्या जलांतल्या चांदण्यांनाहि थंडी वाजत होती. त्या निस्तब्ध वातावरणांत नारायणाचें मंत्र पुटपुटणें चालू होतें. सूर्य वर आला. कमरभर पाण्यांत उभा असलेला नारायण त्यानें पाहिला. टाकळीच्या संगमांत नि त्यांच्या अंगावर कोंवळीं किरणें फेंकीत सूर्य हंसला. नारायणालाहि हंसू आलें. वाऱ्यावर हिरवीगार शेतें डोलत होतीं. वर निळें आकाश नि खालीं स्वच्छ वहातें पाणी. नदीची खळखळ व पक्ष्यांचा किलबिलाट सोडला तर सगळीकडे शांतता होती. सूर्याला साक्ष ठेवून नारायणानें त्रयोदशाक्षरी राममंत्र सुरू केला. सूर्याजीपंतास सूर्यदर्शन व वरप्रदान रथसप्तमीस झालें आणि नारायणानें तपश्चर्येस आरंभहि याच मितीस केला—

श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम ॥

रोज पहांटेला उठावें, स्नानसंध्यादि कर्में आटोपलीं कीं एकशें आठ सूर्य-नमस्कार घालावेत, नमस्कार झाल्यावर जोर, दंड, बैठका काढाव्यात, टाकळी संगमांत कमरभर पाण्यांत उभें रहावें, त्रयोदशाक्षरी मंत्र म्हणत चित्त एकाग्र करावें. दुपारीं सूर्य माथ्यावर आला म्हणजे त्यानेंच सूचना करावी कीं आतां

पुरें. मग मध्यान्हींची संध्या करावी. पंचवटीस जाऊन राघवाचें दर्शन घ्यावें. येतांना माधुकरी मागून आणावी. रामप्रभूस त्याचा नैवेद्य दाखवावा. नंतर त्याचे तीन भाग करून एक भाग गाईस, दुसरा संगमांतील माशांस व तिसरा भाग झोळींत घालून तो गंगेंत बुचकळावा, नि मग आपला भाग ग्रहण करावा.

दुपारीं उपनिषदें, महाभारत, भागवत, रामायण, योगवासिष्ठ आदि ग्रंथ चाळावेत. संध्याकाळीं रामाच्या देवळांत कथा ऐकावी, नाशिकच्या शास्त्री-



पंडितांबरोबर चर्चा करावी नि दिवेलागणीला पुनः टाकळीला परतावें. रात्रीं थोडा वेळ ध्यानयोग करावा नि रात्रभर गुहेंत विश्रांति घ्यावी.

अशीं दोन वर्षे झालीं. जपाची संख्या वाढूं लागली. तोंडावर तेज येऊं लागलें. व्यायामानें शरीर बलवान होऊं लागलें. ईश्वरकृपेमुळें नारायणाचें शरीर जन्मापासून गुटगुटीत नि प्रकृति निरोगी होती. त्यामुळें वृत्ति नेहमींच आनंदी व उल्हसित असे. आतां तर शरीरावर व्यायामाचें नि उपासनेचें तेज चढत होतें.

पुरश्चरणाच्या काळांतच वाल्मीकि रामायण स्वहस्तें लिहून काढावें असें

मनांत आलें. त्यामुळें रामचरित्र मनांत पक्कें बसेल असें वाटून शके १५४४ पासून वळणदार अक्षरांत वाल्मीकि रामायणाच्या प्रतीवरून स्वहस्तें रामायण लिहिण्यास आरंभ झाला. दिसामार्जी कांहीं लिहिणें सुरू झालें.

आदिकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड लिहून झालीं. अखंड रामनामामुळें त्यांचें चित्त गंगेलाहि शुद्ध करील इतकें पवित्र झालें. पुढें–मागें राम, आंत-बाहेर राम, स्मरण–विस्मरणांत राम. टाकळींत त्याला दाही दिशांना राम दिसूं लागला. जसजसा पुरश्चरणाचा काळ लोटूं लागला तसतसें लोकांचें लक्ष ह्या मुलाकडे साहजिकच जाऊं लागलें.

संध्याकाळची वेळ. नारायण पंचवटीच्या राममंदिरांत होता. स्वतःचें एकाकी निराश्रित जीवन आणि प्रभु रामचंद्र भेटतील कीं नाहीं या विचारानें अपार अधीर झालेलें मन यामुळें भांबावून तो सचिंत दिसत होता. पण त्याचवेळीं पाखंड भंगेल, विवेक जागेल, ज्ञान उजळेल व भगवंत भेटेल असें अत्यंत निर्मळ, कोमल नि रसाळ कवित्व स्फुरूं लागलें —

उदासीन हा काळ जातो गमेना । सदा सर्वदा थोर चिंता शमेना
उठे मानसीं सर्व सांडून जावें । रघूनायका काय कैसें करावें ॥
जनीं बोलतां चालतां वीट वाटे । नसे अंतरीं स्वस्त कोठें न कंठे ।
घडीनें घडी चित्त कीती धरावें ! रघूनायका काय कैसें करावें ॥

सांग रे रघुनाथा, काय करूं ? डोळ्यांत पाणी आणून, नारायण पंचवटीं-तल्या रामाला विचारीत होता; व कोण हा मुलगा म्हणून दर्शनाला आलेल्या बायका त्याच्याकडे कौतुकानें पहात होत्या.

यशप्रातीला उपासनेच्या बळासारखा दुसरा आधार नाहीं आणि जेथें उपासना नाहीं तेथें जय नाहीं, अशा निश्चयानें खडतर नि अखंड उपासना चालू होती. गोदेकांठीं नारायणानें तपश्चर्येचें, श्रद्धेचें नि ब्रह्मचर्याचें जणूं अधिष्ठानच मांडलें होतें. मानसिक आणि शारीरिक बळ वाढत होतें. पुस्तकी ज्ञानाबरोबर अनुभवाचें ज्ञान पदरीं सांठत होतें.

शके १५४५ वैशाख शुद्ध दशमी. वाऱ्याचा निःश्वास सोडून सृष्टि स्तब्ध उभी होती. दुपारच्या उन्हानें डोळे दिपत होते. नित्य उपासना करीत नारायण संगमांत उभा होता. जपतप झाल्यावर तो पाण्यांतून बाहेर आला आणि कांठावर येऊन ब्रह्मयज्ञ करीत बसला. तंद्री लागली, डोळे मिटले, चित्त एकाग्र झालें. पंचवटींत फिरणारा वनवासी राम डोळ्यांपुढून सरकूं लागला. त्याला पहातां पहातां नारायण सारें जग विसरला. ★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि ....................

# महाकाळ विक्राळ पोटीं थरारी

दसकपंचक गांवचा तरुण कुळकर्णी वारला होता; व त्याला जाळण्यासाठीं टाकळीच्या संगमावर आणलें होतें. सती जाण्याकरतां त्याची बायकोहि आली होती. डोक्यांत गजरा, कपाळाला मळवट, अंगांत हिरवी चोळी व लुगडें, हातांत सौभाग्यलेणें अशा वेषांत डोळ्यांत आंसू आणीत गतप्राण झालेल्या आपल्या नवऱ्याकडे ती सारखी पहात होती. आलेली मंडळी चिता रचीत होती. त्या सतीचें लक्ष डोळे मिटून बसलेल्या नारायणाकडे गेलें. सती जाण्यापूर्वीं त्या तपस्व्याला नमस्कार करावा म्हणून ती चालत त्याच्याजवळ गेली. नारायण आपल्याच समाधींत होता. नमस्कार करतांना बांगड्यांचा आवाज झाला म्हणून तो बोलून गेला—

" अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ! "

" कुठल्या जन्मीं सफळ होणार हा आशीर्वाद ? "

नारायणानें डोळे उघडून त्या बाईकडे पहात म्हटलें—

" असं कां म्हणतां आई ? "

" मग काय म्हणूं ? मी सती जात आहे. "

" अरेरे, रामा, काय हे बोल काढलेस मुखांतून ! "

तळ्याचा बांध फुटावा तसें तिच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. नारायणानें समोर पाहिलें तर त्या स्त्रीच्या पतीची चिता रचून तयार झाली होती. लोकांनीं हांक मारली तशी ती जाऊं लागली. नारायणहि तिच्या मागोमाग गेला, श्रीराम जयराम जयजयराम हा मंत्र पुटपुटत !

झपाझप पावलें टाकीत त्या सतीला अडवून तो म्हणाला—

" आई, असें होणार नाहीं, तुम्हीं सती जाणार नाहीं. "

" काय बोलतोस बाळ हें ? "


" होय आई ! "

" बाळा ! "

" जप आटपून निघणार तेवढ्यांत आपण समोर आलांत. बांगड्यांचा आवाज झाला म्हणून न बघतांच मी आशीर्वाद दिला. "

" तुझी चूक नाहीं बाळा. "

" नाहीं नाहीं, माझा शब्द राम खालीं पडूं देणार नाहीं, आपण विश्वास ठेवा. "



सारी मंडळी पहात होती. साधनेला जेथें तो उभा राहायचा तेथून रामाचें नांव घेऊन त्यानें उदक आणलें आणि तें प्रेताच्या अंगावर शिंपडलें. प्रदीर्घ झोपेंतून उठल्याप्रमाणें कुळकर्णी उठून बसले.

देवाच्या उपासनेसाठीं जिवलगांच्या तुटी स्वीकारून नारायणानें घर सोडलें त्याचें का हें फळ ?

नारायणाजवळ शुद्ध नि प्रखर वैराग्य, उत्कट भक्ति नि विश्वहिताची तीव्र तळमळ खरोखरच एवढी अपार होती, कीं अवघ्या सव्वादोन वर्षांत मृतास जिवंत करण्याचें सामर्थ्य त्याला लाभलें. माणसाच्या श्रद्धेनें परमेश्वरसुद्धां नमतो तर!

उभयतांनीं नारायणास नमस्कार केला, ती साध्वी म्हणाली —

" तुझे उपकार कसे रे फेडूं बाळा ? "

" आई, तुमचा पहिला मुलगा तुम्हीं मला द्यावा एवढीच इच्छा. "

" अगदीं आठवणीनें देऊं. "

सारी मंडळी थक्क होऊन घडला प्रकार पहात होती. ती मंडळी दिसेनाशी झाली आणि मग नारायण भानावर आला. रामाला आपल्याकरितां फार कष्ट पडले म्हणून त्याला वाईट वाटलें.

झपाझप पावलें टाकीत तो पंचवटीच्या राममंदिरांत आला. त्या दिनदयाळाला तो आळवूं लागला —

तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें । तुझे गूण गातां मनासी रहावें
उठों आवडी भक्तिपंथेचि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥
मनीं वासना भक्ति तूझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी
वसावें मज अंतरीं नाम घेतां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥
सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझें कारणीं देह माझा पडावा
उपेक्षूं नको गूणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥

" प्रभू रामचंद्रा, बालकाचा शब्द खरा व्हावा म्हणून किती रे कष्ट पडले तुला ! पंचवटींत उभा राहून आज टाकळीस केवढा चमत्कार केलास ! "

साऱ्या पंचक्रोशींत कुळकर्ण्याचें प्रेत उठल्याची बातमी झाली नि नारायणाच्या दर्शनाकरतां जो तो पंचवटींतल्या रामाच्या देवळांत गर्दी करूं लागला.

पण नारायण कुणालाहि दिसला नाहीं. तो तिथून अगोदरच सटकला होता. प्रसिद्धीच्या नि सिद्धीच्या मार्गें तो लागला नाहीं. संकल्पित जपसंख्या पूर्ण होईपर्यंत त्यांनीं तपश्चर्या व अध्ययन चालूंच ठेवलें. कुणीहि नमस्कार केला तरी आतां तो नुसतें " जयजय रघुवीर समर्थ " म्हणे. हाच त्याचा आशीर्वाद.

रोज पांचसहा तास पाण्यांत उभें राहून कंबरेखालचें त्याचें अंग पांढरें पडलें होतें. मासे डसल्यानें पोटऱ्या–मांड्यांवर व्रण दिसूं लागले होते, पण साधनेंत खंड नव्हता. किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड लिहून झाले; तेव्हां शके १५४६ वैशाख शुद्ध तृतीया उजाडली होती.

" उठा प्रातःकाल झाला । अवघे राम पाहूं चला "

ही भूपाळी झाल्यावर नारायण खड्या आवाजांत म्हणूं लागला —

बळे आगळा वीर कोदंडधारी । महाकाळ विक्राळ तोही थरारी
पुढें मानवा किंकरा कोण केवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा
जय जय रघुवीर समर्थ ॥

पर्णकुटीच्या दारांत कुणाची तरी सांवली पडलेली दिसली म्हणून नारायण बाहेर आला. आशीर्वाद लाभलेलें दांपत्य ठरल्याप्रमाणें नूतन बालक घेऊन आलें होतें. त्याला पहातांच त्याच्या तोंडून उद्गार आला, " ये उद्धवा, ये ! " नारायणाला पहिला शिष्य मिळाला, तो हा उद्धव ! मुलाला नारायणाकडे सोंपवून तें दांपत्य नमस्कार करून निघून गेलें.

नदीलगतच्या मळेवाल्याची चिमणी चिमा नारायणाच्या झोंपडींत नित्य यायची. नारायण आल्यापासून ती चिमुरडी त्याच्यामागें सांवलीसारखी असे. तो बाहेर निघाला कीं त्याला खडावा दे, चिमुकल्या हातांनीं त्याची छाटी, लंगोटी वाळत घाल, पर्णकुटींतला केर काढून ठेव, नाहींतर भांडीं घांसून ठेव. नारायण ती बालसेवा कौतुकानें पहात होता. त्यांच्यांत अतूट नातें निर्माण झालें होतें नि आतां तिच्याशीं खेळायला उद्धव आला होता.

नारायणाला मुलांची फार आवड. त्यांना गोष्टी सांग, गाणीं शिकव, त्यांच्याशीं खेळ खेळ. उपासना चालूं असतांनाहि त्याच्या ह्या गोष्टींत खंड पडला नव्हता. मुलांत त्यानें बालरामरूप पाहिलें. एकदां उद्धवानें हट्ट धरला म्हणून त्याला एक शेणाचा मारुति करून दिला. नारायण संगमावरून परतायचा, तेव्हां चिमा नि उद्धव त्याला त्या मारुतीशीं खेळतांना दिसायचीं. उद्धवाकरतां त्यानें शक्तीचें बीज पेरून ठेवलें होतें.

मारुतिस्तोत्राच्या ओळी त्याच्या जिभेवर खेळूं लागल्या. मारुतीच्या साऱ्या कथा त्याच्या पाठ झाल्या. टाकळीसंगमावर मारुतिजन्म नव्या उत्साहांत रंगूं लागला.

नारायणाला जीवनांत एक साथीदार मिळाला. एक दिवस त्याला जवळ घेऊन नारायणानें आपल्यासारखीच भगवी कफनी त्याच्या अंगावर चढविली, गळ्यांत रुद्राक्ष माळ घातली, कांखेंत छोटीशी कुबडी दिली, हातांत कमंडलू दिला. टाकळीस नारायण एकटा आला पण आतां एकाचे दोन नारायण झाले. उद्धव म्हणजे अगदीं प्रतिनारायण ! चिमा त्यांच्याकडे कौतुकानें पहात होती.

अगाध श्रद्धेच्या जोरावर त्यांनीं उपासना केली. व्यासंग वाढविला. आपल्याबरोबर नारायणानें उद्धवाला शिकविलें. त्याला भक्तीबरोबर कुस्ती शिकविली. प्रगतीचीं अंतर्बाह्य लक्षणें दोघांच्याहि ठिकाणीं प्रकट होऊं लागलीं. विश्वास वाढला, विरक्ति वाढली. सदासर्वकाळ अंतःकरण भक्तिरंगांत रंगून गेलें.

शके १५५२. महाराष्ट्राला दुष्काळ खायला उठला. त्याची झळ नाशकाला लागली. वावटळ टाकळीपर्यंत आली. संगमाचें पाणी आटलें. फुललेले मळे पाण्याच्या अभावीं जळूं लागले. माणसांचीं तोंडें सुकलीं. गुरें निर्मालक सुटलीं. भुकेपोटीं माणसें देशोधडीला लागलीं. खायला नाहीं, प्यायला नाहीं, अंगांत त्राण नाहीं. नारायण डोळे उघडे ठेवून पहात होता. परमेश्वराचें रौद्रस्वरूप त्यानें पाहिलें. सुखाची दुसरी बाजूहि त्यानें हाताळली. धीर न सोडतां त्याची उपासना चालू होती. पण मनांत कसली तरी तळमळ होती. हृदयांत कसला तरी डोंब उठला होता. त्याला आकार यायला दोन वर्षें लागलीं.

शके १५५४. फाल्गुनाचे दिवस. नारायण टाकळीच्या संगमांत उभा होता. चोवीस वर्षांच्या तरण्याबांड नारायणाची छाया पाण्यांत पडली होती. पीळदार शरीर, भरदार छाती, घोटीव पोटऱ्या नि दंड. उद्धव तन्मयतेनें पहात होता.

★ ★ ★

# तीर्थांचे तीर्थरूप

साधनेला सुरुवात करून आज बरोबर बारा वर्षें झालीं. आतां इथें राहूं नये असें नारायणाला वाटूं लागलें. एका स्थळीं घट्ट केलेलें आसन मोडावें असें त्याच्या मनानें घेतलें. एका जागेंत राहून माणूस घरकोंबडा बनतो. वृत्ति संकुचित होते. झाडाखालीं झाड वाढत नाहीं. जीवनांत कांहींतरी करावें, ही जागा सोडावी असें त्याला सारखें वाटूं लागलें; पण आजच त्याला असें कां वाटत होतें तें त्याचें त्यालाच कळत नव्हतें. रात्रीं अंथरुणावर पडल्यावरसुद्धां त्याच्या चित्ताला स्वस्थता नव्हती. त्याच्या कानांवर ध्वनि येत होते, "नारायणा, तूं टाकळी सोड, तुझा देश पहा, तीर्थयात्रेला जा." – पुन्हां पुहां तेच ध्वनि. नारायण पर्णकुटीच्या बाहेर आला. मोकळ्या वाऱ्यांत त्याला बरें वाटलें. सगळीकडे शांत होतें. समोर ध्रुवाचा तारा लुकलुकत होता.

सकाळचे नित्यनेम झाल्यावर नारायण पंचवटीच्या देवळांत गेला. दोन्ही बाजूला जळणाऱ्या समयांच्या उजेडानें गाभाऱ्यांतला काळोख उजाळला होता. बारा वर्षे तपश्चर्या झाली. गायत्रीचीं तीन पुरश्चरणें झालीं. रामनामाचा तेरा कोटी जप झाला. प्रसन्न मनानें रामापुढें उभा राहून तो म्हणाला, "रामा, आम्हांला आतां अयोध्येला जायची परवानगी द्यावी." रामाच्या अंगावरचें फूल खालीं पडलें. रामदासानें तो कौल मान्य करून टाकळी सोडण्याचें ठरविलें. आपल्या पर्णकुटीचा त्यानें निरोप घेतला. पायांत खडावा, कांखेंत कुबडी, गळ्यांत मेखला, हातीं माळ, दुसऱ्या हातीं कमंडलू, मस्तकीं जटाजुट, अंगावर भगवी कफनी, त्यावर रुळणारी काळीभोर दाढी, तेजस्वी डोळे नि खांद्यावर हरणासन! नारायण यात्रेला निघाला. चिमाला कळलें तशी ती घाईघाईनें आली,

" बाबा, तुम्ही जाणार आज ? "

" होय बाळ. "

" मला टाकून ? "

" मी येणार आहे परत. "

" खोटं ! "

" खरंच येणार आहे. "

" उद्धवाला पण घेऊन जाणार ? "

" नाहीं, तो इथंच राहील, मी पुन्हां येईन तेव्हां त्याला घेऊन जाईन. "

" तुमची आठवण म्हणून आम्हांला कांहीं तरी ठेवा — "

" ह्या घे माझ्या खडावा. "

नारायणानें पायांतल्या खडावा तिला काढून दिल्या. परकऱ्या चिमानें त्या उराशीं कवटाळल्या. जातांना तिला सांगितलें,

सांगतसे खूण माझे अंतरीची । सर्वहि सुखाची सुखमूर्ति ॥
सुखमूर्तिराम सोडूं नको कदा । तुज तो आपदा लागो नेदी ॥

अनवाणी पायानें मागें पहात नारायण तीर्थयात्रेचा मार्ग आक्रमूं लागला. वाऱ्यावर भगवी कफनी फडफडत होती. संगमापर्यंत चिमा नि उद्धव त्याला पोहोंचवायला आले. झपाझप पावलें टाकीत जाणाऱ्या नारायणाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ते विस्फारलेल्या नजरेनें पहात होते. अदृश्य होत जाणारी नारायणाची ती मूर्ति त्यांनीं नयनकवाडांत सांठवून ठेवली; आणि नारायण दृष्टिआड झाल्यावर ते संगमावरून माघारीं वळले. मोकळ्या माळावर सुगंध सुटल्याचा भास त्यांना झाला. भारावलेल्या गळ्यानें ती बाबांचा मंत्र म्हणूं लागली,

" श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम ॥ "

नारायण येईपर्यंत उद्धव टाकळीस मारुतीची उपासना करीत होता.

* * *

# आईचे डोळे गेले

जांब नारायणाची आठवण काढीत होती. गांवा-बाहेरच्या मारुतीच्या देवळांत बसून राणुबाई आल्यागेल्याजवळ त्याची चौकशी करीत होत्या. " नारायण कुठें गेला ? " म्हणून मारुतीलाच प्रश्न विचारीत तासन्तास त्या देवळांत बसायच्या. स्वतःशींच पुटपुटायच्या, " नारायणा, कसा रे मला सोडून गेलास ? एवढा कसा रे निष्ठुर झालास ? मला भोळीला कसें रे फसविलेंस ? आतां कधीं भेटशील रे मला ? " छप्पन्न प्रश्न त्या मारुतीला विचारायच्या. त्या प्रदक्षिणा घालायच्या, त्याच्यापुढं सांजवात लावायच्या. काकुळतीला येऊन त्याला विनवायच्या, " मारुतीराया, एकदां भेटव रे माझा बाळ मला. त्याच्या लग्नाचा हट्ट पुन्हां नाहीं धरायची मी. " आणि मग तासन्तास मुलाच्या आठवणीनं डोळ्यांतून अश्रु ढाळायच्या.

रडून रडून राणुबाईचे डोळे गेले नि शेवटीं आंधळ्या झाल्या बिचाऱ्या.

तिकडे आईचे डोळे गेले नि इकडे नारायण डोळसपणें आपला देश पाहूं लागला. भरतखंडाची पदयात्रा सुरू झाली.

शके १५५४ उजाडलें.

नाशकाहून रामदास प्रथम काशीच्या वाटेला लागले. विश्वेश्वराची ओढ ही सर्वेश्वराची ओढ आहे.

भ्रमंतींत त्यांना लोकस्थिति पहावयाची होती. धर्मरक्षणाकरतां कुणीं कुठें कांहीं करीत आहे का ? त्यांत आपल्याला कुठें कांहीं करतां येईल का ? हा ध्यास त्यांना लागला होता. ते दिवस महाधामधुमीचे होते; म्हणून स्वरक्षणार्थ त्यांनीं जवळ एक गुप्ती बाळगली होती. वेळ येईल तसा ते वेष धारण करीत. नांवें बदलीत. स्वधर्माचा असा हा साक्षेपी प्रचारक डोळे उघडे ठेवून देशाची परिस्थिति पहात भ्रमंति करीत होता.

माहूर, कारंजा, अकोला, भैरवगड, एलीचपूर, बैतूल, छिंदवाडा, बाला-घाट, भंडारा हीं गावें पहात ते अंभोऱ्याला आले. तेथें त्यांनीं विवेकसिंधुकर्ते मुकुंदराज यांचे परमगुरु हरीनाथ यांच्या समाधीचें दर्शन घेतलें.

अकोल्याहून ते सातपुडा पर्वतांत शिरले. त्या भागांत भिल्ल, गोंड, कोरकू, हळूव इत्यादि वन्य जमाती पाहिल्या. त्यांच्या लोकनृत्यांत ते सामील झाले. त्यांचे रीतिरिवाज समजावून घेतले, जातांना त्यांच्याकडून वाण नदीच्या कांठीं डोंगरांतील एका रमणीय कड्यावर मारुतीची स्थापना केली.

तेथून ते निघाले; नि एका प्रभात समयीं त्यांनीं काशीविश्वेश्वराच्या



देवळाचा कळस सूर्याच्या किरणांत चमकतांना पहिला. काशीविश्वेश्वराचें दर्शन घेऊन प्रयाग व गया करून ते पुन्हां काशीस आले. तेथें ते कांहीं दिवस राहिले. काशीला गंगातीरीं हनुमंत घाट होता; पण त्या घाटावर मारुति नव्हता. तेथें त्यांनीं मारुतीची स्थापना केली. आतां घाटाला शोभा आली. काशीक्षेत्रीं त्यांनीं मठ स्थापन केला व रामचंद्र नांवाच्या एका शिष्याच्या हातीं त्याचीं सूत्रें दिलीं.

नंतर त्यांचीं पावले मथुरेकडे वळलीं. समर्थांच्या उत्तरेकडील तीर्था–

टनाच्यावेळीं मुर्शिदकुली हा मथुरेचा फौजदार होता. सारा थकला कीं गांवावर हल्ला करून स्त्रियांना पळवून जनानखान्यांत कोंबावें हा त्याचा नित्यक्रम होता. त्या दिवशीं कृष्णाष्टमी होती. यमुनेच्या तीरावर गोवर्धन येथें कृष्णजन्म साजरा होत होता. स्त्रीपुरुषांचा फार मोठा समुदाय तेथें जमला होता. धोतर नेसून, कपाळावर गंधाचा टिळा लावून मुर्शिदकुली स्त्री-पुरुषांच्या घोळक्यांत शिरला. वेळ साधून एका सुंदर स्त्रीवर त्यानें लांडग्या-सारखी झडप घातली व तयार ठेवलेल्या होडींतून सर्वांच्या डोळ्यांदेखत त्यानें तिला आग्र्यास पळविली. नुसती रडारड न् आरडाओरड झाली. पण प्रतिकार कुणीच केला नाहीं. सारे भ्याड, नामर्द ! आरडाओरड ऐकून काय प्रकार आहे तें पहाण्याकरतां समर्थ तेथें आले तर ती होडी लांब गेली होती. समर्थांना वाटलें, बिचारी दुर्दैवी स्त्री ! आतां एक दिवस धन्याची कामवासना तृप्त करील नि सारा जन्म दुःखांत घालवील. यवनांच्या तावडींत सांपडण्यापेक्षां जीवलगांच्या हातून आलेलें मरणच बिचारीला आवडलें असतें.

साऱ्या प्रवासांत समर्थांनीं हेंच पाहिलें. पुरुषांत पुरुषार्थ राहिलाच नाहीं. गुंडांनीं वाटेल तेव्हां वाटेल तिथें धाड घालून स्त्रिया पळवाव्यात, धन-धान्य लुटावें, देवळामूर्तींची विटंबना करावी. काय वाटेल तें करावें. स्त्रिया आणि मूर्ति यांची विटंबना करणें हें तर मुसलमानी अत्याचारांचें एक महान सूत्रच होतें. मशिदींच्या कामीं जे दगड वापरले होते ते हिंदूंच्या देवळांचे होते हें समर्थांनीं पाहिलें. हिंदूंच्या मूर्ति मशिदीच्या पायऱ्याखालीं घातलेल्या त्यांनीं पाहिल्या. प्रत्येक यवनाच्या पायांखालीं त्या तुडविल्या गेलेल्या त्यांनीं पाहिल्या. काफरांच्या मूर्तींचा आणखी कुठल्या प्रकारें मान ठेवायचा ! यवनी सत्तेचे असे अनेक उद्दाम नि उद्धट प्रकार त्यांनीं पाहिले. त्यांना वाईट वाटलें त्याचेंच कीं ह्या गोष्टींना कुठें प्रतिकार होत नव्हता. ह्याबद्दल कुठें खेद नव्हता कीं खंत नव्हती. शरीरें पेटून उठत नव्हतीं कीं कुणाला चीड येत नव्हती. मनें मेलीं होतीं. शरीरें दुबळीं झालीं होतीं. सत्व पार धुवून गेलें होतें. हिंदु मनाला नि शरीराला अत्याचारांची जणू संवयच झाली होती. कत्तल करून सैन्य थकलें व लुटायला त्यांना कांहीं राहिलें नाहीं तरच तें निघून जाई; पण प्रतिकारामुळें त्यांची पिछेहाट कुठेंच झाली नव्हती.

ज्या मार्गानें सैन्य जाई त्या मार्गांत जे जे लोक आढळत त्यांची नाहक कत्तल होई. त्या कत्तलींतून गर्भार स्त्रिया नि आयांच्या अंगावर दूध पिणारीं बालकेंहि सुटत नसत. पण मरतांनाहि लोकांनीं कधीं मारलें नाहीं. तलवारीला तलवार कधीं भिडलीच नाहीं. सुंदर स्त्रियांना कैद करण्यांत येई. रस्त्यावर दुतर्फा असलेलीं घरें लुटलीं जात. सारा मुलूख बेचिराख केला जाई. लोक जीव घेऊन पळत. एखाददुसरा छाती पुढें काढून प्रतिकारास उभा राहिला तर त्याला टांगीत, छाटीत, सुळावर चढवीत, कुत्र्यांकडून फाडवीत, हत्ती-कडून तुडवीत, किंवा सर्पदंश करीत. त्यामुळें प्रतिकाराची कल्पना त्यांना कधीं शिवलीच नाहीं. लोक अगदीं दीन-दुबळे, लाचार नि स्वाभिमानशून्य झाले होते. यवनांनीं केलेली जाळपोळ, लुटमार हिंदु लोक निमूटपणें पहात. अत्याचार शांतपणें सहन करीत. तें पाहून समर्थांची आंतडीं पिळवटून निघत. पण एकटे समर्थ तरी काय करणार ? मनाशीं मात्र त्यांनीं खुणगांठ बांधली, कीं मिळेल तेवढा मराठा गोळा करून संघटित प्रतिकारानेंच हें संकट परतवायचें. ह्या रोगावर आतां हा एकच इलाज आहे; कारण संघटना ही नेहमींच पोलादी कांबेसारखी असते.

मथुरा सोडतांना काशीप्रमाणें इथेंहि त्यांनीं एक मठ स्थापन केला. धर्माचीं नि शक्तीचीं बीजें पेरलीं. मथुरेच्या मठावर हरिकृष्णाची नेमणूक केली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम...................... वि: ....................
क्रमांक ...................... नों. दि. ....................

# समर्थांचें महाक्षेत्र

नंतर रामदास अयोध्येस गेले. मुक्तपुरी अयोध्या. ती तर श्रीरामप्रभूचीच राजधानी! रामरायाची ती नगरी म्हणजे समर्थांचें महाक्षेत्र. समर्थ तर रामाचे दास! अयोध्येला आल्यावर त्यांना झालेल्या आनंदाचें वर्णन काय करावें? अगदीं माहेरीं आल्यासारखें वाटलें त्यांना. शरयू तीरावर वसलेली रामरायाची राजधानी पाहून त्यांना अत्यानंद झाला. त्यांचा हृदयसागर रामप्रेमानें हेलावला गेला. रामाच्या खांद्यावर धनुष्य होतें, एक हात अभय देण्याकरतां उचललेला होता. मुद्रा प्रसन्न होती नि डोळे कमळाच्या पाकळीसारखे होते. तो राजसकुमार, राम पाहून समर्थांना गहींवरून आलें. रामापुढें हात जोडून नि नेत्र मिटून ते म्हणूं लागले—

भरत गा खंडामाजी। शरयूतीरचा गांव
धर्माचें नगर तेथें। राज्य करी रामराव
पांगुळा पाय देतो। देव जानकीचा नाथ
जाईन मी तया ठाया। देवा उत्तम तो ठाव
राघवाचा धर्म जागो। सर्व अधर्म भागो
अज्ञान निरसोनियां। विज्ञानीं लक्ष लागो ... ...

रामाची सेवा करीत अयोध्येस ते सर्वांत जास्त म्हणजे अकरा महिने राहिले. काशी व अयोध्या येथील जुनीं मंदिरें पाडून त्या ठिकाणीं मशिदी बांधल्याचा देखावा समर्थांनीं पाहिला. रामदासाचें हृदय विदीर्ण झालें. भटक्या गोसाव्याप्रमाणें नुसत्या तीर्थयात्रा करण्याची त्यांना हौस नव्हती. त्यांनीं केलेल्या तीर्थयात्रा केवळ तेथील देवळांचें, मूर्तींचें व पाणवठ्यांचें दर्शन घेऊन पावन होण्याकरतां नव्हत्या. तीर्थयात्रा करण्यांत त्यांचा हेतु फार निराळा होता. स्वजन पहावेत, त्यांच्या ओळखी काढाव्यात. त्यांच्याशीं

मैत्री करावी. धर्मप्रचार करावा, हाच तीर्थयात्रा करण्याचा त्यांचा प्रमुख हेतु होता.

अयोध्येचा निरोप घेऊन ते भारताच्या नंदनवनांत श्रीनगरला गेले. तेथें निळी झेलम, रंगीबेरंगी फुलें, सफरचंदाच्या बागा, केशराचे मळे, हिमालयाची भव्यता पहात ते शीखांच्या गुरुद्वारांत गेले. तेथें गुरु नानकांची भेट झाली. त्यांनीं मनांत योजलेलें काम हिमालयाच्या पहाडावर बसून नानकहि करीत होता. त्यांना समाधान वाटलें. त्या भव्य पुरुषाचें दर्शन घेऊन हिमालयाच्या ओढीनें ते आणखीनच त्याच्या अंतरंगांत शिरले. पर्वतशिखरीं ध्यानस्थ बसलेल्या श्री श्वेत मारुतीच्या दर्शनास ते गेले व तेथें त्यांनीं चातुर्मास्य संपविला.

नंतर उत्तर मानसयात्रा करून पूर्व भागांतील क्षेत्रें पहात पहात गंगा-सागरावरून ते जगन्नाथपुरीला आले. तेथें पद्मनाभ ब्राह्मणास अनुग्रह देऊन एक मठ स्थापन केला व त्याला मठाधिपति नेमलें.

फिरत फिरत दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या करवीर क्षेत्रीं ते आले. त्यावेळीं मुसलमान पीर व फकीर ह्यांचें महाराष्ट्रांत फार मोठें बंड माजलें होतें. अज्ञानी जनसमूह आपला धर्म सोडून त्यांच्या कच्छपीं लागला होता. राज्यसंस्था परधर्मी म्लेंच्छांच्या हातीं होती, म्हणून त्यांच्या देवधर्माला महत्त्व आलें होतें. नीति व धर्म ह्यांचा उच्छेद होऊन हिंदु समाज अत्यंत विस्कळीत झाला होता. म्लेंच्छ राजांचें व उमरावांचें वैभव पाहून लोकांनीं स्वतःचे आचार-विचार सोडून दिले होते. स्वतःचे कुळाचार त्यांना कुचकामी वाटूं लागले होते. स्वतःचा देव सोडून लोक पिराला भजत होते. कित्येकांनीं तर आपला धर्महि सोडला होता. ब्राह्मणांचा बुद्धिभेद झाला होता. मराठे स्वत्व विसरले होते. तीर्थक्षेत्रांचा धुव्वा उडून मूर्ति फोडल्या गेल्या होत्या. दगडी मूर्तींबरोबर जिवंत मूर्तींचीहि विटंबना झाली होती. स्त्रिया भ्रष्ट झाल्या. आयाबहिणींची नि देवधर्माची होत असलेली विटंबना पाहून समर्थांना वाटलें, ज्यांना आत्माराम सांभाळतां येईना ते माझा राम काय सांभाळणार ?

* * *

*　　　*　　　*　　　**सकळ पृथ्वी आंदोळली**

त्यावेळीं हिंदुस्थानांत दोन प्रकारची सत्ता होती. पहिली सत्ता सुलतान बादशहा व अमीर उमराव यांची व दुसरी मुसलमान फकिरांची. सुलतानांनीं देशभर राज्य केलें व लोकांना कंगाल केलें, तर सुफी फकिरांनीं लोकांच्या मनावर प्रभाव पाडून बाटवाबाटवी चालविली.

परधर्म, परराज्य, परसंस्कृति या त्रिदोषांनीं सर्व लोक हैराण, निरत्राण व प्रज्ञाहत झाले. स्वार्थानें अंध होऊन मराठे लोक आपआपसांत स्पर्धा करीत होते. ह्या स्पर्धेपायीं स्वकीयांचा नाश करण्याकरतां परधर्मीयांचें सहाय्य घेण्यासाठीं त्यांना कांहीं लाज वाटत नव्हती.

जेथें जेथें म्हणून इस्लामी सत्ता वास करीत होती तेथें तेथें समर्थांनीं आपले शिष्योत्तम ठेवले. जेथें जेथें कटोरे घेऊन फकीर हिंडत तेथें तेथें समर्थांनीं आपले चेले ‘ जयजय रघुवीर समर्थ ’ ही गर्जना करीत भिक्षेस पाठविले. मठस्थापना व शिष्यसंप्रदाय यांच्या द्वारा स्वधर्माच्या वृद्धीसाठीं करतां येईल तेवढा प्रयत्न तीर्थयात्रेच्या काळांत समर्थांनीं केला. देशधर्माच्या हलाखीच्या स्थितींतून समर्थांनीं मार्ग काढला. त्यांनीं लोकजागृति केली. लोकांना स्वधर्म शिकविला. मारुतीचीं देवळें स्थापन केलीं. शक्तीचीं बीजें पेरलीं व लोकांना बंधविमोचक रामाचा अमृतमंत्र दिला.

ज्या ज्या क्षेत्रीं समर्थ जात त्या त्या क्षेत्रांतील देवतांजवळ समर्थ राष्ट्राची दैनावस्था दूर होऊन लोकांची स्थिति सुधारावी म्हणून प्रार्थना करीत. परशुरामक्षेत्रीं ते गेले असतांना स्वधर्मानुकूल राजसत्तेशिवाय जनतेचें दैन्य दूर होत नाहीं म्हणून धर्मराज्य मिळवून देण्यासाठीं ते परशुरामाला विनवूं लागले —

किती येक मार्गें बहू युद्ध केलें । किती वेळ या ब्राह्मणा राज्य दिल्हें  
अकस्मात सामर्थ्य तें काय जालें । युगासारखें काय नेणों विझालें ॥  
चिरंजीव आहेसि ऐसी वंदती । समर्था तुझे चित्तकाठीण्य कीती  
तुझे नामधारी तुला हें कळेना । कृपाळूपणें चित्त कैसें वळेना ॥  
नको रे उदासीन हें वाक्य मानी । समर्था असावें बहू साभिमानी  
करावी दिनानाथ हे सत्य वाचा । तुझा चिंतितों दास मी राघवाचा ॥  
जय जय रघुवीर समर्थ ।

परशुरामाला सांकडें घालून पश्चिम मानसतीर्थे करीत करीत सह्याद्रीच्या टोंकावर वसलेल्या महाबळेश्वरीं ते आले. तीर्थक्षेत्रांत समर्थांनीं नुसत्या मूर्ति हेरल्या नाहींत तर माणसें हेरलीं. माणसांतला देव पाहिला. जीवाला जीव देतील, कार्याला साथ देतील असे सवंगडी पारखले. प्रेमळ भक्त धुंडाळले. सर्वत्र आपले लोक पेरले. लोक शोधतांना त्यांनीं उन्हातान्हाची, पावसापाण्याची कसलीच म्हणून पर्वा केली नाहीं.

तेथून फिरत फिरत भीवरेकांठीं पंढरपुरास आले. संध्याकाळच्यावेळीं भीवरेच्या तीरावर बसून पाण्यांत खडे टाकतांना पाण्यांत जसे तरंग उठत तसे त्यांच्या मनांतहि तरंग उठत. भ्रमंतींत आढळलेली लोकांची स्थिति किती हीनदीन झाली आहे ह्याचाच विचार ते करीत होते. भूतकाळापासून आजच्या क्षणापर्यंत त्यांचें मन भराऱ्या मारूं लागलें.

अल्लाउद्दीन खिलजीनें देवगिरीवर पहिलें पाऊल ठेवलें नि तेथूनच हिंदु राज्याच्या नाशाला सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या उरांत घाव बसून तो तर मृतवत् पडला. बिजापूर, बेदर, नगर या ठिकाणीं पुढें मुसलमानी तख्तें निर्माण झालीं. महाराष्ट्र भूमींत विषार भिनला. स्वाभिमान दुर्मिळ झाला. नि स्वार्थाला मात्र ऊत आला. परदेशीयांनीं मन मानेल तसा धुडगूस मांडला, कुणाला कशाचाच भरंवसा राहिला नाहीं. कुणाचा पैसा कुणीहि लुटावा, कुणाचे वाडे कुणीहि जाळावेत, कुणाची इज्जत कुणीहि लुटावी, चोर, दरवडेखोर, पेंढारी, ठग यांचें तर पेंवच फुटलें. सगळी सुलतानशाहीच मुळीं! सुलतानशाहींत लोकांचे आचार, विवेकबुद्धीला सोडून गेला. कुणी चतकोर भाकरीसाठीं जात सोडली, तर कुणी वरिष्ठासाठीं बाईल सोडली. भरल्या घरच्या लेकीबाळी नागविल्या नि नासविल्या गेल्या. जिकडे तिकडे अन्याय नि अंधकार! सगळेच एका गर्तेत सांपडले. माणुसकी मरणाच्या पंथाला लागली. जे मानी होते त्यांनीं विष खाल्लें, तर अत्याचार पहावले नाहींत त्यांनीं पाण्यांत जीव दिले.

अशा परिस्थितींत लोकांचा उद्धार करणें किती अवघड आहे ह्याची जाणीव त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसून येत होती. आसेतुहिमाचल यवनांची सत्ता होती. उत्तरेंत तर त्यांचा विशेष जोर होता. दऱ्याखोऱ्यांतून कोठें कोठें स्वराज्याचे अवशेष दडून राहिले होते. पण चेतविणारे कुणीतरी हवे होते. सत्कार्याचीं उगवतीं रोपें प्रोत्साहनाच्या पाण्याची व मार्गदर्शनाच्या खताची

वाट पहात होतीं. हीं रोपें वाढवावींत, त्यांतून स्वराज्याचा विशाल वटवृक्ष निर्माण व्हावा हें समर्थांचें स्वप्न होतें. धुगधुगणाऱ्या स्वातंत्र्यशक्तीला फुंकर घालून त्याचा वणवा पेटवावा असें त्यांच्या मनानें घेतलें नि हेंच पुढील जीवितकार्य त्यांनीं निश्चित केलें.

*                    *                    *

**रामबाण**

भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, नाशिक करीत ते पंचवटीस आले. टाकळीच्या संगमांत आराधना करणारा उद्धव त्यांना दिसला. सुखासमाधानाचे दोन अश्रु त्यांच्या नेत्रांतून त्यांच्या दाढीवर पडले. थोडे दिवस टाकळीस विश्रांति घेतली. उद्धवाला कांहीं मौलिक सूचना केल्या; आणि तीर्थयात्रा संपविण्यासाठीं ते गोदाप्रदक्षणेस निघाले. वाटेंत पैठण लागलें. समर्थांजवळचा तीरकमठा पाहून पैठणचे ब्राह्मण म्हणाले,

" हा तीरकमठा शोभेकरतां आहे कीं स्वामींना ह्याचें कांहीं ज्ञान आहे?"

खंवचट शब्दांमागें दडलेली खोंचकता पाहून समर्थ म्हणाले,

" ज्ञाता असेल तर विद्यार्थी परीक्षेस बसण्यास तयार आहे. "

शेंडीला गांठ देत एक ब्राह्मण म्हणाला,

" तर मग आकाशांत ती घार फिरत आहे, तिला मारून खालीं पाडा पाहूं. "

समर्थांच्या हातून बाण केव्हां सुटला तें बघणाऱ्यांना कळलें देखील नाहीं. ब्राह्मण शेवटचा शब्द संपवून तोंड मिटतो तर घार त्याच्या पायांशींच पडलेली. कुचेष्टा करून बंद झालेलें तोंड आश्चर्यानेंच उघडलें. पण माघार घेतली नि सौजन्य दाखविलें तर ते क्षेत्रांतले ब्राह्मण कसले ? फजीत झालेल्या ब्राह्मणाचा एक कैवारी पुढें येऊन म्हणाला,

" बरेच दिसतां कीं हो बुवा तुम्हीं ! चांगली दाढी वाढविली आहे, गळ्यांत माळ घातली आहे. वेष तर साजेसा आहे; पण कृति ? "

" कांहीं चुकलं का माझं ? "

" मुक्या घारीची हिंसा करून वरती हा प्रश्न विचारतां ? "

" पण भूदेवांच्या आज्ञेमुळेंच हें पाप घडलें. नाहीं का ?

" तर तर ! ! पण मग आतां त्यांच्या आज्ञेनेंच प्रायश्चितहि घ्या. "

" द्याल त्या प्रायश्चिताला माझी तयारी आहे. "

पैठण क्षेत्रीं त्या ब्राह्मणांनीं समर्थांचें क्षौर केलें.

“ झालं ना भूदेवांचं समाधान ? ”

“ झालं, आतां तुम्हीं जाऊं शकतां. ”

“ मेलेली घार अशीच टाकून ? ”

“ म्हणजे ? ”




“ आपण दिलेलें प्रायश्चित मी घेतलें; पण घार अद्याप जिवंत झाली नाहीं हें कसें ? ”

“ हा काय प्रश्न ? मेलेला प्राणी कसा उठेल ? ”

“ उठायला पाहिजे. नाहींतर प्रायश्चित घेऊन काय उपयोग ? कशाला प्रायश्चित दिलंत मला ? ”

“ हिंसा केल्यावर प्रायश्चित घ्यावें अशी वेदाज्ञा आहे म्हणून ! ”

“ वेदाज्ञा फक्त प्रायश्चित देण्यापुरतीच का आहे ? ”

" म्हणजे ? "

" मेलेली घार जिवंत करण्याबद्दल नाहीं का ? "

" खूप बोललांत स्वामीजी. आतां प्रत्यक्ष कृति करून दाखवा. "

समर्थांनीं ती मृत घार हातीं घेतली. नेत्र मिटले. तिच्या अंगावरून हात फिरवीत रामनामाचा जप सुरू केला. ती घार जिवंत होऊन आकाशांत उडून गेली. ब्राह्मणांनीं तेथून पाय काढला. समर्थ समाधानानें हंसत होते.

त्या दिवशीं नाथांच्या मंदिरांत समर्थांच्या कीर्तनाला चिक्कार गर्दी झाली. गौरांगावर भगवी कफनी, त्यावर रुळणारी टपोऱ्या रुद्राक्ष मण्यांची माळ, हिऱ्यासारखे तेजस्वी डोळे, तरतरीत सरळ नाक, कपाळावर आवाळूं. जशी मूर्ति तशीच वाणीहि गोड नि आकर्षक. चिपळ्यांच्या ठेक्यांत ते नामजपाचें महत्त्व सांगत होते —

संतसांगाती घ्या नाम। तेणें जोडेल श्रीराम ॥ धृ० ॥
नाम संसाराचें दुःख। वारुनी दावील निजरूप
जैसें औषध प्रमाण। तैसा नामाचा या गुण
होतो जीवासी आराम। तेणें जोडेल श्रीराम ॥
राम हा भावाचा भुकेला। भक्तासाठींच धांवला
भक्तांचें वैभव रामनाम। भजनीं नाचतो श्रीराम ॥

चिपळ्यांच्या ठेक्यांत समर्थ नाचूं लागले; तेव्हां श्रोतेहि देहभान विसरून गेले. कांहीं व्यक्तित्त्वानें भारले तर कांहीं वाणीला भुलले. आंबड प्रांतांतील एक ब्राह्मण कीर्तनास आला होता. त्यानें दासांच्या कपाळावरील आवाळूं पाहिलें. त्यांची स्मृति भूतकाळांत बुचकळी मारून आली.

तें जांब गांव ! तो आनंदी ओढा. पलीकडे असलेला तो प्रचंड वटवृक्ष. जांबेंतील असंख्य प्रेतें ह्या ओढ्याखालीं जळतांना ह्या वृद्ध वृक्षानें पाहिलीं. आजोबांच्या खांद्यावर खेळावे तसे असंख्य पक्षी त्याच्या फांद्यांवर खेळले. नारायण ह्याच वृक्षावर चढला नि खालच्या डोहांत त्यानें आपलें अंग निर्धास्तपणें झोंकून दिलें. त्यावेळीं कपाळावर टेंगूळ आलें तें कायम राहिलें. चेहऱ्याची ठेवण, मस्तकावरचें तें आवाळूं, तोच तर हा नारायण नसेल ? त्याच्या मनीचा संशय फिटला. कीर्तन संपल्यावर तो रामदासांजवळ जाऊन म्हणाला,

" आपलं मूळगांव ? "

…ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों. दि: ..................



" विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर – तसेच आम्हीं. "

" पण वाडवडील ? "

" प्रभु रामचंद्रच आमचे वडील. "

" आंबड तालुक्यांतील जांब गांवीं आपले कुणीं ... ? "

" जांब गांवीं ? "

" हो. कां ? त्या जांबेंत आपले कुणी नातेवाईक आहेत का ? "

जन्मगांवच्या नुसत्या आठवणीनेंहि रामदासांना गहींवर आला. जन्मदात्या आईच्या आठवणीनें त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. आतां जास्त सांगण्याबोलण्याची गरजच नव्हती. त्या वृद्ध ब्राह्मणानें सरळ विचारलें,

" ठोसरांचा का रे तूं ? "

" हो. "

" राणुबाईचा का मुलगा ? "

" ती माझी आई ! "

" बाबा, देवाच्या नादीं लागलास. कांहीं वाईट केलं नाहींस. आणखी असेंच वैभव प्राप्त करून घे. पण लग्नांतून पळालास नि रडून रडून तुझ्या आईचे डोळे गेले रे. ती म्हातारी डोळ्यांत प्राण आणून तुझी वाट पहात आहे. एकदां तिला भेटून तरी ये. मग पुढें कुठें जायचें असेल तिकडे खुशाल जा. "

" ठीक आहे. जांबेकडे मी लौकरच जाईन. "

* * *

## मातृतीर्थ

सूर्योदयापूर्वीं जांबेच्या मारुतीपुढें एका गोसाव्यानें साष्टांग नमस्कार घातला. मारुतीचें दर्शन घेऊन रस्त्यानें झपाझप पावलें टाकीत चालणाऱ्या त्या गोसाव्याकडे सारी जांब विस्फारल्या नजरेनें पहात होती. पुत्रशोकानें खंगून गेलेली एक म्हातारी ठोसरांच्या वाड्यांत अश्रु ढाळीत बसली होती. तिचा गौरवर्ण चेहरा चिंताक्रांत दिसत होता. वैधव्याच्या वसनांनीं ती वयापेक्षां जास्त पोक्त वाटत होती. त्या म्हातारीपुढें हा गोसावी येऊन उभा राहिला. खड्या स्वरांत त्यानें श्लोक म्हणण्यास सुरुवात केली—

समर्थाचिया सेवकां वक्र पाहे
असा सर्व भूमंडळी कोण आहे

जयाची लिला वर्णिती लोक तिन्ही
नुपेक्षी कदां रामदासाभिमानी
जयजय रघुवीर समर्थ ॥ —

भिक्षेकऱ्याचा घोष कानीं आल्यावर कुणीतरी भिक्षेकरी अंगणांत उभा आहे हें जाणून ती वृद्धा आपल्या सुनेस म्हणाली,

" मुली, बाहेर कुणीतरी भिक्षेकरी आलेला दिसतोय. त्याला भिक्षा घाल बरं. "

श्रेष्ठींची पत्नी हातांत भिक्षा घेऊन बाहेर आली. रामदासांनीं वहिनीला ओळखलें; पण बदललेल्या वेषभूषेमुळें वहिनीनें दिराला ओळखलें नाहीं. भिक्षा घालायला त्या जवळ आल्या तरी हा गोसावी मख्खपणें उभा राहिला. त्यांना चमत्कारिक झालें. तेवढयांत शब्द आले—

" वाढलेली भिक्षा निमूटपणें घेऊन जाणारा हा कांहीं साधा गोसावी नव्हे. " एवढें बोलून समर्थांनीं भिक्षेची झोळी खालीं ठेवली व ओटीवर जाऊन बसले.

" अग्गोबाई, हा बैरागी भिक्षा घेऊन जायचें सोडून इथेंच ठाण मांडून बसला कीं ! "

" वहिनी ! ओळखलं नाहींस मला तूं ? "

श्रेष्ठींच्या पत्नी आश्चर्यानें पहातच राहिल्या. ते शब्द राणुबाईच्या हृदय–सतारीवर जाऊन आदळले. मुलाचे शब्द आईनें ओळखले. धांवत येऊन ती म्हणाली,

" कोण रे ? माझा नारोबा का हा ? आवाज तर अगदीं त्याच्यासारखाच वाटतोय्. "

" होय आई, तुझा नारोबाच मी. "

म्हाताऱ्या राणुबाईनीं थरथरल्या हातांनीं त्याला आलिंगन दिलें. हृदयांत परमानंदाच्या ऊर्मि उसळल्या. डोळे नसल्यामुळें त्याला डोळे भरून पहाणें शक्य नव्हतें. आपल्या हातांनीं त्या त्याचें अंग चांचपडूं लागल्या. पिळदार दंड, मांड्या. भरदार छाती. कपाळावरील आवाळू. खूण पटली. मायलेकरांची भेट झाली. घरांत आनंद दाटला. राणुबाई म्हणाल्या,

" किती रे मोठा झालास नारायणा ! "

" आई, प्रथम नमस्कार करतों तुला. "

रामदास जवळ गेले नि मातेच्या चरणांना त्यांनीं स्पर्श केला.

"तुझा नमस्कार पहायला दृष्टि कुठाय् रे मला ? डोळ्यांच्या अगदीं खांचा झाल्यायत् बघ."



"बघूं बघूं." म्हणत रामदासानें त्या वृद्ध नि कष्टी नेत्रांवरून हात फिरवले. तेरा कोटी रामजप करतांना ह्याच हातांच्या बोटांनीं माळ ओढली होती. समर्थांनीं आपलें सारें प्रेम नि सामर्थ्यच त्या हातानें आपल्या आईला अर्पण केलें. समर्थांची रामभक्ति आईच्या सेवेला धांवून आली. फार मोठ्या तीर्थांत सुस्नान झाल्यासारखें तिला वाटलें. मुलाचा हात लागला नि मातेला दृष्टि आली. राणुबाईना मुलगा मिळाला नि त्यांच्या जीवनांतला अंधार निघून गेला. म्हातारीला वाटलें हा भास आहे, कीं हें स्वप्न आहे ? त्याला जवळ घेत आई म्हणाली,

"नारायणा, कुठें होतास रे इतके दिवस ?"

"रामाजवळ."

"किती मोठा झालास !"

"लग्न करून इथंच राहिलों असतों तर झालों असतों का असा मोठा ?"

"बरं, पण आतां तर झालं ना तुझ्या मनाजोगं ?"

" रागावली तर नाहींस ना आई ? "

" नाहीं बरं. अरे तुझ्यावर कशी रागवूं मी ? आईला वाटतं आपलं बाळ मोठं व्हावं, शहाणं व्हावं, तसा तूं झालास ह्यांतच मला आनंद आहे. आंधळी मी– ! मला दृष्टि दिलीस... !! "

" त्यांत काय मोठंसं आई ? "

" पण ह्या भूतचेष्टा कुठं शिकलास बाबा ? कुठलं भूत प्रसन्न झालं तुला ? "

" ऐक आई —

होतें वैकुंठीचे कोनीं । शिरलें अयोध्या भुवनीं ।
लागे कौसल्येच्या स्तनीं । तेंचि भूत गे माय ॥
मार्गीं जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी ।
पाषाणाची झाली नारी । तेंचि भूत गे माय ॥
जनकाचे रंगणीं गेलें । शिवाचें धनु भंगिलें ।
वैदेही अंगीं संचरलें । तेंचि भूत गे माय ॥
सुग्रीवाचें पालन । वालीचें निर्दाळण ।
तारी पाण्यावरी पाषाण । तेंचि भूत गे माय ॥
सर्वां भूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय ।
रामदास नित्य गाय । तेंचि भूत गे माय ॥

आई, पण आतां मी तुझा नाहीं हो. ज्यानें ह्या भूतचेष्टा मला शिकविल्या त्या रामाचा आहे मी ! लोक मला रामदास म्हणतात. तूंहि त्याच नांवानें हांक मारीत जा मला. "

मुलाचें अद्भुत कर्तृत्व आणि भव्यदिव्य शरीर पाहून या लेकरास किती पाहूं नि कुठें ठेवूं असें त्या मातेस झालें. रामदास महाराष्ट्राचे समर्थ झाले तरी आईला लेकरूंच तें !

ओसरीवर चाललेला मायलेकरांचा संवाद श्रेष्ठी संध्या करतांना देवघरांतून ऐकत होते. त्यांचें बोलणें थांबल्यावर धांवतच ते बाहेर आले. श्रेष्ठींनीं नारायणाला कडकडून मिठी मारली. नारायणानें त्यांना साष्टांग प्रणिपात केला. श्रेष्ठींच्या हातीं यज्ञोपवीत पाहून समर्थ म्हणाले,

" हें काय ? संध्या सोडून आलांत ? "

" नाहीं नारायणा, संध्येंतल्या प्रत्यक्ष गायत्रीमंत्रालाच भेटायला आलों. "

" मी लहान बालक आहे, दादांनीं असें बोलूं नये. "

" आज बारा वर्षांनीं भेटतोस नारायणा ! देवाच्या साक्षीनं तुझी भेट घ्यावी. "

" देवाच्या साक्षीनं ? "

" होय, ब्राह्मणाच्या यज्ञोपवितांत सूर्य नि गायत्री अशा दोन्ही देवता आहेत. "

" म्हणून का अर्धी संध्या टाकून आलांत ? "

" नाहीं, नाहीं, आज माझी संध्या पूर्ण झाली. "

वहिनीनें पानें वाढून ठेवलीं होतीं. प्रेमसंवादांत सर्वांचीं भोजनें झालीं. रामदासाची वहिनी त्याला आग्रहानें वाढीत होती.

लग्नांतून पळालेला नारायण आतां स्वामी रामदास होऊन ठोसरांच्या घरीं आईस भेटायला आला, ही बातमी साऱ्या जांबेभर पसरली नि त्याला पहाण्यासाठीं मंडळी गर्दी करूं लागली. त्यांना प्रवासांतील गमती व देश नि लोकस्थिति समजावून देतांना दासांचे दिवस हां हां म्हणतां जाऊं लागले.

असा प्रेमानंदाचा क्षण त्या घरांत बावीस तेवीस वर्षांनीं आज प्रथम उगवला होता. सूर्यनारायणाच्या रूपानें सूर्याजीपंतच जणूं आपल्या मुलाचें वैभव पहात होते. ठोसरांच्या ओसरीवर सूर्याचें ऊन कसें स्वच्छ नि लख्ख पडलें होतें !

महिना दोन महिने आईजवळ राहून समर्थांनीं तिला कपीलगीता समजावून सांगितली. तिला रामदर्शन घडविलें. तिचा उद्धार केला नि मातेच्या ऋणांतून ते मुक्त झाले. एक दिवस आईला ते म्हणाले,

" आई, आतां जातों मी. मला अनुज्ञा दे. "

" जा, बाळा, जा, तुला नाहीं तरी कशी म्हणूं ? जा नि जगाचा उद्धार कर. देव तुझ्या मागें आहे. "

" आई, मला आशीर्वाद दे. "

" तुझ्या कार्यांत तुला यश लाभो बाळा ! "

" आई, पण आतां राग अणुमात्र नाहीं ना ? "

" नाहीं, नाहीं. अंशमात्र सुद्धां राग नाहीं बरं, नारायणा ! "

" रामदास म्हण — "

" होय रे होय. चुकल्यें मी. लहानपणचंच नांव तोंडांत आलं बघ. "

" असूं दे. "

" जा, रामदासा, जा. तुझ्यासारखे परिपक्व झालेलें फळ आतां लोभानें मी घरीं ठेवूं इच्छित नाहीं. "

" आई, जातों मी. "

" जपून जा ! "

आईची अनुज्ञा घेऊन रामदास गंगा-प्रदक्षिणेच्या पुढील मार्गास लागले.

मुखाजवळील सप्तगोदावरीस प्रदक्षिणा करून व त्र्यंबकेश्वरास सव्य घालून गंगाप्रदक्षिणा त्यांनीं पुरी केली. तेथून टाकळी गांठली. उद्धव त्यांची मार्गप्रतिक्षा करीत होता. त्याची विचारपूस करून फिरत फिरत ते दक्षिण समुद्रतीरीं आले.

अयोध्येला रामाची जन्मभूमि पाहिली. आतां त्याच्या कर्मभूमींत ते रामेश्वरीं आले. सेतुबंध पाहिला. समुद्रतीरीं वसलेला गोकर्ण-महाबळेश्वर पाहिला. तेथून शेषाचलास जाऊन श्री व्यंकटेशाचें दर्शन घेतलें. तेथून मलबार, कारवार, म्हैसूर, कर्नाटक करीत सोईप्रमाणें पूर्व-पश्चिम बाजूंचीं स्थानें पहात पहात ते थेट कन्याकुमारीपर्यंत गेले.

जेथें जेथें ते गेले तेथें तेथें त्यांनीं साधुसंतांच्या भेटी घेतल्या, भिन्न प्रांतांतील भाषांचा परिचय करून घेतला. त्यांची निरिच्छ वृत्ति नि वैराग्यशील मूर्ति पाहून लोकांनाहि समाधान वाटलें. खणखणीत आवाज, भव्य शरीर, आकर्षक वेष आणि निःस्पृह वृत्ति ह्या त्यांच्या गोष्टींनीं लोकांवर फार मोठी छाप पडली. कोणी आदरानें त्यांच्यापुढें नतमस्तक झाले तर कोणी प्रेमानें त्यांच्याजवळ आले. शिष्यभावानें जे जवळ आले त्यांचा त्यांनीं संग्रह केला. विश्वासानें कुणी कांहीं सांगितलें तर तें ऐकून घेतलें. त्यांना धीर दिला. हिंदु समाजाच्या दुर्दैवी कहाण्या समर्थांच्या आतां चांगल्या परिचयाच्या झाल्या होत्या.

* * * **जय कृष्णे !**

शके १५६६.

आईचा निरोप घेऊन समर्थ कृष्णातीरीं आले. कृष्णाबाईनें त्यांना ओळखलें. अगदीं पटकन् ओळखलें. मुलानें ओळखण्यापूर्वी आईनें ओळखावें अगदीं तसें ओळखलें. पायांत खडावा, कांखेंत कुबडी, हातांत चिपळ्या, गळ्यांत भिक्षेची झोळी, मस्तकीं जटाभार, पाठीशीं गलोल, अंगांत भगवी कफनी

अशा वेषांत तोंडानें रामनाम घेत समर्थ प्रथम महाबळेश्वरीं आले. थंड हवा, मनोहर वनश्री, पंचनद्यांचा उगम इत्यादि महाबळेश्वराचें वैभव पाहून समर्थांना समाधान वाटलें. त्या कुबडीधर संन्याशाचें सह्याद्रीनें स्वागत केलें. त्याच्या खांद्यावर उभे राहून समर्थ सह्याद्रीचें वैभव पहात होते.

वैशाखाचे दिवस ! मोगरीच्या फुलांचा सुगंध वाऱ्याच्या झुळकेबरोबर झेंपावत होता. मदनबाण फुलला होता, झाडांचा पोपटी रंग डोळ्यांत भरत होता. हिरव्या रंगांतहि किती विविध छटा होत्या तेथें ! वसंताचा गंध नि रंग ! सृष्टीचें वैभव पूर्णपणें अवतरलें होतें तिथें !

समर्थांना सह्याद्रीचा लळा लागला. कृष्णातीरीं गर्द झाडी असून हिंस्र पशूंची तेथें फार भीति होती; पण भ्यायले तर ते समर्थ कसले ? कृष्णेच्या उगमानजीकच पुढें शंकराचें प्राचीन स्वयंभूस्थान आहे. तेथें समर्थ चार महिने राहिले. महाबळेश्वराला सह्याद्रीच्या खांद्यावर मारुति वसविला. कृष्णातीरीं समर्थांनीं स्थापन केलेला हा पहिला मारुति ! मारुतीचा जयजयकार झाला. कृष्णातटाकीं देवधर्माच्या जयजयकाराचें नवें युग उदयास आलें. कृष्णातटाकीं भिक्षेच्या निमित्तानें त्यांचा चौफेर संचार सुरू झाला. महाबळेश्वरास समर्थ चार महिने होते. त्या अवधींत त्यांनीं दिवाकर भट व अनंत भट यांस अनुग्रह दिला.

चातुर्मास्य संपवून त्यांनीं कृष्णेचा निरोप घेतला व जातांना कृष्णेची आरती केली —

सुखसरिता–गुणभरिता दुरितां निवारी । निस्संगा, भवभंगा चिद्गंगा तारी
श्रीकृष्ण निजतनु जलवेषधारी । कलिमल दलजल निर्मल साक्षत्वे हारी
जयदेवी जयदेवी जय माये कृष्णे । आलों तुझ्या उदरीं निरसी मम तृष्णे ॥ १ ॥

महाबळेश्वराहून ते वाईस आले. तेथें कांहीं दिवस राहून तेथेंहि त्यांनीं एक मारुति स्थापन केला. कृष्णेच्या परिसरांत आल्यावर समर्थांनीं जे उघड उघड उद्योग केले त्यांत मारुतीचीं मंदिरें स्थापन करणें हा त्यांचा प्रमुख उद्योग होय. वाईला कांहीं दिवस राहून पिटके, थिटे, चित्राव आदि प्रभृतींना त्यांनीं अनुग्रह दिला.

कृष्णाकांठची वाई त्यांना फार आवडली. गांवामधून वाहणारी ती कृष्णा ! महाबळेश्वराहून ते खालीं आले, तर त्यांच्या मागोमाग जणू कृष्णाहि आली. कृष्णा ही महाराष्ट्राची माता ! तिच्या थेंबाथेंबांनीं मराठी पिंड

पोसला नि पावन झाला. महाराष्ट्राचा धर्म व सदाचार ह्या कृष्णेच्या पाण्यावरच जोपासला. देहू–आळंदीची इंद्रायणी कृष्णेला मिळते तर पंढरपूरची चंद्रभागाहि अभिमानानें कृष्णेंतच विलीन होते.

" जय कृष्णे ! माझ्या कार्यांत मला यश दे ! "

वाईचा निरोप घेऊन समर्थ निघाले तेव्हां मावळतीचा सूर्य देवळाच्या शिखराआड लपला होता. वाईहून ते माहुलीला आले. येथें विष्णुतनु कृष्णा महेश्वरमूर्ति वेण्याला मिळाली आहे. जणूं दोन मैत्रिणी एकमेकींच्या खांद्यावर हात टाकून खेळायला निघाल्या आहेत ! घाटावर देवळें आहेत. पुरातन असे उंच वटवृक्ष आहेत. संगमावर अंघोळ करून महाबळेश्वरीं केलेली आरती त्यांनीं येथें पुरी केली —

हरिहर सुंदर ओघ ऐक्यासी आले । परमानंदबोध मिळणीं मिळाले
ऐसें हें संगमीं मिसळोनी गेले । रामदास त्यांचीं वंदी पाऊलें ॥ २ ॥

★ ★ ★

# मराठा तितुका मेळवावा

दक्षिणेंत पांच शाह्या नांदत होत्या. या देशाचे खरे मालक मराठे सरदार पण ते सारे गनिमांच्या नोकरींत रमले होते. त्यांच्या नोकरीसाठीं ते आपापसांत झगडत, भांडत, मारामाऱ्या नि खून सुद्धां करीत, पण आतां फार झालें नि हंसू आलें अशी स्थिति झाली होती. लोकांना ह्याचा वीट आला होता. जुलूमशाहीच्या नि गुलामगिरीच्या जाचांतून लोक बाहेर पडायला पहात होते. पण त्यांना कुणाचा तरी आधार पाहिजे होता. समर्थांच्या हें लक्षांत येऊन चुकलें होतें.

विलासीवृत्ति, ऐषारामाची आवड, दुराचारी प्रवृत्ति ह्या त्रिदोषांनीं मुसलमानी सत्ता आंतून पोकळ झाली आहे हें समर्थांनीं भ्रमंतींत हेरलें होतें. युद्धोत्सुक तरुण त्यांना गांवोगांवीं आढळत, पण ते स्वतःच्या कुटुंबाकरितां, गांवाकरितां किंवा आपल्या वतनाकरतां लढणारे होते. स्वधर्माकरतां, देवाकरतां, देशाकरतां एकत्रित येऊन लढावयाचें असतें हें त्यांना माहीत नव्हतें. जो तो स्वार्थी विचारानें भारला होता.

समर्थांनीं हें बदलावयाचें ठरविलें. लहानपणीं जगाचा अनुभव नसतांना केवळ पूर्णसंस्कारानेंच त्यांनीं ' आई चिंता करतों विश्वाची ' असें म्हटलें. पण बारा वर्षांच्या तीर्थयात्रा भ्रमंतींत लोकांची नि देशाची हीनदीन स्थिति पाहून त्यांना भरतखंडाची खरोखरच चिंता लागली. लोकांना त्यांनीं धर्म सांगितला. क्षात्रधर्म शिकविला. धर्मावरील संकटाची जाणीव दिली. धर्म मरत असतांना आपण जगावें तरी कशासाठीं? म्हणून त्यांच्यापुढें प्रश्न टाकला. महाराष्ट्राला जागे करून त्याचा अभिमान जागृत केला. समर्थांच्या देदिप्यमान नि पुण्यमय व्यक्तित्त्वाचा लोकांवर फार मोठा प्रभाव पडला.

मराठा तितुका मेळवावा । आपला महाराष्ट्रधर्म राखावा ।
येविषीं न करितां तकवा । पूर्वज हांसती
जयास जीवाचें भय वाटे । तणें क्षात्रधर्म करूंच नये
कांहीं तरी करून उपायें । पोट भरावें
मारितां मारितां मरावें । तेणें गतरुचि पावावे
फिरोनि येतां भोगावें । महाभाग्य



देवमात्र उच्छेदिला । आपला स्वधर्म बुडाला
जिण्यापरीस मृत्यु भला । ऐसें समजावें
मरण हक्क तो चुकेना । देह वांचवितां वांचेना
विवेक धरून समजेना । काय करावें तें

समर्थांच्या दिव्य वाणींतून प्रकट झालेले हे शब्द ऐकून मराठे वीरश्रीनें रसरसले. भल्याभल्यांना भेटून स्वच्छ सांगितलें, " माझ्या स्पष्ट

दा. क. ९८३८०

बोलण्यानें रागावूं नका; पण जात किंवा धर्म बदलतो तो भला नव्हे."

महाराष्ट्राला सह्याद्रि लाभला. गोदाकृष्णेचें पाणी मिळालें नि स्वधर्माचें सामर्थ्य सांगणारा समर्थांसारखा झंझावाती प्रचारकहि मिळाला. महाराष्ट्रा ! तुझी पुण्याई थोर आहे.

* * * जय जय रघुवीर समर्थ ! !

ह्या जयजयकारानें सुप्त अंतःकरणें तरारून उठलीं. समर्थांच्या तेजस्वी-वाणीनें महाराष्ट्रांत नवचैतन्य संचारलें. लोकभ्रम नाहींसा होऊन जनतेला नवी दृष्टि आली. यवनांच्या सेवेंत राजनिष्ठा वाटेनाशी झाली. स्वधर्माची सेवा करणें हाच खरा धर्म आहे ह्याची लोकांना पुरेपूर जाणीव झाली.

शके १५६६ चें सगळें वर्ष याप्रमाणें महाबळेश्वरापासून कारवारपर्यंत परिभ्रमण करण्यांत गेलें. याच काळांत महाबळेश्वर, वाई, शहापूर, चांफळ, कऱ्हाड, मिरज, कारवार इत्यादि अनेक ठिकाणीं शिष्य मिळाले. त्यांत वतनदार, अधिकारी, पाटील, कुळकर्णी असे अनेक होते. रामदासांनीं महाराष्ट्राला व्यवहारधर्म शिकविला. त्याचबरोबर धर्मस्थापनेसाठीं परकीय आक्रमणाच्या धडाडीनें प्रतिकार करण्याचीहि प्रेरणा दिली. त्यांच्या प्रक्षोभक तेजस्वी वाणीनें कृष्णेकांठीं सामर्थ्य पिकविलें. महाराष्ट्राचा आत्मा त्यांनीं पाकळी पाकळीनें फुलविला. लोकमान्य झालेली समर्थांची दिव्य वाणी त्यांच्या शिष्यद्वारा महाराष्ट्रभर निनादूं लागली.

समर्थांना महाराष्ट्रांत न्यायनीतीचें रामराज्य स्थापन करायचें होतें. रामराज्य म्हणजे केवळ परमार्थ किंवा मोक्ष देणारें राज्य नव्हे, तर ऐहिक, आर्थिक, सामाजिक ध्येयें सिद्ध करणारें राज्य ! त्यांची रामराज्याची कल्पना अशी होती. आपल्या कार्याला त्यांनीं दैवी बळाबरोबरच शारीरिक बळाचीहि जोड दिली.

विश्वाचें प्राणतत्त्व म्हणजे वायु. त्याचा अत्यंत प्रियपुत्र हनुमान. अचूक कार्यसिद्धि करणारा महावीर ! बुद्धिशाली अशी चपळ शरीरबळाची देवता ! ! समर्थांनीं लोकांना त्याची उपासना सांगितली. समर्थांच्या प्रेरणेमुळें मारुतीराय तालीम करणाऱ्यांचें आद्यदैवत झालें. महाराष्ट्रांत चहूंकडे तालमी नि आखाडे झाले. यवनांशीं पुढें झुंज खेळणारे वीर ह्या आखाड्यांत आतां शरीर कमावीत होते.

स्वधर्मावरील आपत्ति जशी सहस्रमुखी होती तशीच समर्थांची योजना पण व्यापक होती. " धीर धरा, धीर धरा " म्हणून सांगत हिंडत. शहापूर, मसूर, उंब्रज, शिराळे, मनपाडळे, पारगांव, माजगांव, बेहेगांव, शिंगणवाडी असे गांवोंगांवीं त्यांनी मारुति स्थापन केले. नव्या मूर्ति स्थापन करण्याऐवजीं मुसलमानांच्या भीतीनें ज्या मूर्ति डोहांत बुडविल्या गेल्या होत्या, त्याच वर काढून त्यांच्या त्यांच्या मूळ ठिकाणीं त्यांनीं बसविल्या. मारुतीच्या देवळांना लागून आखाडे उभे राहिले. दंड-मांड्यांच्या थोपटण्यांनीं आखाडे घुमूं लागले. तरुणांचीं अंगें मातीनें लाल झालीं. सह्याद्रीच्या गिरीकंदरांतून वीरश्रीचा नि कर्तृत्वाचा वारा वाहूं लागला. महाराष्ट्राचें हृदय वीररसानें उचंबळून आलें.

समाजाला चेतना देऊन त्याचें मूर्तस्वरूप दिसूं लागलें म्हणजे तें एकांताचा आश्रय घेत. कामापुरतें लोकांत राहावें आणि काम सुरळीतपणें चालू झालें कीं आपण अरण्यांत दुर्गम स्थळीं निघून जावें असा त्यांचा क्रम होता. माहुलीहून समर्थ जरंड्यास आले. तेथें असतांना ते नित्य माहुलीस संगमावर स्नान-संध्येस येत व पुन्हां जरंड्यास जात. पर्वतशिखरें, नदीतीरें, भुयारें, गुहा, घळी अशी एकांतस्थानें समर्थांना अतिशय प्रिय. परमेश्वराला इथें धुंडाळण्याचें त्यांना एक व्यसनच ! दिशांचा महापाट पांघरून रामाचीं पदें उशाला घ्यावींत, उन्हानें थंडीचें निवारण करावें आणि उन्हाचा त्रास सांवलीच्या आश्रयानें टाळावा हा त्यांचा आवडीचा खेळ होता.

देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा
मुलुख बडवावा बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं

अशी वाणी कुठून ऐकूं येते आहे तें कळायच्या आंत समर्थ गांव सोडून गेलेले असायचे. कारण विधर्मी प्रचारक व राजसत्ता ही जोडी त्यांच्यासमोर सामन्यास उभी होती. आपलें वाढतें सामर्थ्य तिला कळूं न देतां त्यांना वाढवायचें होतें. कुणास चाहूल लागूं न देतां स्वधर्माचा पक्ष सबळ करावयाचा होता; म्हणून गुप्तपणा हें त्यांच्या कार्याचें प्रमुख अंग होतें.

ठायीं ठायीं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा
राजकारण बहुत करावें । परंतु कळोच नेदावें ॥

त्यांच्या कार्यपद्धतीचें हें मुख्य सूत्र होतें. भ्रमंतींत त्यांनीं लोकांचे दोष झांकले व उत्तम गुणांना प्रोत्साहन दिलें. मुलाच्या चालीनें चालावें आणि

त्याच्या मनाला पटेल नि त्याला समजेल तसें बोलावें या पद्धतीनें समर्थ अखंड समुदाय जमवीत चालले. धर्माबरोबरच ते राजकारणाचे फांसे टाकीत होते. अध्यात्मशक्तीची कांस धरूनच त्यांनीं जनतेला आत्मस्वरूपाची जाणीव करून दिली. निराश होऊं नये, यत्न हाच देव मानावा, जितका प्रयत्न तितका लाभ. ईश्वरावर श्रद्धा असेल आणि प्रयत्नांची जोड लाभेल तर–तरच महाकार्यें घडतील हा त्यांचा मुखमंत्र होता.

सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें
परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे.

अपाय दूर करण्यासाठीं लोकांना ते उपाय सुचवीत. अडलेल्यांची वाट मोकळी करून देत. अन्यायाची दाद लावून संकट दूर करीत. घाबरलेल्यांना धीर देत. कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत. भ्रांत कल्पनांचीं जळमटें झाडून टाकीत, हें कार्य करीत असतांनाच वाटेंत भिक्षा मागत आणि विश्रांतीसाठीं एकांतांतली एखादी घळ गांठीत.

## * * * आयुष्याचा नाश होतो राम कां रे म्हणाना

समर्थ कृष्णा–कोयनेच्या प्रीतिसंगमावर स्नानसंध्येस येत व तेथून परत शहापूरच्या डोंगरावर मुक्कामास जात. जातांना वाटेंत चार घरीं भिक्षा मागणें होई.

त्या दिवशीं ऊन रणरणत होतें. सतीबाईच्या दारांत उभे राहून समर्थांनीं एक श्लोक म्हटला,

शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यज्ञ होतसे
शक्ति-युक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंति नांदती
जयजय रघुवीर समर्थ ॥

सतीबाई भिक्षा वाढायला बाहेर आल्या. तिला पाहून समर्थ म्हणाले,

" श्रीराम जयराम जयजयराम ! "

" काय रे बाबा इथें रामाचें नांव कशाला घेतोस ? "

" कांहीं चुकलं का माझं आई ? "

" आमचं भरलं घर आहे म्हटलं. "

" मग ? "

" अरे शेवटच्या यात्रेच्या वेळींच ' राम ' म्हणतात.

काय उत्तर द्यावें म्हणून समर्थ विचारांत पडले. ते नुसते हंसले तेव्हां बाई म्हणाल्या,

"भिक्षा कां मागतोस बाबा ?"

"ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
प्रत्यहीं मागणें भिक्षा । मिळे न मिळे तरी ॥"

शिव्या नि भिक्षा झोळींत टाकून समर्थ पुढें गेले.

दुसऱ्या दिवशीं समर्थ भिक्षेस गेले असतां सगळीकडे शुकशुकाट दिसला. "श्रीराम जयराम जयजयराम" हें भजन झालें, तरी शिव्यांचीहि भिक्षा येईना. समर्थांनीं ओसरीवरून डोकावून पाहिलें तर सर्व मंडळी खिन्न बसलेली. त्यांनीं कनवाळूपणें विचारलें,

"आज आपण सर्वजण खिन्न कां ?"

"तुझा राम भोंवला बाबा."

समर्थांना हंसू आलें. सतीबाईनीं विचारलें,

"आपणांला हंसू येतें ?"

"हंसूं नको तर काय करूं ?"

"कां रे बाबा ?"

"रामनामानें अनेकांचीं संकटें गेलीं आणि त्या नामानें आपणास संकटांत पाडलें हें कसें ?"

"मग आमचेंहि संकट दूर करा पाहूं."

"तुम्हीं रामनाम घ्या नि पहा संकट दूर होतें कीं नाहीं तें ?"

समर्थ निघून गेले. गांवकीच्या कामांत कांहीं घोटाळा केल्यामुळें सती–बाईचे यजमान कमळाकरपंत यांस कऱ्हाडच्या ठाणेदारानें पकडून विजापुरास नेलें होतें. समर्थांनीं ही माहिती काढली. कऱ्हाडचा ठाणेदार त्यांच्या ओळखीचा होता. समर्थांनीं मध्यस्थी करून कमळाकरपंतांना अकरा दिवसांच्या आंत सोडवून आणलें. रामनामाला अशुभ मानणारी बाई समर्थकृपेनें पुढें मोठी रामभक्त झाली. त्यानंतर तेवढेंच घर नव्हे तर सारा गांव समर्थांच्या भजनीं लागला. लोकांना त्यांचें स्वरूप दैवी भासलें. आपल्या दुःखद कहाण्या लोकांनीं त्यांना सांगितल्या. गांवोगांवचे लोक त्यांच्याभोंवतीं गोळा होऊं लागले. समर्थांच्या कार्याला नवेनवे पायिक मिळाले. कळवळलेल्या अंतःकरणांनीं समर्थ त्यांना धीर देऊं लागले.

शहापुराहून चांफळ खोऱ्यांत समर्थांच्या फेऱ्या वरचेवर होऊं लागल्या. चांफळखोऱ्यांत शिवाजीमहाराजांचे नरसोमलनाथ अंबरखाने हे प्रमुख होते. त्यांना व आनंदराव देशपांडे यांना समर्थांनीं अनुग्रह दिला. कऱ्हाडास सयाजीपंत देशपांडे यांची बालविधवा कन्या आक्का हिलाहि समर्थांनीं रामाची उपासना दिली.

कऱ्हाडहून समर्थ मिरजेस गेले. सकाळची वेळ होती, कोंबडा आरवत होता. पांखरांची किलबिल, जात्यांची घरधर, सडा घालतांना होणारा पाण्याचा आवाज ह्यांनीं सकाळ निनादली होती. बांसरीवर कुणीतरी भूपाळीचे आलाप काढीत होते. गोपजीपंत देशपांडे ह्यांच्या वाड्यासमोर महाराष्ट्राचा हा फिरता प्रचारक उभा राहिला नि खड्या स्वरांत श्लोक म्हणूं लागला —

घनश्याम हा राम लावण्यरूपी
महाधीर गंभीर पूर्ण प्रतापी
करी संकटीं सेवकांचा कुडावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा
जयजय रघुवीर समर्थ !

समर्थांची ललकारी ऐकून वेणा लगबगीनं बाहेर आली.

"थांबा हं जरा. भिक्षा घेऊन आत्तां येतें मी।"

"गोमातेची नि तुळशीआईची पूजा झालेली दिसत्येय्."

"हो, आतांच आटोपली माझी पूजा."

"नेहमीं करतां पूजा ?"

"हो, पूजा करणं आवडतं मला."

"छान, छान, सकाळींच पूजा झालेली पाहून फार समाधान वाटलें मला. देवाची पूजा ही आत्मारामाची पूजा आहे."

वेणा तटस्थतेनं ऐकत होती. स्वामींना पाहातां पाहातां ती स्वतःला विसरून गेली. तिची समाधि मोडून स्वामी म्हणाले,

"इथं दूध मिळेल का थोडें ?"

"हो."

"घेऊन येतां ?"

"आत्तां येतें. आपण थांबावं जरा."

वेणा लगबगीनं आंत गेली नि आपल्या सासूला म्हणाली,

" बाहेर समर्थ आले आहेत. थोडं दूध मागत आहेत. "

सासू डाफरून म्हणाली,

" त्यांना काय होतंय मागायला. घरांत दूध थोडेसेंच आहे नि जें आहे तें मारुतीच्या नैवेद्याकरतां ठेवलेलें आहे. देतां येत नाहीं म्हणून सांग त्या गोसावड्याला — "

" असं कसं सांगू मी त्यांना ? आपण मोठ्या आहांत. आपल्याशीं काय न कसें बोलावें हेंच समजेनासें झालेंय् मला. पण इतकंच सांगतें कीं स्वामींना दूध देणं म्हणजे खऱ्या मारुतीलाच दूध देण्यासारखं आहे तें. बघा माझं वेडीचं पटलं तर. "

" तुझा तसा भाव असेल तर माझं कांहीं म्हणणं नाहीं. बरं, दे त्यांना दूध नेऊन — "

सासूबाईत एकदम फरक पडलेला पाहून शंकित मनानें वेणेनें विचारलें,

" खरंच देऊं ?"

" हो, खरंच दे. त्यांना दिलंस तरी पावेल देवाला. "

दूध तापवून त्यांत साखर घालून वेणा बाहेर आली तर समर्थ निघून गेले होते. तिला हळहळ वाटली.

दुसऱ्या दिवशीं समर्थ पुनः आले. वेणा अंगणांत भागवत वाचीत बसली होती. समर्थांनीं विचारलें,

" मुली, कुठला ग्रंथ वाचीत आहेस ? "

" भागवत ! "

" समजतो तुला तो ग्रंथ ? "

" प्रयत्न करते. "

" ग्रंथ प्रयत्नांनीं समजतो म्हणतेस ? "

" परिचयानीं माणसाचं अंतरंग समजतं, तसाच वाचनानें ग्रंथहि समजतो. "

" चांगली कल्पना आहे. भागवत वाचून झाल्यावर दिवसाकांठीं थोडासा रामजपहि करीत जा. रामनाम मोठें गोड नि सोपें आहे. "

" जशी आज्ञा ! "

" येऊं मी आतां— "

" काल दूध आणीपर्यंत निघून गेलांत. आज थांबणार ना ? "

" देणारा देत असल्यावर मी कशाला नको म्हणूं ? "

" काल आपण गेलांत म्हणून किती वाईट वाटलें मला. "

" प्रभूच्या मनांत काल मी इथें दूध घ्यावें असें नव्हतें. तुला वाईट वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. चल, लवकर घेऊन ये दूध. सूर्य माथ्यावर आला. मला पुढील दारीं भिक्षेला गेलें पाहिजे. "

" आतां घेऊन येतें. पण उशीर लागला तरी कालच्यासारखं निघून मात्र जायचं नाहीं बरं का स्वामीजी— "

" माथ्यावर दिसणारा हा सूर्य जरी अस्तास गेला तरी दूध प्यायल्याशिवाय हालणार नाहीं हा अतिथी इथून. मग तर झालं ? "

वेणा दूध आणायला आंत गेली नि " रघुपति राघव राजाराम–पतित पावन सीताराम " हें भजन म्हणत समर्थांनीं चिपळ्यांचा ठेका धरला.

वेणाबाईनें आणलेलें दूध घेऊन समर्थ निघून गेले.

## * समर्थ पंचायतन

तळहातास काळफोड होऊन त्या वेदनांनीं जयरामस्वामी तळमळत होते. वैद्यबुवांनीं परीक्षा करून सांगितलें,

" असली व्याधि चक्रवर्ती किंवा महायोगी यांनाच होते. "

" आम्हीं चक्रवर्ती नाहीं. "

" पण महायोगी आहांत. "

" आतां ह्या रोगाला औषध ? "

" ह्या रोगाला औषध नाहीं. "

जयरामस्वामींनीं डोळे मिटून नामस्मरण करण्याचा प्रयत्न केला; पण यातना इतक्या होत्या कीं तोंडून नाम येईना. त्यांना समर्थांची आठवण झाली. योगायोग असा कीं भ्रमंति करीत करीत समर्थ त्याचवेळीं नेमकें तेथें हजर झाले. त्यांनीं नित्याची आरोळी दिली,

" जय जय रघुवीर समर्थ ! "

जयरामस्वामींनीं आठवण काढली तर समर्थ दारांत उभे ! त्यांची विकलांग अवस्था पाहून समर्थ म्हणाले,

" काय झालें रे जयरामा ? "

" राघोबा, ह्या व्याधीनें माझी अगदीं त्रेधा उडाली बघ. "

" नामस्मरण कां करीत नाहींस ? "

" नामस्मरण नाहीं, अनुसंधान नाहीं, कांहीं होत नाहीं. "

" कां ? "

" शरीरांत आगीचा नुसता डोंब उठलाय. कांहीं सुचतच नाहीं बघ. "

" ठीक आहे. अगदीं काळजी नको तुला ! "

" पण तुला कसें कळलें कीं मी दुःखांत आहे म्हणून ? "

" आठवतंय् तुला ? "

" काय ? "

" गोकुळाष्टमीच्या उत्सवासाठीं चिंचा काढण्याकरतां तूं झाडावर चढला होतास— "

" नि मी खालीं पडलों. "

" त्यावेळीं माझें पण अंग ठणकत होतें बघ. आठवतंय् ? "

" अशी मधुर आठवण कोण विसरेल, राघोबा ? "

गप्पागोष्टींत जयरामस्वामींना दुःखाचा विसर पडला. त्यांचा निरोप घेऊन समर्थ पुढें निघाले. वडगांवचे जयरामस्वामी, निगडीचे रंगनाथस्वामी, ब्रह्मनाळचे आनंदमूर्तिस्वामी नि भागानगरचे केशवस्वामी या चौघांवर रामदासस्वामींचा विशेष जीव होता. महाराष्ट्रांत या पवित्र पंचायतनाला फार मोठा मान होता.

## * रागावलास का रे रंगनाथ ?

रानांतून भटकतांना रंगनाथस्वामी भेटले. रंगनाथस्वामी आपल्याजवळ नेहमीं तीरकमठा बाळगीत. भेट झाल्यावर समर्थ म्हणाले,

" बाबारे, मारक शस्त्र हातीं बाळगतोस पण तारक युक्ति माहीत आहे का ? "

समर्थांच्या बोलण्याचा आशय रंगनाथस्वामींच्या लक्षांत आला नाहीं. म्हणून त्यांनीं त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहिलें.

तेव्हां समर्थांनीं एक घार मारली नि तिच्याकडे अमृत नजरेनें पाहिल्यावर ती जिवंत होऊन उडून गेली. तो प्रकार पाहून स्वामी आपला तीरकमठा फेंकून देऊं लागले. समर्थ हंसत म्हणाले,

" रागावलास का रे रंगनाथ ? "

" नाहीं रे राघोबा, पण वाटायला लागलं कीं काय ह्याचा उपयोग ? "

" नसेना का उपयोग ? पण संग्रहीं असला तर त्यांत काय बिघडलें ? " आठवण म्हणून रंगनाथस्वामींनीं त्यांची जपाची माळ मागितली नि समर्थांनीं ती त्यांना मोठ्या प्रेमानें दिली.

दया, क्षमा, शांति, शुद्ध चारित्र्य, मधुर वाणी, नम्रता इत्यादि गुणांमुळें जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, केशवस्वामी आणि समकालीन थोर मंडळीहि समर्थांना फार मान देत.

## * कोणी वंदा कोणी निंदा

कांहीं दिवसांनीं फिरत फिरत समर्थ कोल्हापूरला आले. अंबाबाईच्या देवळांत त्यांचीं रोज कीर्तनें होत. वेणाबाई मिरजेहून कोल्हापूरला आल्या होत्या. त्या नियमानें कीर्तनाला येत असत. समर्थांच्या वाणीनें त्यांना मोहिनी घातली होती. त्यांच्या पायांवर डोकें ठेवून आपणांस अनुग्रह द्यावा अशी समर्थांना त्यांनीं विनंति केली. ती मान्य करून समर्थांनीं त्यांना राममंत्रोपदेश दिला.

श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम ॥

समर्थांनीं वेणाबाईंना मंत्र दिला आणि इकडे गांवच्या चवाठ्यावर चर्चा सुरू झाली. वेणाच्या वडिलांच्या कानांवर ती अभद्र चर्चा गेल्यावर तिला हांक मारून ते म्हणाले,

" वेणा, आजपासून तूं कीर्तनाला जाऊं नकोस. "

" कां ? "

" मी सांगतों म्हणून — "

" कांहीं चुकलं का माझं ? "

" तुझं नाहीं चुकलं. पण तुला जन्म देऊन मीच चूक केली. "

" इतकं रागवायचं कारण काय बाबा ? कांहीं चुकलं असलं तर फोडून काढा मला. पण असं मोघम बोलून छळूं नका. असं झालं तरी काय माझ्या हातून आज ? "

" वेणा, काय सांगू पोरी ? "

" सांगा, काय घडलं असेल तें सांगा ! "

" वेणा, बालवयांत तुला वैधव्य आलं. देवाकारणीं तूं वेळ घालवूं

लागलीस, म्हटलं ठीक आहे. पोरीचा तेवढाच वेळ जातो आहे; पण आतां माझ्यानं नाहीं ग सहन होत."

"झाल तरी काय इतकं? कुणी बोललं का तुम्हांला?"

"काय सांगू बाळ? सारा गांव बोलूं लागला आहे ग. कुणाच्या म्हणून तोंडावर हात ठेवूं मी? माझ्यासमोर बोलायची कुणाची ताकद नाहीं. पण माझी पाठ फिरली कीं बोलतात. सकाळींच रस्त्यानें जातांना ऐकलं —"

"काय ऐकलंत सकाळीं?"

"देशपांड्याची तरुण विधवा मुलगी गोसावड्याच्या मागें लागली आहे म्हणून —"

"बाबा!"

"सांगतांनाहि शरम वाटते पोरी. पण तुला कळावें म्हणून सांगावें लागलें मला."

"आपण शुद्ध असल्यावर लोक कांहीं का बोलेनात; आपण कशाला त्याची पर्वा करावी, बाबा?"

"मला गांवांत राहायचें आहे पोरी."

"मीराबाईला नाहीं का लोक वाटेल तसे बोलले?"

"मोठ्या लोकांच्या मोठ्या गोष्टी आहेत त्या"—

"खरोखरच मीरा खूप मोठी होती. पण तिला मोठं म्हणून आपण नुसतं—"

"पुरे झाला तुझा शहाणपणा!"

"हें शहाणपण नाहीं. रामनामानें अंगीं येणारें वेडेपणच आहे हें." समर्थ कालच म्हणाले, ह्या रामाचें भूत एकदां मागें लागलें कीं त्यापासून सुटका नाहीं.

रामनामाविण मज कळेना। कोणी वंदिती कोणी निंदती।
त्रास मी त्यांची पाहीना — हृदयीं धरले सद्‌गुरु चरण
प्राणांतीहि विसंबेना — वेणीचे निजधन रामचि जीवन
होणार ते का सुखें होईना —"

"वेणा, माझ्या घरीं राहावयाचें असेल तर तुझे हे देवाचार थांबलेच पाहिजेत."

तेवढ्यांत वेणाच्या कानांवर ' जयजय रघुवीर समर्थ ' समर्थांची हांक आली आणि तीरासारखी वेणा बाहेर धांवली. समर्थांचे पाय घट्ट धरून ती म्हणाली,

" घरापासून दारापर्यंत सर्वांनीं मला बोलायला सुरुवात केली आहे. गांवांतला प्रत्येकजण चोंच मारतो आहे. आतां मला इथं राहायचं नाहीं. आपला अखंड सहवास घडावा हीच माझी इच्छा आहे. आपण मला बरोबर घेऊन चला. "

शब्द थांबले नि अश्रु सुरू झाले.

" जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें। जनीं वंद्य ते सर्व भावें करावें ॥ लोकांच्या निंदेकडे लक्ष न देतां तुझी रामभक्ति तूं चालू ठेव. "

" आपणांबरोबर येऊनच मी रामसेवा करीन. "

" तशी वेळ अजून आली नाहीं. प्रभुआज्ञा झाली कीं मी तुला जरूर घेऊन जाईन माझ्याबरोबर. "

" ही जननिंदा नाहीं हो सहन होत मला. "

" जननिंदा सहन करणं शिकावं लागतं. तुला शिकलं पाहिजे, वेणा तुला शिकलं पाहिजे. ज्यांचं भागवत तूं वाचतेस ते तर किती शांत होते. तुझा रामजपच जननिंदेचें हें हलाहल सौम्य करील. "

समर्थ गेल्यावर चिपळ्या वाजवीत वेणानें भजन सुरू केलें नि भजनाच्या अनिर्वाच्य सुखांत ती बुडून गेली.

* **जयजय रघुवीर समर्थ**

कोल्हापूरला अंबाबाईच्या देवळांत सुभेदार पाराजीपंत बर्वे देवीच्या दर्शनाला आले होते. समर्थांची वाणी कानांवर पडतांच ते अंमळ उभे राहिले, पण वाणीनें मोहीत होऊन कीर्तन संपेपर्यंत ते थांबले. समर्थांच्या कीर्तनाला आणखी एक श्रोता लाभला. पुढें पाराजीपंत बर्व्यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला. पाराजीपंतांची बहीण रखमाबाई व तिचीं दोन मुलें अंबाजी व दत्तात्रेय या तिघांना अनुग्रह देऊन समर्थांनीं आपल्याबरोबर घेतलें. पुढें कऱ्हाड प्रांतीं शिरगांव येथें मठ स्थापन करून रखमाबाई व दत्तात्रेय यांना तेथें ठेवलें. अंबाजीस मात्र आपल्या सोबत घेतलें. अंबाजी समर्थांचा उजवा हात बनला व त्यांच्याबरोबर तो नित्य राहूं लागला.

समर्थांचा शिष्यसंप्रदाय वाढूं लागला. मठांची संख्याहि वाढूं लागली. तंजावरला भीमस्वामी, शिरगांवला दत्तात्रेयस्वामी, इंदूरबोधनला उद्धव गोसावी, कण्हेरीला वासुदेवस्वामी, भालगांवला त्रिंबकराज, तीसगांवला दिनकरस्वामी, धोंडाईगवराईला मुसळराम, पारगांवला शंकर गोसावी अशा अनेक ठिकाणीं मठ स्थापन झाले नि त्यावर महंत नेमले गेले. ते महंत समर्थांच्या कार्याचा प्रचार करूं लागले. त्यांचे मठ म्हणजे त्याकाळचीं लोकशिक्षणाचीं विद्यापीठेंच तीं ! प्रत्येक मठांत लेखनक्रिया अखंड चालू असे. आपआपल्या आवडीप्रमाणें इतरांचेहि ग्रंथ त्यांचे शिष्य लिहून काढीत व मठांत त्यांचा संग्रह करीत. मठांतला महंत म्हणजे त्याग, संयम, सेवा, व चातुर्य ह्यांचा मूर्तिमंत पुतळाच. मठांतून प्रथम रामकथा सुरू झाली; आणि पुढें हरिकथेंतून राजकारण सुरू झालें.

मराठी राज्याचें स्वप्न उराशीं बाळगून कृष्णातीरीं एक समर्थ आले. पण एका वर्षांत एकाचे अनेक समर्थ झाले. एका बिंबाचीं अनेक बिंबें दिसूं लागलीं. समर्थांच्या खांद्याला खांदा लावून त्यांचा शिष्यवर्ग काम करीत होता. महाराष्ट्रांतल्या मुसलमानी सत्तेला कीड लागली होती. समर्थांनीं हें ओळखलें. परिस्थितीचा फायदा घेण्याचें त्यांनीं ठरविलें. समर्थांच्या कळकळीच्या तेजस्वी उपदेशानें महाराष्ट्र खडबडून जागा झाला. महाराष्ट्राच्या गांवागांवांतून गर्जना उठूं लागल्या —

जयजय रघुवीर समर्थ !
जयजय रघुवीर समर्थ !!

*

## समर्थांना भेटायचं !

मुसलमानी सत्ता ढांसळण्याच्या पंथाला लागली होती. फक्त ती नामशेष करण्याचा प्रयत्न कुणीतरी करणें आवश्यक होतें. लोक यावनीसत्तेच्या कचाट्यांतून सुटूं पहात होते, फक्त त्यांना कुणाचा तरी आधार हवा होता. तो मिळाला. त्याचें जन्मस्थान शिवनेरी ! त्याचे गुरु दादाजी कोंडदेव. शिवरायानें शहाजीबरोबर हिंडतांना शाही अन्याय व अत्याचार हेरले. आपण लोकांचा राजा व्हावं, आपलं स्वतःचं राज्य असावं असा त्यानें ध्यास घेतला. जिवाभावाचे सोबती त्यानें गोळा केले. तोरणा घेऊन स्वराज्याचें तोरण बांधलें. नवेनवे किल्ले घेण्याचा नि बांधण्याचा सपाटा चालविला.

शिवाजी महाराजांनीं रायगड, सिंहगड, पुरंदर, चाकण हे किल्ले घेऊन स्वराज्य स्थापण्यास आरंभ केला. तालमींत शरीर कमावलेला मावळा बारा वाटांनीं पुण्यामध्यें गोळा होऊं लागला. समर्थांच्या शिष्यांकरवीं त्यांच्या कानीं ह्या बातम्या आल्या होत्या. शिवाजीच्या स्वाभिमानाच्या व प्रखरतेच्या गोष्टी त्यांना ऐकण्यास मिळाल्या होत्या. महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून 'हरहर महादेव' अशी घुमणारी गर्जना त्यांनीं ऐकली होती. त्यांनीं ठरविलें शिवबाच्या मागें आपण उभें राहायचें. गांवोगांवीं भगव्या कफनींतले रामदासी धर्मप्रसार करीत आहेत म्हणून शिवबांच्या हेरांकरवीं त्यांच्याहि कानीं आलें होतें. 'जय जय रघुवीर समर्थ' ही रामदासी घोषणा त्यांच्याहि कानीं पडली होती. शिवबांनींहि ठरविलें समर्थांना भेटायचं!

* **तुझें नांव कल्याण**

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनांत जेव्हां मरगळलेली अवस्था आली तेव्हां भोंसल्याच्या कुळांतील शिवाजी आणि ठोसरांच्या कुळांतील नारायण ही जोडी बाहेर पडली. एकानें सह्याद्रीच्या कडेपठारांतून 'हरहर महादेव' ही गर्जना घुमविली, तर दुसऱ्यानें गांवोगांवीं 'जयजय रघुवीर समर्थ' या मंत्राचा उद्घोष केला. महाराष्ट्राची पुण्याई थोर होती!

अनेक शिष्य होऊन संप्रदाय वाढत चालला तेव्हां आतां रामनवमीचा उत्सव करावा असें समर्थांना वाटूं लागलें. महाराष्ट्राची स्थिति रावणाच्या बंदिशाळेसारखीच झाली होती. तेव्हां देवांचा ंद तोडणाऱ्या कोदंडधारी रामाचाच उत्सव करावा असें त्यांच्या मनानें घेतलें. त्याकरितां त्यांनीं मसूर हें गांव पसंत केलें. कारण मसूर हें गांव विजापूर प्रांत व पुणें ह्यामध्यें फार महत्त्वाचें ठाणें होतें. मसूर परगणा शहाजीराजांस जहागीर होता. मसूरच्या कोटांत त्यांचें ठाणें होतें. सर्व बाजूंनीं विचार करून समर्थांनीं रामाचा उत्सव इथें मोठ्या धडाक्यानें सुरू केला. उत्सवांत रोज सकाळ-संध्याकाळ छबिना निघावयाचा. एकदां रथप्रदक्षणा व्हावयाची त्या मार्गांत एका जुनाट आंब्याची फांदी आडवी आली. ती फांदी तोडावी तर वरिष्ठांच्या हुकुमाशिवाय सरकारी झाडांस हात लावायचा नाहीं, अशी ताकीद तेथील आदिलशाही कमाविसदारानें दिली. उत्सवांत विघ्न आलें म्हणून समर्थ अस्वस्थ झाले.

पण तोल न सोडतां स्वामी स्वस्थचित्त राहिले. बादशहाच्या दरबारीं जाऊन त्यांनीं फांदी तोडण्याची परवानगी आणली. त्यांचें सरकारांतील वजन लोकांचें मन वेधून घेण्यास उपयोगी पडलें. फांदी तोडण्यास अंबाजी झाडावर चढला. समर्थ चेष्टेंत म्हणाले,

" पुढें बसून मागें तोड हो. "

" जशी आज्ञा, " म्हणून अंबाजीनें खरोखरीच तशा प्रकारें फांदी तोडली. अंबाजी फांदीसकट विहिरींत पडला. सर्व लोक घाबरले. स्वामींनीं वरतून विचारलें,

" अंबाजी कल्याण आहे ना ? "

" आपल्या कृपेनें कल्याण आहे स्वामी " आंतून उत्तर आलें. त्या दिवशीं समर्थांनीं त्याचें नांव कल्याण ठेवलें व उत्सवांत अकरा मण गूळ वांटला.

कल्याण म्हणजे स्वामींचा पट्टशिष्य. स्वामींची कुठलीहि आज्ञा तो खालीं पडूं देत नसे. स्मरण बळकट, शरीर दणकट व अक्षर वळणदार. तो दमाचा व धीराचा गडी होता. तो नेहमीं सावध व दक्ष असे. जीव धोक्यांत घालून स्वामी सांगतील तीं कामें तो बिनधोक करी. स्वामींचा त्याला लळा होता व स्वामींचाहि त्याच्यावर फार जीव होता.

## * निश्चयाचा महामेरू

उत्सवांच्या गडबडींत त्याला बाजूला घेऊन समर्थांनीं शिवबास एक पत्र लिहिण्यास बसविलें. समर्थ सांगत होते व वळणदार अक्षरांत कल्याण लिहीत होता.

अमृतांत बुडालेला एक सुवर्ण दिवस उगवला. महाराजांना समर्थांचें एक अमोल पत्र आलें. आकाशानें जणूं महासागराला पत्र लिहिलें. दैवी तेजानें पराक्रमाला पत्र लिहिलें :

" निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।
या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हां कारणें

कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले
कित्येकांसी आश्रय जाले । शिवकल्याण राजा
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें
ऋणानुबंधे विस्मरण जालें । काय नेणूं
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे
उदंड राजकारण नटलें । तेणें चित्त विभागलें
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥

हे शिवबा, कुळधर्म, जातिधर्म सांभाळणारे पुष्कळ आहेत पण महाराष्ट्रधर्म सांभाळणारे मला फक्त तुम्हीं एकटेंच दिसतां. ''

पत्रामागची तेजस्वी, विरागी नि भव्य महापुरुषाची प्रतिमा महाराजांच्या–पुढें उभी राहिली नि महाराजांचें मस्तक विनम्र झालें.

समर्थ रामदासस्वामी ! परमेश्वराचे एक महान सेवक ! ! महातपस्वी नि महर्षि ! ! ! त्यांचें पत्र आलें नि आमंत्रणाप्रमाणें मसूरच्या वाटेकडे शिवबाचे घोडे दौडत सुटले.

*

## शिवबा आला

मसूरच्या उत्सवाला शिवबा आला. रामाच्या उत्सवाला चैतन्य आलें. धर्माच्या भेटीला वीरश्री आली.

मसूरच्या उत्सवाला मराठ्यांचा शिवबा आला म्हणून सगळ्यांना किती आनंद झाला. ज्ञानी, विरक्त, बैरागी, योगी, सामान्य प्रजा सर्वांनाच आनंद झाला. भारावून, गहींवरून महाराजांचें स्वागत झालें.

डोक्याला मंदील, कमरेला भवानी तलवार, छातीवर मोत्यांची माळ, कपाळाला उभें गंध, गरुडासारखें नाक, काळीभोर दाढी, पाणीदार डोळे असा मराठ्यांचा राजा रामाच्या उत्सवाला आला. लोकांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. समर्थ–शिवबाची भेट झाली. समर्थांनीं महाराजांना राज्य–व्यवहारासंबंधीं, लोकसंग्रहासंबंधीं अत्यंत मोलाचीं सूत्रें सांगितलीं. उभयतांचें तत्त्वज्ञान नि कार्य म्हणजे महाराष्ट्रधर्माचा साकार आविष्कारच होय.


गहिंवरून स्वामीजी म्हणाले,

मनीं धरावें तें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें

कृपा केलीया रघुनाथे । प्रचीती येते

समर्थांच्या तोंडून आनंदानें शब्द उमटेनात.

समर्थांची भव्य मूर्ति पाहून शिवाजी महाराज स्मिमित झाले. त्यांनीं त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून गुरुप्रसाद मागितला. त्यांची पाठ थोपटीत श्री रामदास स्वामी म्हणाले, " शिवबा,



एकच मंत्र जपावा-जनकल्याणार्थ
जयजय रघुवीर समर्थ ॥ धृ० ॥

वीर असे तूं श्रीरामासम
शौर्य कीर्तीचा तुझ्यांत संगम
दूर करी तूं भंवतीचे तम
हनुमंतासम धांव घेई तूं संकटसमयार्थ ॥ १ ॥

धर्मभूमीचा हो तूं भ्राता
दीन जनांचा हो तूं त्राता
समरीं होई खलजन हर्ता
तुझ्या कीर्तीचे पवाडे गातील शाहीर सर्वत्र ॥ २ ॥

चूडामणी तूं राजमण्यांचा
लोकपाळ तूं तुझ्या प्रजेचा
हो सैनिक तूं रणशास्त्राचा
स्वातंत्र्याचा रवि उगवला तुझ्या स्वागतार्थ ॥ ३ ॥

सत्य आणखी सत्व राखी तूं
स्वधर्माचा बांधी सेतू
पुरवील सारे प्रभु तव हेतू
सह्यगिरी हा येईल तुझिया सदैव साह्यार्थ ॥ ४ ॥

ज्योतीमय तूं मिळवूनी ज्योती
वाढव आतां धर्म मराठी
तुझ्यामागुनी जन हे कोटी
घराघरांतून उद्यां घुसूं दे मंगल मंत्रार्थ ॥ ५ ॥

भगवा ध्वज हा घे तूं हातीं
तूंच राखी रे त्याची कीर्ति
धर्माची कर आज जागृति
राज्यलक्ष्मी रक्षण्यास्तव तूं रणांत हो पार्थ ॥ ६ ॥

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्र .................... दि: ....................
क्रमांक .................... नों दि ....................

# मावळांतील राजकारण

१५६७ मधील मावळांतील राजकारणें जोरांत चालली होतीं. त्या राजकारणाला साह्यभूत होतील अशा व्यक्ति व पोषक असे प्रसंग शोधणें हाहि शिवाजी महाराजांचा मसूरच्या श्रीरामाच्या उत्सवास येण्याचा हेतु असावा. राजकारणाबरोबर तीर्थप्रसाद मिळेल आणि आरंभिलेल्या कार्यास श्रींचा आशीर्वाद मिळेल. समर्थांची तेजस्वी मूर्ति, धगधगीत वैराग्य, सप्रचीत वक्तृत्व, भक्तिज्ञान पाहून शिवबाला धन्यता वाटली. उलट, शिवाजीची अपूर्व तेजस्विता पाहून समर्थहि विस्मित झाले. उपासना पुढें करून आपल्या धर्मोद्धाराच्या कार्यांत देशमुख, देशपांडे, कुळकर्णी, सुभेदार इत्यादि लोकांना गोंवून घेणाऱ्या समर्थांना शिवरायाच्या तेजस्वी व सखोल कर्तृत्वाची ओळख तेव्हांच झाली. तीर्थयात्रा करीत देशभर परिभ्रमण करीत असतां कोठें दिसले नाहींत असे धर्मसंस्थापनेस आवश्यक असलेले गुण त्यांना तरुण शिवबाच्या ठिकाणीं दिसले. मसूरच्या रामाच्या साक्षीनें समर्थांचें ब्रह्मतेज नि शिवाजी महाराजांचें क्षात्रतेज ह्या दोहोंचा सुंदर संगम झाला. शिवबानें समर्थांचा निरोप घेतला तेव्हां मनाशीं खूणगांठ बांधली कीं त्यांच्या कांखेंत कुबडी दिसते ती दिसते तितकी भाबडी नाहीं. ती शस्त्रगर्भा भगवती आहे !

*

### समर्थांचें राजकारण

राजकारणांत पडलेल्या लोकांस त्यांच्या कर्तव्याचा उपदेश करून त्यांना यथायोग्य मार्गदर्शन करणें हेंच समर्थांचें मुख्य राजकारण. आपत्कालीं धर्मरक्षण हें वास्तविक क्षत्रियांचें कर्तव्य. पण ह्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करून त्यावेळचा क्षत्रिय वर्ग हा केवळ मानापमान, वतन, वैभव ह्यांच्याच मागें

लागला होता. अशावेळीं हृदयस्थ परमेश्वरानें धर्मरक्षण करण्याची प्रेरणा ज्यांस दिली होती अशा शिवबास त्यांनीं उपदेश केला व त्याबरोबर नवोदित राजसत्तेस लोकानुकूलता मिळावी म्हणून जीवापाड प्रयत्न केले. राज्यसत्तेवांचून धर्मरक्षण होणार नाहीं म्हणून शिवबास साह्य करणें व त्याच्या कार्याकरतां पार्श्वभूमि निर्माण करणें हेंच ध्येय समर्थांनीं आपल्यापुढें ठेवलें. हेंच समर्थांचें राजकारण ! ह्याशिवाय त्यांचें स्वतःचें असें वेगळें राजकीय चरित्र नाहीं. आधीं उपासना नि नंतर राजकारण असा त्यांचा जीवनक्रम होता.

समर्थ प्रथम शहापुरास राहात असत, पण नंतर ते चंद्रगिरीच्या घळींत राहावयास गेले. तेथें वाघांची वस्ती होती. पण समर्थांनीं त्यांना 'चले जाव' केलें आणि त्या सिंहपुरुषाची गर्जना ऐकून ते वाघ निघूनहि गेले. नंतर तो व्याघ्र-पुरुष तेथें राहूं लागला.

वरती निळें आकाश, खालीं खोल दरी. सारखा वारा वाहातो आहे. भोंवताली भातशेती, डोंगरदऱ्या. नांगरठीची जमीन. कड्याकपाऱ्यावर चरणारीं गुरें. गर्द झाडींत झोपड्यांतून येणारा धूर.

रामा रघुनाथाचें देणें । जालें हनुमंत कारणें
देव पहावया पारणें । डोळ्यांचें
अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा
काळ सार्थकचि करावा । जनासहित
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे
उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपें

* 

## रामा, तुला कसा विसरूं ?

श्रीराम प्रभूच्या आदेशानुसार समर्थ कृष्णातीरीं येऊन लौकिक कार्यांत पडले तरी पंचवटींतल्या रामाची आठवण कांहीं बुजली नाहीं. उलट दूरदेशीं आल्यामुळें त्यांना रामाची जास्तच आठवण होई. एक दिवस एका शिष्याबरोबर त्यांनीं पंचवटींतल्या आपल्या सहकाऱ्यांना लिहिलें—

जनस्थान गोदाकांठीं । परम पावन पंचवटी ।
तेथें पडली कृपादृष्टि । रघुत्तमारायाची
तुम्ही निकट देवापाशीं । आणि मी पडलों दूर देशीं ।

कृपाळूपणें रघुनाथाशीं । माझी करुणा भाकावी
प्रत्यहीं माझा नमस्कार । देवासी करावा निरंतर ।
मज कारणें शरीर । इतकें कष्टवावें
पुढें म्यां ऐसेंचि असावें । माझें मन न पालटावें ।
इतुकें देवासी मागावें । तुम्हीं बंधुवर्गी

समर्थांना रामाचा वियोग असह्य होत होता. पंचवटीची सारखी आठवण होत होती, पण कृष्णातीरीं राहण्याचा रामाचाच आदेश होता. इथें स्वराज्याचा सूर्य उगवत होता. शिवबाच्या रूपानें शक्ति उदयास येत होती. नैराश्याचा काळोख उजळून निघत होता. शिवबानें स्वराज्याचें तोरण इथें बांधलें होतें नि स्वराज्याची खरी गरज इथेंच होती.

* वीष तें अमृत

नित्याची पूजा आटोपून वेणा तीर्थ टाकायला बाहेर आली. परत आल्यावर तिचे वडील म्हणाले,

" बाळ वेणा, पूजा करून तीर्थ टाकायला तशीच बाहेर गेलीस तूं. नैवेद्याचें दूध घ्यावयाचें विसरलीस वाटतं ? "

" नाहीं, नित्याप्रमाणें घेतलें मी. भांडं विसळून आईकरतां तीर्थ ठेवलें आहे मी त्यांत. "

" ह्या रामनामापायीं तुला कशाचीच शुद्ध नसते बघ. "

" काय झालं ? "

" बघ पाहूं भांड्यांत तसेंच दूध आहे कीं नाहीं तें. "

वेणा भांडें पाहूं लागली. दूध तसेंच होतें. आश्चर्यानें ती म्हणाली,

" आश्चर्य आहे ! खरंच आश्चर्य आहे ! ! दूध तर घेतलें होतें मी. पण मी दूध पुन्हां घ्यावें अशी त्या प्रभु रामचंद्राची इच्छा दिसते. म्हणूनच त्यानें तीर्थाचें पुन्हां दूध केलें असेल — "

" मग घे तर तो रामप्रसाद. "

" द्या इकडे, घेऊन टाकते मी. "

देशपांड्यांनीं लेकीला मारण्यासाठीं दुधांत विष घालून दिलें व तिला सर्पदंश झाल्याचा गांवांत बोभाटा केला. वेणाच्या अंगाचा दाह होऊं लागला. तेव्हां तिनें रामनामाचा जप सुरू केला.

समर्थांनीं नित्याचा श्लोक म्हटला व ‘जयजय रघुवीर समर्थ’ ही गर्जना केली. वेणा धांवत आली. विषप्राशनानें तिचें अंग काळें ठिक्कर पडलें होतें. समर्थांच्या कृपाकटाक्षानें तिच्या अंगाचा दाह कमी झाला. स्वामी म्हणाले,

“ हा गौरवर्ण विषप्राशनानें श्यामल झाला हें फार चांगलें झालें. माझी शिष्या व्हावयाचें म्हणजे फिरावें लागेल अरण्यांत, सोसावा लागेल ऊन-पाऊस. नाजुकपणाचें हें काम नव्हे. बरें झालें, रामानें नीलकवच घातलें तें.”

गोंधळून वेणानें विचारलें,

“ स्वामी, आपण काय म्हणत आहां ह्याची कांहींच कल्पना येत नाहीं मला. कुणी घातलें विष मला ? ”

“ तुझ्या जन्मदात्या पित्यानें. त्यानेंच तुला विष घातलें वेणा. ”

“ बाबांनीं ? ”

“ हो, विचार त्यांना, केवळ रामचंद्राच्या इच्छेमुळेंच तूं वांचलीस मुली. ”

“ होय का हो बाबा ? ”

देशपांड्यांना उमाळा आवरणें अशक्य झालें. पश्चात्तापानें त्यांचें तोंड गोरेंमोरें झालें.

“ कां केलंत तुम्हीं असं ? ”

“ जननिंदा टळावी म्हणून — ” कष्टी बापानें उत्तर दिलें.

पण रामानें प्रत्यक्ष विष पचविलें होतें. समर्थांच्या शुद्ध चारित्र्याचाच तो कौल होता. आतां जननिंदेची त्यांना पर्वा नव्हती. मुलीला जवळ घेत ते म्हणाले,

“ जा. आतां तूं स्वामींबरोबर खुशाल जा. विष देऊन तुला मारण्याचा मी प्रयत्न केला तेव्हांच मला तूं मेलीस. आतां तुझा पुनर्जन्म होऊन तूं स्वामींची मानसकन्या झाली आहेस. ”

“ चल वेणा, माझ्याबरोबर हिंडाफिरायला आतां तूं योग्य झाली आहेस. ”

इतकें झाल्यावर मग वेणाबाईनें माहेर सोडलें व समर्थांबरोबर ती बाहेर पडली. समर्थांचें चारित्र्य इतकें निर्मळ होतें कीं लोकापवादाची त्यांनीं कधींच पर्वा केली नाहीं. त्यांनीं मिरजेस एक मठ स्थापन केला व त्याचीं

सूत्रें वेणाबाईच्या हातीं दिलीं. वेणाबाईंना आपल्या संप्रदायाची दीक्षा देऊन त्यांच्या आयुष्याला परमार्थाची दिशा लावली व त्यांना कृतार्थ केलें.

समर्थांच्या उपाहाराची तजवीज ठेवण्याचें काम वेणाबाईकडे असे. वेणाबाई जशा साक्षात्कारी होत्या तशाच त्या प्रासादिक ग्रंथकर्त्याहि होत्या. 'सीतास्वयंवर' व 'रामायण' हे दोन रसाळ ग्रंथ मठाची व्यवस्था सांभाळून त्यांनीं फुरसदीच्या वेळीं लिहून काढले. त्यांचे हे ग्रंथ फार रसाळ आहेत.

वेणाबाई तशा कडक होत्या. एकदां एक तरुण महंत पलंगावर बसून दासबोध वाचीत होता. वेणाबाईनें तें पाहिल्यावर त्यांनीं त्या तरुणाला साष्टांग नमस्कार घातला. चकीत होऊन तो तरुण म्हणाला,

"हें काय आई ?"

"नमस्कार तुम्हांला नाहीं केला. समर्थमंचकीं दासबोधरूपें. तो नमस्कार दासबोधरूपी समर्थांस केला. काय करावें! शिष्यांना गुरुमर्यादाच कळेनाशी झालीय् आतां."

वेणाबाईची नजर इतकी बारीक असे. त्यामुळें शिष्यवर्ग त्यांना वचकून होता व समर्थांना मिरजेच्या मठाची काळजी नव्हती.

उन्हाळ्याचे दिवस. मिरजेस वेणाबाईच्या मठांत येतांच समर्थ म्हणाले,

"अरे, कोणी पाणी आणा रे लवकर."

एका शिष्यानें देवघरांत जाऊन सोंवळ्यांत भरून ठेवलेला तांब्या पटकन बाहेर आणला. समर्थ म्हणाले,

"सोंवळ्यांतलें पाणी ह्या पोरानें आणून दिलें!" घाबरत शिष्य म्हणाला,

"स्वामींना तहान लागली म्हणून —"

खोटा राग आणीत समर्थ म्हणाले,

"वेणाबाईच्या राज्यांत आचारविचारांची सगळी मर्यादा संपली वाटते ?"

हंसतहंसत वेणाबाई म्हणाल्या,

"शिष्यांच्या हातून अमर्यादा होणार नाहीं."

"मग ?"

"गुर्वाज्ञा प्रथम पाळायची. सोंवळ्याचें पाणी पुनः आणतां येईल. पण समर्थांनीं पाणी म्हणतांच त्यांना तें मिळालें पाहिजे."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .............. विः ..................
क्रमांक ...................... नों विः ..............



समर्थ प्रसन्नपणें हंसले. रामाच्या आरतीला सारेजण उभे राहिले, देवघरांतली घंटा वाजूं लागली.

## * महाराष्ट्र कृतार्थ झाला !

शके १५६६ ते १५७० चा काळ झंझावाताच्या वेगानें गेला. गांवोगांवीं समर्थांचे अनेक मठ झाले. अनेक शिष्य प्रांतोप्रांतीं प्रचाराकरतां फिरतांना दिसूं लागले. अकरा मारुतींची स्थापना झाली नि महाराष्ट्रांत नवचैतन्य संचारलें. समर्थांच्या चढत्या वाढत्या उपासनेबरोबर श्रीशिवरायाचें राज्यहि वृद्धिंगत होत गेलें. जसजसा राज्याचा विस्तार होत गेला तसतसा देवाचा महोत्सवहि थाटानें साजरा होऊं लागला. समर्थांच्या लोकोत्तर तेजस्वी वाणीनें महाराष्ट्र कृतार्थ झाला.

पण तरीसुद्धां समर्थ कधीं बेसावध नव्हते, गाफील नव्हते. स्थापन केलेल्या मठांवर त्यांची जातांयेतां देखरेख असे. शिष्यांच्या वागणुकीवर त्यांची करडी नजर असे. वेळेला ते फसकारून काढीत, तर प्रसंगीं त्यांच्याकरतां स्वतःचा प्राणहि धोक्यांत घालीत.

गोदातीरावर राक्षसभुवनाचे पूर्वेस सुमारें दीडदोन कोसांवर धोंडराई नांवाचें गांव आहे. मोठं देखणं गांव ! अमृता नदीच्या कांठीं वसलेलें. समर्थांनीं तेथें एक मठ स्थापन केला व त्याचें सूत्र मुसळराम यांजकडे दिलें. त्याच्या खांद्यावर नेहमीं मुसळ व त्यावर शेंदराचा मारुति असल्यामुळें लोक त्याला मुसळराम या नांवानं ओळखीत.

रामनवमीचा उत्सव आटोपून समर्थ निघून गेले. मठांत एकटा मुसळराम राहिला. मसुरेस एक तंटेखोर पठाण होता. मुसळरामाचें भजन त्याच्या कानावर गेलें नि त्याची नजर त्याच्याकडे गेली. हा कोण, काय करतो वगैरे माहिती त्यानें आपल्या नोकरांकडून काढून घेतली व त्यास बोलावून घेतलें. मुसळराम आल्यावर दाढीवरून हात फिरवीत तो आडदांड पठाण म्हणाला,

“ कुछ करामत बताव ! ”

“ मुखानें नामस्मरण करीत मुसळराम स्वस्थपणें उभा राहिला; पण त्याच्या शांततेनेंच चीड येऊन तो पठाण गुरगुरला,

" हें बघ, हा सव्वा मणाचा दगडी गोटा मला खांद्यावर उचलून दाखव, नाहींतर कमरेंत लाथ बसेल; याद राख. "

" असे एकच काय दोन गोटे मी दोन्ही हातांनीं उचलीन, पण ... "

" पण काय ? "

" पहिले ये लकडी उठाके तो बताव कोई ! "

म्हणून त्यानें तें मुसळ जमिनीवर उभें केलें.

तेथें असलेल्या प्रत्येक फकिरानें प्रयत्न केला, पण कुणालाच जमलें नाहीं. सर्व पठाणहि घामाघूम झाले. मग सर्वांनीं एकजूट प्रयत्न केला. तरीहि तें मुसळ हलेना त्यामुळें फजिती झाली असें वाटून ते त्यास मारावयास धांवले; पण त्यांना जागचें हालतां येईना कीं शिव्या देण्याकरतां तोंडहि उघडतां येईना. सगळेजण घाबरून गेले.

पठाण सरदारानें जवळच्या एका माणसाच्या कानांत मुसळरामावर गोळी झाडण्यास सांगितलें. तेवढ्यात योगायोगानें समर्थ तेथें आले. त्यांना पाहून त्याच्या हातांतली बंदूक तशीच राहिली. पठाण थक्क होऊन त्या अवलीयाकडे पाहूं लागला. समर्थ म्हणाले —

" सुनो वा सुनो मुसलमाना । क्या है अकल का माना
जो कुछ है सो भूतखाना । इताले किस तरफ जाना
किसके कई तरफ न जाना । आकल खूब खततर ल्याना
अल्लाके दर्गामें जाना । वहां तो अलबत हक होना
धणिका अलम है सारा । दुजा सुरिजन हारा
लगाया तेरा और मेरा । उसका चुकता नही फेरा
गैबी तखत खोया सो पाया । वखत हुजूरका आया
पैगंबरनें बतलाया । सो तूं क्यों नहि बे पाया
बाबा गैबी सुनाये । अल्ला आवे न जावे
आकल खूब खातिरल्याये । पूरा पीरसू पहुँचावे "

बाबा गैबीचा हा रोकडा जबाब ऐकून फकीर, पठाण व तो सरदार सारेच शरण आले. मुसळरामानें मुसळ उचलून खांद्यावर टाकलें. व मठाच्या दिशेनें समर्थांच्या मागून तो चालूं लागला. संकटांत उडी घालणाऱ्या स्वामींचा अभिमान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

## * दीनानाथ हा राम येणार आहे !

मसूर येथें समर्थांनीं तीन वर्षें रामनवमीचा उत्सव केल्यावर आतां कोठें तरी श्रीरामाचें मंदिर उभारावें असें त्यांच्या मनांत आलें; कारण गुप्त कार्य करण्यास मैदानांतील शहापूर व मसूर हीं गांवें योग्य नव्हतीं. म्हणून समर्थ प्रथम चंद्रगिरीकडे व नंतर चांफळकडे वळले. सभोंवतीं सुंदर वनश्रीनें युक्त असा डोंगराचा फेर, दासगड, रामघळ, वाघदरा अशी कांहीं गुप्त ठाणीं अगदीं जवळ, तर तारळखोरें जावळीचें खोरें व महाबळेश्वरकडे जाणाऱ्या वाटांना चांफळ अतिशय सोईचें. कृष्णा नदीवरून चांफळ खोऱ्याकडे पाहिलें कीं ते सहाच्या आंकड्यासारखें दिसे. त्याच्या दक्षिणेस पन्हाळा, पश्चिमेस कोयना खोरें आणि पूर्व बाजूस शिंगणापूर शिखर. एवढा विस्तीर्ण टापू नजरेंत येण्याची सोय म्हणून समर्थांनीं चांफळची निवड केली.

मांड नदीकांठीं वसलेलं तें छोटसं चांफळ गांव ! भोंवतालीं डोंगराचा फेर, लहानसा गांव आणि छोटीशी नदी. चांफ्यांच्या फुलांनीं भरलेलें चांफळ ! समर्थांना हें गांव फार आवडलें. नऊ मारुति स्थापन झाल्यावर रामाच्या मंदिराकरितां त्यांनीं चांफळ निवडलें.

गांवकऱ्यांजवळ समर्थांनीं जागा मागितली, तर गांवकऱ्यांनीं त्यांना मसणवटीची जागा दिली. समर्थ कामाला लागले. शिष्यांना खबर समजल्यावर दाही दिशांनीं शिष्य गोळा झाले. जागा स्वच्छ झाली, पण त्या जागेंत वेताळ, भैराळ, कंकाळ, म्हसोबा इत्यादि अनेक देव होते. त्यांना हात लावण्यास कुणी तयार होईना. समर्थांनीं लोकांची समजूत काढली. खरा देव ओळखण्यासाठीं लोकांना त्यांनीं किल्ली दिली.

जनीं धुंडितां देव नाना परीचे । बहू धातु पाषाण कां मृत्तिकेचे ॥
जया खेव तो देव कैसा म्हणावा । खरा देव तो आदरें ओळखावा ॥
बहू देव ते जन्मले आणि मेले । असंख्यांत होणार होऊन गेले ।
जया नाश तो जाण मिथ्या म्हणावा । खरा देव तो आदरें ओळखावा ॥

लोकांना खरा देव ओळखण्याची दृष्टि आली आणि सारे खोटे देव मांड नदीच्या पात्रांत भिरकावले गेले. आतां इथें साऱ्या देवांचा देव येणार होता. सर्व गेले, पण शेंदूर फांसलेला एक भला मोठा दगड मात्र शिष्यांना

हलतां हलेना. समर्थांच्या आज्ञेनें तो म्हसोबा तिथेंच राहिला. जागेचा राखणदार म्हणून !

जागा स्वच्छ झाल्यावर सुतार, पाथरवट, गवंडी ह्यांनीं जागेचा ताबा घेऊन पुढचीं कामें सुरू केलीं. दिवसा काम नि त्याच जागेवर रात्रीं रामनाम, भजन नि कीर्तन. रामनामानें सारें चांफळ आधींच दुमदुमून गेलें. मंदिर बांधण्यास कांहीं द्रव्य चांफळच्या व कांहीं पारगांवच्या भिक्षेतून मिळत होतें. त्यांतून चौथरा उभा राहिला. गाभाऱ्यानें आकार घेतला. पण पुढें पैसा अपुरा पडला.

साताऱ्याला हुजूर फडांत एक कारकून होते. त्यांची समर्थांना आठवण झाली. राममंदिराच्या बांधकामासाठीं दादाजींकडून कांहीं द्रव्य आणण्यासाठीं समर्थांनीं कल्याणास पाठविलें.

दादाजींचा स्वभाव सरळ नि सात्विक असल्यामुळें शिवबाची त्यांच्यावर कृपा असे. पण त्यांचा अकारण द्वेष करणारे कांहीं वैरी निर्माण झाले होते. त्यांनीं दादाजींवर भलतेच आरोप आणल्यामुळें त्यांना अटकेंत पडावें लागलें होतें. समर्थांना त्याची कल्पना नव्हती. कल्याणला ही बातमी समजल्यावर ते जेथें अटकेंत होते तेथें तो गेला. समर्थांच्या शिष्याला कुणी अडविलें नाहीं. कल्याणला पाहून दादाजींच्या डोळ्यांत पाणी आलें. उभयतांचें बोलणें झाल्यावर ते म्हणाले,

" कृपा करून आपण घरीं जा. समर्थांची आज्ञा सांगा आणि जें मिळेल तें घेऊन जा रामसेवेला. आपल्याला रिक्त हातानें जावें लागणार नाहीं याची खात्री असूं द्या. "

दादाजी तुरुंगांत असतांना त्यांच्या घरीं जाऊन मदत आणणें कल्याणास जड वाटलें. पण निकड तशीच होती म्हणून तो दादाजींच्या घरीं गेला.

सर्व हकीगत सांगून तो म्हणाला,

" आई काय सांगूं समर्थांना ? "

आपल्या अंगावरचें किडुकमिडुक होतें त्याची पुरचुंडी कल्याणापुढें ठेवून त्या म्हणाल्या,

" घ्या. "

" हें घेऊं ? "

" हो घ्या. अवमान करूं नका. हें स्त्रीधन आहे त्यांत अधर्माची दमडी नाहीं." कल्याण काय बोलणार ? तो थक्क झाला. भारतीय नारीची निष्ठा पाहून तोच नव्हे तर समर्थहि थक्क झाले.

धन आल्यावर सभामंडप तयार झाला. देवळावर कळस चढला.

मनांत होतें तसें मंदिर उभें राहिलें. आतां फक्त रामरायाच यावयाचा राहिला होता.

पुढें कांहीं दिवसांनीं रंगनाथस्वामींनीं आपले वडील निजानंदस्वामी ह्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्तानें समर्थांना बोलावलें. समर्थ त्याकरतां कऱ्हाडला गेले. नंतर कांहीं दिवस निगडी येथें वास्तव्य करून ते चांफळला निघाले. मार्गांत अंगापूरचे रानांत शिवनाभी म्हणून शंकराचें स्वयंभू स्थान आहे. स्नानसंध्येकरतां समर्थ तेथें थांबले. तेथें त्यांना शुभ शकुन होऊं लागले. डोह बोलूं लागला, "चांफळला मंदिर ज्याकरतां बांधलेस तो मी ह्या डोहांत आहे." आवाज कुठून आला म्हणून समर्थ पाहूं लागले, पण त्यांना कांहीं ठाव लागला नाहीं. डोहांत मात्र तरंगामागें तरंग उमटूं लागले. सूर्याला वंदन करून डोहाकडे पहात ते म्हणूं लागले,

लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे । दिनानाथ हा राम येणार आहे ।
जयाचेनि योगें सुखानंद लोटे । तया देखतां अंतरीं बाष्प दाटे ।

समर्थांच्या डोळ्यांतून खरोखरच अश्रु येऊं लागले. रामाची ओढ इतकी अनावर झाली कीं डोळ्यांतून येणारे अश्रु त्यांना आवरेनात. मग क्षणाचाहि विलंब न लावतां त्यांनीं डोहांत उडी घेतली. पहिल्या बुडींत कोदंडधारी राम हातीं आला. दुसऱ्या बुडींत महिषासूरमर्दिनी आली. दोन्हीं मूर्ति झोळींत टाकून झपाझप पावलें टाकीत ते चांफळकडे निघाले. नदीकांठीं खेळणाऱ्या गुराख्याच्या मुलांनीं ते पाहिलें नि गांवांत जाऊन झाल्या प्रकाराची त्यांनीं वर्दी दिली.

गांवकऱ्यांनीं त्यांचा पाठलाग करून चरेगांवच्या रानांत सुकण्याच्या खिंडींत अडवून म्हटलें,

" दाढीवाले बाबा, आमच्या मूर्ति आम्हांला परत द्या."

" मूर्ति तुमच्या कशा ? त्या तर मला डोहानें दिल्या."

" मोंगलांच्या धाडीपासून त्यांचें रक्षण व्हावें म्हणून गांवकऱ्यांनींच त्या डोहांत दडविल्या होत्या."

" मग आतां त्यांना माझ्याबरोबर येऊं द्या. "

" तें होणें नाहीं. "

" जशी तुमची इच्छा ! ह्या मूर्ति मी इथें ठेवतों. आपण घेऊन चला. "

समर्थांनीं मूर्ति काढून गांवकऱ्यांसमोर ठेवल्या; पण त्या कुणालाहि हलेनात. मूर्तींनींहि समर्थांबरोबर जाण्याचाच हट्ट धरला होता जणूं ! लोकांनीं तो हट्ट ओळखला. समर्थांपुढें नतमस्तक होऊन त्यांनीं मूर्ति नेण्यास परवानगी दिली. श्री समर्थांच्या झोळींत बसून प्रभु रामचंद्र चांफळला आले. रघुवीराचें दर्शन घेण्यास सारें चांफळ लोटलें. रामरायाची प्रतिष्ठापना मोठ्या समारंभानें झाली.

शके १५७० सर्वधारी नामसंवत्सरी चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून रामराण्याच्या उत्सवास आरंभ झाला. समर्थांनीं उत्सवांतील मानकरी ठरवून दिले. प्रतिपदेला शहापूरकर, द्वितीयेला वडगांवकर, तृतीयेला महागांवकर, चतुर्थी भेडसगांवकरांची, पंचमी आळेकरांची, षष्ठीचा अधिकार नृसिंहराय, सप्तमीला पारगांवकर, अष्टमीला बाहेकरांनीं कथा करायची. नवमीला पाळण्याची दोरी स्वतः समर्थांनीं ओढायची.

राममंदिरासमोर समर्थांनीं एक मारुति उभा केला. देवळाच्या मागेंहि रक्षणाकरतां एक मारुति ठेवला. मारुतीपुढें समर्थांनीं एक बकुळीचा वृक्ष लावला होता. उत्सवांत त्याला बहर आला नि त्या फुलांभोंवतीं भ्रमरांनीं एकच गर्दी केली. चांफळच्या उत्सवालाहि भक्तांनीं अशीच गर्दी केली.

यात्रेच्या वेळीं पहिल्याच दिवशीं चांफळचे अधिकारी नरसिंहराव अंबरखाने, देशमुख प्राणजी, नागोपंत कुलकर्णी, नागोजी भावे आणि नाणेघोळकर अशा पंचाधिकाऱ्यांना त्यांनीं बोलाविलें व त्यांच्याकडून रामावरचें फूल उचलून शपथ घेवविली. डोळे मिटून निष्ठेनें ते अधिकारी म्हणाले,

" या अधिष्ठानाची भक्तिपरंपरा आम्ही कायम राखूं. सर्वतोपरी उत्सवास साह्य देऊं. सरकारी अडवणूक यात्रेंत येऊं देणार नाहीं. सर्वस्वेसीं साह्य करूं. "

जयजय रघुवीर समर्थ !

उत्सवांतील पालखीच्या छबिन्याचे मान व त्याचे मानकरीहि समर्थांनीं ठरवून दिले. पूजा भानजी व विठ्ठल गोसावी यांनीं करावी. पूजासाहित्य


दिनकर भट महाबळेश्वरकर यानें सिद्ध करावें. त्याला अक्का वेणानें सहाय्य करावें. प्रतिपदेचा नैवेद्य, सायंकाळीं सवाया म्हणणें व रात्रीचें कीर्तन बाईजाबाई ऊर्फ सतीबाई शहापूरकर यांनीं करावें असे आठ दिवस आंखून देऊन नवमीचा जन्मकाळहि सतीबाईनेंच करावा व उत्सवमूर्ति शहापूरकरांच्या पालखींतून रथावर न्यावी. रथ मंदिरापासून पूर्वेस जातांना पुढें आणि पश्चिमेस परत येतांना रथामागें बाजीपंत, सीताबाई किंवा भिकाजीबाबा यांपैकीं कुणीतरी कीर्तन करावें. दशमीच्या पारण्याची व्यवस्था वेणाबाईकडे. एकादशीस रथोत्सव, रथोत्सवानंतर श्रीरामराज्याभिषेकाचें वर्णनपर कीर्तन. नंतर यात्रेकरूंना निरोप.

उत्सवांतील प्रत्येक बारीकसारीक गोष्टींची व्यवस्था समर्थांनीं लावून दिली. सडासंमार्जन करणें, भिंती सारवणें व त्या रंगवून त्यावर चित्र काढणें, स्वयंपाक कोणकोणता व कोणी करावयाचा, कोणी वाढायचें, पाणी कोणी भरायचें, बाजारहाट कुणी करायचा, गंध कुणी लावायचें, कीर्तनाच्या बैठकी कुणी घालायच्या अशीं लहानमोठीं कामेंहि त्यांनीं निरनिराळ्या माणसांस वांटून दिलीं. एकाच्या कामांत दुसऱ्यानें हात घालूं नये अशी सक्त ताकीद दिली. सर्वांच्यावर देखरेख ठेवण्यास दिवाकर भटांना ठेवलें व उत्सव सुरू झाल्यावर समर्थ नामानिराळे राहिले. कुठल्याहि क्षणीं ते उत्सवाला हजर राहात, तर मध्येंच गुप्त होऊन एकांतवास स्वीकारीत. आपण आंखून दिलेल्या उत्सवांची मजा तिऱ्हाईताच्या दृष्टीनें ते दुरून पहात. लहानशा गांवांतलें मोठें राममंदिर पाहून ते हरखून म्हणत,

भोंवती डोंगराचे फेर । मध्यें देवाचें शिखर<br>
पुढें मंडप सुंदर । नवखणांचा ॥<br>
चहूं खांबांवरी रचना । वरत्या चोवीस कमाना ।<br>
कमकटाऊ नयनां । समाधान ॥<br>
नानातरु आंबेवनें । दोहींकडे वृंदावनें<br>
वृंदावनीं जगजीवनें । वस्ति केली ॥<br>
माने चौघडे वाजती । धडाके तोफांचे होती<br>
फौजा भक्तांच्या साजती । ठायीं ठायीं ॥<br>
दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो<br>
देव भक्तासवें जातो । ध्यानरूप ॥

समर्थांच्या अतीव मधुर रामभक्तीला फळ आलें नि चांफळचें राममंदिर उभें राहिलें.

चांफळच्या राखणदार म्हसोबापुढें नारळ फोडून दहींभात ठेवला गेला. रथोत्सव पार पडला. चैत्र शुद्ध त्रयोदशी असेल. प्रक्षालपूजेस थोडा अवकाश होता. समर्थ राममंदिरांत अचानक हजर झाले. सगळीकडे केरकचरा




पडलेला त्यांना दिसला. आज झाडलें तरी सुद्धां यात्रेच्या वर्दळीनें केर होणारच ह्या विचारानें देवालय झाडण्याची सेवा ज्याच्याकडे होती त्यानें दुर्लक्ष केलें होतें. समर्थांनीं तें पाहिलें नि कुणाला कांहीं न विचारतां स्वतः झाडण्यास सुरुवात केली. समर्थांच्या हातांत केरसुणी पाहून दाही दिशांनीं शिष्य धांवले. एक म्हणाला,

"आपण कशाला हें हलकें काम करतां ?"

"देवद्वार झाडणें हें हलकें काम होय ?"

शिष्याला बोलणेंच सुचेना. समर्थच पुढें म्हणाले,

" अरे, ह्यापेक्षां मोठें काम तें कोणतें ?

जो स्वयें देवद्वार झाडी । तो नर चढे वैकुंठ पहाडीं ॥

वैकुंठाच्या पहाडीं चढण्याकरतां शिष्यांची एकच धांदल उडाली. असंख्य हातांनीं झाडू फिरूं लागले नि क्षणार्धांत देऊळ स्वच्छ झालें.

पहांटेचा कांकडा झाला. गाभाऱ्यांत श्रींचें अर्चन झालें. बाहेर सभामंडपांत भजन सुरू झालें. वाद्यघोषांच्या गजरांत आरती झाली. नंतर छबिना निघाला. छत्रीवाले, अबदागीरवाले, भालदार, चोपदार ह्यांची धांवपळ उडाली. दर्शनाकरतां लोकांची गर्दी उसळली.

त्यावेळीं महाराज प्रतापगडावर होते. त्यांना कळलें कीं समर्थ चांफळला आहेत नि तेथें रामाचा मोठा उत्सव चालू आहे. महाराजांच्या मनांत आलें नि निवडक मावळ्यांसह त्यांचीं घोडीं चांफळच्या दिशेनें दौडूं लागलीं.

चांफळ खोऱ्याचे अधिकारी नरसोमलनाथ अंबरखाने दासांच्या उत्सवांतच गुंतले होते. जासूदांकडून शिवबा आल्याची वर्दी लागतांच धांवतच शिवबाच्या स्वागतासाठीं ते वेशीपाशीं आले. शिवबा वेशीपाशीं आला तेव्हां घामानें घोडीं निथळलीं होतीं. चांफळच्या लोकांनीं शिवबाचें स्वागत केलें. नरसोमलनाथ अंबरखाने सामोरे आले तेव्हां शिवबा म्हणाले,

" आम्हीं रामाच्या उत्सवाला आलों. "

" चलावें. "

तुताऱ्या वाजूं लागल्या. चौघडे कडाडले. ललकाऱ्या उठल्या. शिवबाच्या जयजयकारानें चांफळचें खोरें व्यापून गेलें. शौर्य देवाच्या द्वारीं उभें राहिलें. शिवबानें विचारलें,

" देऊळ छान आहे. कुणी बांधलं हें ? "

" रामाच्या भक्तांनीं—रामदासांनीं. "

" मदत कुणी दिली ? "

" आपण ! "

" आम्हीं ? "

" हो ! "

" आम्हांला कसं नाहीं आठवत ? "

नरसोमलनाथ हंसून म्हणाले,

"कार्यबाहुल्यामुळं—"
"आपण आठवण करून द्यावी."
"आपण गिरीगोसावी नाशिककरांचं कीर्तन ऐकलं होतंत नाहीं का?"
"हो, आला होता एकदां योग. आठवतंय् आम्हांला."
"प्रसन्न मनानें आपण त्यांना तीनशें होन दिले होतेत."
"त्याचा इथें काय संबंध?"
"गोसाव्यांनीं ते पैसे इथं पाठविले."
"छान! म्हणून का आम्हीं मदत केली म्हणतां?"
"शिवाय मीहि आपलाच आहे. मीहि ......"

मोकळ्या मनानें हंसून शिवबानें देऊळ पाहिलें. रामाचें दर्शन घेतलें. तीर्थप्रसाद घेतला. नदीच्या पात्रांत बंधारा घालायला सांगितला आणि त्यासाठीं जावळीच्या खजिन्यांतून दोनशें होन मंजूर केले.

गर्दी हटल्यावर महाराजांनीं स्वामींची भेट घेण्याचें ठरविलें. पण त्या गर्दीतून निसटून समर्थ चंद्रगिरीच्या डोंगरावर रहाण्यास गेले होते.

## * चंद्रगिरीच्या डोंगरावर

शहापूरहून ते चांफळ खोऱ्यांत रहाण्यास आले खरे; पण त्यांचें राहाणें नेहमीं डोंगरघळींतच असे. चंद्रगिरीच्या डोंगरावरचें एकांत स्थान समर्थांना फार आवडे. एकांतांत निसर्ग त्यांच्याशीं हितगूज करी व त्यांची प्रतिभा बोलकी होई.

चंद्रगिरीचा डोंगर। त्यांत गुप्त येक शिखर। तेथें राहे योगेश्वर। निरंजन॥
तें नवल त्या निरंजनाचें। शिखर पाहे आकाशाचें। ऐसें पृथ्वीमध्यें कैचें पाहों जातां॥
कृष्णा कोन्या दोहींकडे। मध्यें पर्वताचे कडे। मंडळ पाहतां चहूंकडे। समाधान॥
तळीं असतीं शेतभातें। तेथें फिरतातीं आऊतें। नानापरींची मार्गस्ते। येती जाती॥
वरती सरडे मेंढरें। गुरे सिगुरें वासुरें। ठायीं ठायीं गुराखी पोरें। क्रीडा करिती॥
राया रघुरायाचें येणें। जालें हनुमंताकारणें। देव पहावया पारणें। लोचनांचें॥
रामदासाचा विसावा। रुद्र जाहला आकावा। भक्तजन वेगीं धांवा। दर्शनेसी॥

निसर्गसान्निध्यांत त्यांना एकप्रकारें शक्ति येई. त्यांना नवे नवे विचार सुचत. त्यांचें मन प्रसन्न होई. इथें तीन दिवस काढल्यावर चांफळच्या उत्सवाचा छबिना त्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागला व रामाच्या ओढीनें त्यांचीं पावलें चांफळकडे वळलीं.

चांफळला आल्यावर रामोत्सवाला शिवबा येऊन गेल्याचें समर्थांना कळलें. चांफळच्या देवस्थानासाठीं महाराजांनीं धनधान्याची नेमणूक केल्याचें त्यांच्या कानीं आलें. स्वामी निःस्पृह होते. त्यांनीं शिवबाला कळविलें,

" दिल्हे ते सर्व पावले. याउपरीं येक रुकापरियेत द्रव्य व दाणा न पाठविणें. आपणांस कांहीं न पाहिजे. "

महाराजांना वरीलप्रमाणें लिहून कळविल्यावर त्यांनीं कोठीला भेट दिली. कोठीवाले चिंताक्रांत होते. उत्सवाला गर्दी अमूप झाली. त्या मानानें उत्पन्न आलें नाहीं. खर्च कसा भागवायचा हा त्यांच्यापुढें प्रश्न पडला. समर्थ म्हणाले,

" रामाच्या उत्सवाची चिंता कां ?
कां करावी चिंता । सर्व समर्थ तो श्रीरामदाता ! करवील उछावो आपुला ॥
जयजय रघुवीर समर्थ । "

उत्सवाकरतां लोक धनधान्य देत. पण समर्थांचा स्वावलंबनावर कटाक्ष होता. उत्सवाकरितां शिष्यांनीं भिक्षा मागून आणावी व उत्सव साजरा करावा असा त्यांचा दंडक होता. कोठारांत तूट पडली हें कळल्या-बरोबर त्यांनीं कल्याणास हांक मारली व त्यास मनाचे श्लोक सांगण्यास सुरुवात केली.

मना सज्जना भक्तिपंथेचि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥
जनीं निंद्य ते सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य ते सर्व भावें करावें ॥
सदासर्वदा देव सन्निध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ठ पाहे ॥
सुखानंदआनंद कैवल्यदावी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥
सदा देवकाजीं झिजे देह त्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

जयजय रघुवीर समर्थ—

आपल्या सांप्रदायाची सूत्रावली म्हणून समर्थांना मनाचे श्लोक शिष्यांच्या हातीं दिले व त्यांचा शिष्यसमूह रामासाठीं भिक्षेकरितां बाहेर पडला.

धीरगंभीर स्वरानें हे श्लोक शिष्यांच्या तोंडून बाहेर पडूं लागले कीं घराघरांतून मायभगिनी हातांत मापटींचिपटीं घेऊन भराभरा दारांत उभ्या राहात. रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्यांचींहि मनें हे श्लोक आपल्याकडे ओढून घेत. श्लोकांची रचनाच प्रासादिक ! समर्थांच्या मनाच्या श्लोकांनीं लोकांच्या मनाची अशी कांहीं पकड घेतली कीं तिचें वर्णन करणें कठीण. ज्याच्या कानीं मनाचे श्लोक आले नाहींत किंवा ज्यानें एखादी तरी मनाच्या श्लोकाची ओळ ऐकली नाहीं अगर म्हटली नाहीं असा एकहि माणूस त्या पंचक्रोशींत सांपडणें अशक्य झालें; कारण ते तसेच सुबोध, मनाला चटका लावणारे नि म्हणायला सोपे होते.

मनाच्या श्लोकांनीं समर्थांच्या रामोत्सवाला भरपूर दिलें. चांफळच्या उत्सवाचीं कोठारें धनधान्यांनीं भरून गेलीं. सर्व चिंता रामाला हेंच खरें !

इकडे चांफळला रामाचा उत्सव धडाक्यानें चालला होता; तर तिकडे मोरोपंत पिंगळ्यांच्या शौर्यालाहि उधाण आलें होतें. शिवाजी विजापूरच्या दरबाराला मानेनासा झाला होता. कोंडाणा व चाकण किल्ले तेथील किल्लेदारास वश करून त्यांनीं घेतले. कल्याणचा खजिना लुटला. लोहगड, राजमाची हे किल्ले घेतले. कोंकणांत राजापुरापर्यंत आपले पाय पसरले व पुढील लढाईकरतां भरपूर पैसा मिळवून ठेवला.

★ ★ ★

# दासबोधाचा जन्म

जावळीच्या जवळच पारघाटाच्या तोंडावर एक भोरप्या डोंगर आहे. महाराज त्यावर किल्ला बांधीत होते. याच काळांत वरंधा घाटांतील शिवथरजवळच्या एका गुहेंत शस्त्रगर्भा कुबडीवर रेलून रामदास कर्मयोगाचें तत्त्वज्ञान ओवीबद्ध करण्यांत मग्न झाले होते.



भोवतीं डोंगरांचा फेर असून मध्यें कसबे शिवथराच्या पाठीमागच्या डोंगरांत अगदीं पायथ्याशीं ही घळ होती. वरच्या बाजूस मोऱ्यांचा वाडा होता. त्याकाळीं शिवथरला फार महत्त्व होतें; कारण ज्याच्या ताब्यांत शिवथर खोरें तो कोंकणपट्टीचा मालक अशी स्थिति होती. कोंकणपट्टीवर हुकमत गाजवायची तर हें खोरें ताब्यांत पाहिजे. त्यावेळीं शिवथरचा स्वामीपति चंद्रराव मोरे होता. जावळीपासून शिवथरपर्यंतचा मुलूख त्याच्या हुकमतीखालीं होता. तें खोरें ताब्यांत घ्यावयाचें तर चंद्रराव मोऱ्याला अनुकूल करून घेतलें पाहिजे. शिवबाच्या राजकारणासाठीं त्याला अनुकूल करून घेण्यासाठींच समर्थ चांफळ सोडून शिवथर खोऱ्यांत जाऊन राहिले होते.

त्याचवेळीं दुपारच्या फुरसदीच्या वेळीं त्यांनीं एकवीस समासी दासबोध सांगितला. ते सांगत आणि कल्याणस्वामी लिहून घेत. त्यांनीं लिहिलेली प्रत एक दिवस समर्थांनीं पाहिली. त्यांना समाधान वाटलें. पण शिष्यांत आणखी प्रगति होऊन अक्षर वळणदार होण्यासाठीं त्यांनीं कित्ता लिहून दिला व कांहीं मौलिक सूचना केल्या.

“ कल्याणा, तुझें अक्षर सुवाच्य आहे; पण तरीहि ग्रंथ लिहितांना अक्षरासंबंधीं तुला कांहीं सूचना करतों. ”

कल्याण लक्षपूर्वक ऐकूं लागला व समर्थ सांगू लागले,

ब्राह्मणें बाळबोध अक्षर । घडसून करावें सुंदर ।
जे देखतांचि चतुर । समाधान पावती ।
वाटोळे सरळे मोकळे । वोतले मसीचें काळें ॥
कुळकुळीत वोळी चालिल्या ढाळे । मुक्ता माळा जैशा ॥
अक्षर मात्र तितुकें नीट । नेमस्त पैस काने नीट ।
आडव्या मात्रा त्याही नीट । आर्कुली वेलांड्या ॥
पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पाहात गेलें ।
येका टांकेचि लिहिलें । ऐसे वाटे ॥
अक्षराचें काळेपण । टांकाचें ठोसरपण ।
तैसेंचि वळण वांकण । सारिखेंचि ॥
वोळीस वोळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना ।
खालिले वोळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ॥

दासबोधांत शिष्य श्रोत्यांचा संवाद आहे. स्वामी जणूं शिष्याला शिकवायलाच बसले आहेत. शिष्याच्या शंका–आशंका फेडीत किंवा तर्ककुतर्क तोडीत असतांना त्यांच्या कुशाग्र बुद्धीची साक्ष पटते. वेदांताचें गूढ निरुपण, पढतमूर्खाचें वर्णन, व्यवहारनीति, चातुर्यलक्षण, खरा परमेश्वर कसा ओळखावा, चांगलें कीर्तन कसें असावें इत्यादि असंख्य नि विविध विषय त्यांत अशा रीतीनें आले आहेत कीं, विवेकी मनाला तो एक नजराणाच वाटावा. त्यांतले बोल साधेच, पण सूप्रचीत आहेत. त्या बोलांतून त्यांचा अंतरात्मा स्पष्ट दिसतो. दासबोध म्हणजे समर्थांचें आत्मचरित्रच आहे. एकमुखी नि एकसूत्री असलेला हा ग्रंथ म्हणजे समर्थांची एक वाङ्मयमूर्तीच आहे. खरं म्हणजे परमेश्वर हा एक महाकाव्याचा विषय ! पण दासबोधांत तो सोपा झाला आहे. ज्या शब्दांनीं कवीची प्रतिभा उदय पावते असे हजारों शब्द तेथें आहेत. गचाळ किंवा मिळमिळीत असें एक वाक्यहि ह्या ग्रंथांत नाहीं. बोलण्याचा ओघ, शब्दांची योजना, विवेचन पद्धति इतकी सोपी, चित्तवेधक नि समर्पक आहे कीं त्यांतून परमार्थ सोपा व्हावा, व्यवहाराची रीत समजावी नि परमेश्वर पंथाकडे जाणारा मार्ग स्पष्ट दिसावा. तीक्ष्ण तर्कशक्ति, समतोल विचार व अनुभवी व्यवहारचातुर्य ह्यांची त्रिगुणात्मक मूर्ति म्हणजेच दासबोध !

माणसानें जन्मास येऊन कांहींतरी भव्य व उत्कट करून दाखवावें अशीच शिकवणूक दासबोधापासून दिसून येते. दासांना करंटेपणा व मिळमिळीतपणा ह्यांची अतिशय चीड होती. ज्ञानी झाला तरी त्यानें निष्क्रिय राहूं नये असें त्यांना वाटे. त्यानुसार दासबोधाची रचना होत गेली.

रमणीय स्थानीं विसांवा घेऊन समर्थांनीं दासबोध सांगावा आणि कल्याणानें लिहून काढावा ह्याप्रमाणें दासबोधाची रचना झाली. डोळ्याचें पातें पात्यास लागूं न देतां ८०० ते १००० ओव्या दर दिवशीं लिहिल्या जात होत्या. जीवनाचा आदर्श ग्रंथरूप करावा अशी समर्थांची बऱ्याच दिवसांची मनीषा होती. तिला आकार येत होता.

शिवथर घळीचा हा सारा प्रदेश मोठमोठ्या झाडांनीं भरलेला होता. जागोजागीं पाण्याचे प्रपात दिसत व रानकिड्यांचे कीर्र आवाज येत. पण रानकिड्यांचे पशुपक्ष्यांचे आवाज सोडले तर इथें सर्वत्र शांतता होती. ह्या शांत जागीं दासबोध जन्मास आला.

कांहीं वेळ कल्याणाला दासबोध सांगितल्यावर समर्थांच्या डोक्यांत राजकारणाचीं चक्रें फिरूं लागत. थोडेंबहुत सैन्य बाळगून असणारे मोरे व घोरपडे यांच्यासारखे मराठे सरदार शिवाजी महाराजांस अनुकूल नव्हते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंस्थापनास ते उघडपणें विरोध करीत. सरदार बाजी शामराज यानें तर जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांच्या सहाय्यानें शिवाजीला पकडण्याचा डाव घातला होता. ही स्वराज्यविघातक वृत्ति नाहींशी होण्याकरतां समर्थांनीं लिहून ठेवलें —

अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार

आल्या गेल्या हातीं चंद्रराव मोऱ्यांच्या हालचाली समर्थांकडून शिवबाच्या कानांवर जात होत्या. एकीकडे दासबोधासारखा ग्रंथ लिहिला जात होता नि दुसरीकडे राजकारणाचीं प्यादीं पुढेंमागें हालत होतीं.

श्रीसमर्थांचा चांफळला पक्का जम बसला. अनेक कर्तबगार शिष्य त्यांना लाभले. इकडे शिवबानेंहि असंख्य किल्ले घेऊन आपले हातपाय पसरण्यास सुरुवात केली. पण दुर्दैवानें शिवाजीचे गुरु दादोजी कोंडदेव स्वर्गवासी झाले नि विजापूरकरांनीं शहाजीस कपटानें पकडून बंदिस्त केलें. एकावेळीं दोन आघात! अगदीं असह्य झालें शिवबाला. प्रसंग आणीबाणीचा होता. राजकारण अडून बसलें होतें. कोंडाणा घेऊन शहाजीराजांस सोडवून घ्यावें कीं शहाजी राजांस तसेंच अटकेंत राहूं देऊन विजापूरकरांवर एकदम चढाई करून जावें अशा विचाराच्या कात्रींत त्यावेळीं शिवबा सांपडला होता. मन लढाईकरतां उतावीळ झालें होतें. त्याचे मंत्री त्याला थोपवून धरीत. पण प्रत्येकाच्या डोक्यांत अनेक राजकारणें घोळविलीं जात होतीं.

अशा वेळीं दैवी पाठबळ पाठीशीं असावें म्हणून शिवबाच्या मनांत साधुसंतांची भेट घ्यावी असें आलें. तुकोबाच्या कीर्तनाला ते गेले असतांना त्यांनीं त्यांना रामदासस्वामींनाच एकनिष्ठेनें शरण जाण्यास सांगितलें. शिवबांच्या मनांतहि तें होतेंच, आतां तर त्यांना एका पुण्यवान पुरुषाचें अनुमोदन मिळालें होतें.

* **जिवाशिवाची भेट**

शके १५७१. वैशाखाचे दिवस. शिवबा समर्थांच्या भेटीकरितां निघाले. चांफळ हेळवाकपर्यंत ते जाऊन आले, पण समर्थांचें दर्शन झालें नाहीं.

राम भेटला पण रामाचा भक्त भेटला नाहीं. रानांतल्या पांखरांचा पत्ता कुणी सांगावा ? समर्थांचा शोध घेण्याकरितां दाही दिशांना स्वार सुटले. पण त्यांनाहि समर्थांचा ठावठिकाणा लागला नाहीं. दर्शनाची तळमळ वाढली. मनांत तळमळ ठेवून ते झोपीं गेले. मनीं तें स्वप्नीं ! समर्थ शिवबांच्या स्वप्नांत आले. पायीं पादुका, मस्तकीं जटाभार, कांखेंत कुबडी, हातांत कमंडलू असे स्वामी समर्थ शिवबांना दिसले. त्यांच्या शरीरावर अष्टसात्त्विक भाव उमटले. शिवबा जागे झाले तर तें एक मधुर स्वप्न ! स्वामी नाहींत नि कुणी नाहीं. पण स्वप्नांत स्वामीनीं नारळ दिला होता तो मात्र हातांत खरोखरीचा होता. जिजाईला या प्रकाराचा अर्थ विचारण्याकरतां ते धांवत बाहेर निघाले तर स्वामींकडून आलेली चिठ्ठी घेऊन हुजऱ्या दारांत उभा होता.

समर्थांच्या शिष्याबरोबर निरोप गेला, "दर्शनाची इच्छा धरून येत आहे; कृपा करून दर्शन द्यावें."

महाराज निघाले. बरोबर बाळाजी आवजी व निळो सोनदेव होते. पहिला मुक्काम मानगांवला झाला. सारा लवाजमा तेथेंच ठेवला. बाळाजी आवजी नि निळो सोनदेव ह्यांना घेऊन राजे पायीं निघाले. ही मंडळी चांफळास दोनप्रहरीं आली. तेथें स्वामी शिंगणवाडीच्या खाडीकडे आहेत असें कळलें. महाराज तसेच निघालेले पाहून आक्का म्हणाल्या,

"जेवणाची वेळ आहे, राजांनीं जेवून जावें."

"समर्थ भेटल्याशिवाय आज जेवण घेणें नाहीं !"

"इतक्या घाईनें जातां; गांठ पडेल न पडेल म्हणून म्हटलं."

"गांठ का पडणार नाहीं ?"

"अगोदर कळवून गेलेलें बरें असतें."

"निरोप अगोदरच गेलेला आहे आमचा."

"ठीक आहे. मला माहीत नव्हतें हें. मग जावं आपण !"

आक्कांनीं राजांबरोबर दिवाकर भट्टांना पाठविलें. शिंगणवाडीकडे मंडळी आली. समर्थ तेथें नव्हते. खालीं बागेंत होते.

शिंगणवाडीच्या मारुतीपुढें जोत्याचा वृक्ष होता, ह्या झाडाच्या छायेखालीं समर्थ बसत. आख्या चांफळखोऱ्यांत अशाप्रकारचें दुसरें झाड नव्हतें. समर्थांनीं हें कोठून आणून लावलें कुणास ठाऊक !

राजाकडून आलेलें पत्र शिष्य स्वामींना वाचून दाखवीत होते तेवढ्यांत राजे तेथें आले. समर्थ म्हणाले,

" तुम्हीं व तुमचें पत्र – दोघेहि एकदमच आलांत कीं — "

" होय. मोठ्या झेंपेनं आलों आम्हीं. "

शिवबा अनेक विवंचना नि संकटें घेऊन आले होते. गुरुवर्य दादोजी कोंडदेव वारले होते. जन्मदाता बाप कैदी झाला होता. आतां समर्थांशिवाय शिवबाला कोण होतें ? दुःख शब्दांनीं सांगतां येत नाहीं आणि प्रेमाच्या माणसाला तें न सांगतांच कळत असतें. शिवबांनीं समर्थांचे पाय धरले. डोळ्यांचा बंधारा फुटला. जास्त सांगण्याबोलण्याची गरजच नव्हती. त्यांचा हात धरीत समर्थ म्हणाले,

" उठ ! शिवबा उठ ! "

" स्वामींनीं आज अनुग्रह करावा. "

समर्थांनीं 'होय' म्हटल्यावर राजे स्नान करून आले. समर्थांनीं अनुग्रह देऊन उपदेश केला,

तो आत्मा कोणास कळेना । ज्ञानेंविण आकळे ना ।
म्हणोनिया संतजनां । विचारावें ॥
विचारतां सज्जनासी । ते म्हणती कीं अविनाशी ।
जन्ममृत्यु आत्मयासी । बोलोंच नये ॥
परमात्मा तो निराकार । जाणिजे हा विचार सार ।
आणि आपण कोण हा विचार । पाहिला पाहिजे ॥
म्हणोनि कर्ता नव्हे कीं आपण । तेथें भोक्ता कैचा कोण ।
हें विचाराचें लक्षण । अविचारें न घडे ॥

समर्थांच्या मुखांतून आत्मप्रचीतीचा रंग उधळला गेला नि तृप्त मनानें महाराजांनीं स्वामींना दंडवत घातले.

योग्य गुरूला साजेसा शिष्य भेटला. जणूं परमेश्वरी संकेताप्रमाणेंच शिव-समर्थांची भेट झाली नि महाराष्ट्रांत शिवशक्ति अवतरली.

शके १५७१ विरोधीनाम संवत्सरी वैशाख शुद्ध ९ गुरुवारीं समर्थांकडून शिवबाला अनुग्रह मिळाला. त्या दिवशीं स्वामींनीं राजांना श्रीफळ, मूठभर माती, दोन मुठी लीद व चार मुठी खडे असा प्रसाद दिला. नंतर राजांना जवळ घेऊन स्वामी म्हणाले,

" तुम्ही धन्य आहांत. तुमचा सर्व भार श्रीवर आहे. चिंता करूं नका. तुमचें कल्याण करून तुमच्या हातून जनसेवा व्हावी अशी श्रीची इच्छा आहे. आपण निश्चित विजयी व्हाल. "

समर्थांच्या आशीर्वादानें महाराजांना हुरूप वाटला.

नंतर राजांनीं गुरुपूजा केली. जडजवाहीर, मोत्यें, पोवळीं, सोन्याच्या पुतळ्या समर्थांच्या अंगावर उधळल्या. बऱ्या गुराख्या पोरांनीं तें उचललें. समर्थांनीं त्यांना आडकाठी केली नाहीं. राजानें उधळलेलें धन लोकांनीं वेंचलेलें पाहण्यांत त्यांना मोठा आनंद वाटत होता.

त्याच वेळीं शिवबाबरोबर आलेल्या बाळाजी आवजी व निळो सोन-देवांनाहि त्यांनीं अनुग्रह दिले. त्यांना सेवकधर्म सांगितला —

जो अपुलें हित न करी । तो अपुला आपण वैरी ।
तेथें कांहीं कोणावरी । शब्द नाहीं ॥
श्रेष्ठाचें केलें मोडावें । आपुलेंचि पुढें प्रतिष्ठावें ।
तरी मग लागे भ्रष्टावें । वैभवापासूनी ॥
कार्य करितां कांहीं न मागे। त्याची चिंता प्रभूस लागे
ऐसें जाणूनि विवेक जागे । म्हणजे बरें ॥
स्वामींनीं जें जें बोलावें । तेंचि सेवकीं प्रतिष्ठावें
वेळ चुकवूनी बोलावें । विनीत होऊनी ॥
सेवक तोचि जो अडेना । शब्द भुईस पडेना
काम चुकलें हें घडेना । कदाकाळीं ॥
आपस्वार्थ उदंड कारणें । आणि स्वामीकार्य बुडविणें
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सेवकांचीं ॥

बाळाजी आणि निळो जीवाचे कान करून ऐकत होते. तेंच का, ज्या वृक्षाखालीं तो उपदेश केला गेला तो वृक्षहि तो उपदेश तटस्थतेनं ऐकत होता. तेवढ्यांत स्वामी थांबून म्हणाले,

" तुम्हीं सुज्ञ सेवक आहांत. सुज्ञांस आणखी सांगणे न लगे. "

नंतर समर्थांनीं राजकारणाविषयीं विचार मांडले. ते म्हणाले, " बहुजन समाज हा देवरूपच आहे. म्हणून लोक राजी राखावेत. अपयशाचें मुख्य कारण प्रयत्नांत कुठेंतरी चुकतें आहे. लोकांना वश करतां येत नाहीं हेंच होय. अनेक स्थळीं अनेक माणसांशीं प्रसंग येतात. त्यांचीं मनें तुटूं देऊं

नयेत. प्रीति जोडावी. मनामनांची मिळवणी करावी. कोणावर रागवायचा प्रसंग आला तरी त्याला तोडूं नये. विवेकानें लोक सांभाळावेत. लोकवशीकरणाचा मंत्र ज्याला उमगला त्याला ह्या पृथ्वीवर काय उणें आहे? लोकांचा जिव्हाळा मोडूं नये. एकांतांत विवेक स्फुरतो. म्हणून एकांत करावा. प्रसंग जाणून वागावें. अनिर्वाद करूं नये. समुदायाचें बरेंवाईट सोसावें. बहुतांचें सोसलें नाहीं तर समुदाय वाढत नाहीं. बरें अवघेंच सोसलें तर आपलें महत्त्व राहात नाहीं, म्हणून तारतम्यानें वागावें. लोकपरीक्षा चांगली ठेवावी. उन्मत्ताचा अभिमान डावपेंचानें जिरवावा.

आधीं मनुष्य ओळखावें । योग्य पाहूनि काम सांगावें
निकामीं तरी ठेवावें । येकीकडे ॥
मनुष्य राजी राखणें । हींच भाग्याचीं लक्षणें
कठीणपणें दुरी धरणें । कांहीं एक ॥
समयीं मनुष्य कामां येतें । याकारणें सोशिजे तें ।
न्याय्यचि नसतां मग तें । सहजचि खोटें ॥

समर्थांचें सांगणें संपल्यावर नमस्कार करण्याकरतां बाळाजी व निळो पगड्या सांवरीत पुढें आले. नंतर स्वामींनीं सर्वांचा निरोप घेतला व घोडोबाचे डोंगरांत ते निघून गेले.

एवढे मोठे शिष्य मिळाले. धनसंपदा मिळाली, पण स्वामींना त्याचें कांहीं नव्हतें. झपाझप पावलें टाकीत जाणाऱ्या आपल्या गुरूच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ती शिष्यमंडळी कितीतरी वेळ अचंब्यानें पहात होती. सूर्यास्त झाला होता — तरी प्रकाश बराच वेळ रेंगाळत राहिला होता.

*

समर्थांचा निरोप घेऊन शिवराय प्रतापगडावर आले. जिजाई वाट पहात होत्याच. त्यांनीं मातोश्रींना श्रीचें तीर्थ व प्रसाद दिला. आनंदानें फुलून गेलेल्या शिवबाच्या चेहऱ्याकडे पहात मातोश्री म्हणाल्या,

"काय दिलं स्वामींनीं ?"

"शिवबानें प्रसादाचा रुमाल मातोश्रींपुढें उघडा केला."

"छान ! मोठ्यांचा प्रसाद असाच असतो."

"म्हणजे काय मासाहेब ?"

"तुम्हांला नाहीं ना कळलें ?"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................. विः ॥.९३.॥........
क्रमांक .................. नों दि ..........



" तुम्हीं सांगा ना. "

" हें श्रीफळ तुमच्या कल्याणासाठीं आहे. "

" आणि ही माती कसली ? "

" तुम्हीं पृथ्वीपति होणार त्याची खूण ! "

" खडे ! "

" तुमच्या राज्यांतील किल्लेच ह्या खड्यांत दिसताहेत मला. "

" घोड्याच्या लीदेमध्यें पण असाच कांहीं संकेत असेल नाहीं ? "

" अलबत्. तुमचें अश्वदल समृद्ध होईल असा स्वामींचा आशीर्वाद आहे शिवबा. "

स्वामींचा आशीर्वाद घेऊन शिवबानें राजकारणाचीं पावलें टाकलीं. दर्शनाच्या ओढीनें शिवबा पुन्हां आले तर समर्थ भेटले नाहींत. ते तेथें नव्हतेच, पण त्यांच्या आज्ञेप्रमाणें त्यांच्या शिष्यानें रामाच्या डोक्यावरील फुलांचा तुरा शिवबाला प्रसाद म्हणून दिला. मोगऱ्यांच्या कळ्यांचा तो तुरा पूजेच्यावेळीं कल्याणानें स्वतः रामाच्या मस्तकीं खोंवला होता. आतां स्वामींच्या आज्ञेप्रमाणें एका शिष्यानें तो राजांच्या मस्तकीं खोंवला तेव्हां तो तत्काळ मोत्याचा झाला. सर्वांना विस्मय वाटला. शिवबांचे नेत्रीं उदक भरलें. शरीरावर रोमांच उभे राहिले नि डोळ्यांतले मोती दाढीच्या केसांवर पडूं लागले. समर्थांसारखा ईश्वर साक्षात्कारी पुरुष आपल्या पाठीशीं आहे ह्याचा शिवबाला केवढा आधार होता.

*

वैशाखांत शिवरायाला समर्थांनीं उपदेश केला. त्यावेळीं शहाजीच्या कैदेची हकीगत शिवबानें त्यांच्या कानीं घातली. वडिलांच्या सुटकेच्या मोबदल्यांत शिवबाकडे कोंडाणा किल्ला मागितला होता. तो किल्ला देऊन इतक्या दिवसांचा उद्योग फुकट घालविणें शिवबाच्या जीवावर आलें, पण समर्थांनीं सल्ला दिला,

" उदंड राजकारण दाटलें । तेणें चित्त विभागलें

राजा, उदंड राजकारणामुळें तुमच्या चित्ताची गडबड उडाली आहे. परंतु एक लक्षांत ठेवा, तुमच्या हातून धर्मस्थापना व्हावयाची असून 'धर्मसंस्थापक' अशी तुमची शाश्वत कीर्ति या जगांत राहावयाची आहे म्हणून —

धर्मसंस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे

धीरोदात्त माणसानें क्षणिक जयापजयाची पर्वा करूं नये. त्याचा उपयोग होत नाहीं. चढाईनें क्षणभर तुमचा जय होईल असें मानलें तरी तिकडे घातकी शत्रूनें शहाजीराजांना कांहीं दगाफटका केला तर ? तर जय मिळूनहि न मिळाल्यासारखाच होईल. आज सोडून दिलेले किल्ले उद्यां परत मिळवितां येतील. पण आपल्या वडिलांचे प्राण परत मिळवितां येणार नाहींत. ''

त्यावेळीं सोनोपंत डबीरांनीं पण स्वामींच्या सुरांतच सूर मिळविला. ते म्हणाले, '' स्वामी, आम्हीं तरी राजांना हेंच सांगत होतों ! ''

'' खरं आहे शिवबा. हे सांगत आहेत तेंच खरं आहे ! राजा, तुझ्या अंगीं असलेल्या पराक्रमाला सारी पृथ्वी मोकळी आहे. एका कोंडाण्याची एवढी काय गोष्ट घेऊन बसलास ? वडिलांस सोडवणें हेंच तुझें कर्तव्य आहे. ''

बाजीराव घोरपडे यांचें भोसल्यांशीं असलेलें वैर शहाजीराजांच्या सुटकेला बाधणार नाहीं एवढी तरतूद इकडे स्वामींनीं अंतस्थ रीतीनें करून ठेवली होती.

*

शिवबानें कोंडाणा दिला नि ज्येष्ठांत शहाजीची सुटका झाली. पण त्यांच्या सुटकेसाठीं कोंडाण्यासारखा बळकट किल्ला शिवाजीला हातचा सोडावा लागला आणि वर '' नवीन कांहीं अवाढाव करूं नये '' अशी बापाची आज्ञा झाली. अशा रीतीनें शिवरायांचे हात अडकल्यामुळें नवीन राजकारणाला अवकाश राहिला नाहीं.

*

**मंत्र परत घ्या**

शिवबांच्या इच्छेवरून समर्थ कांहीं दिवस सातार्‍यास राहिले होते. शिवबानें व्यवस्था चोख ठेवली होती. राजदरबारचाच थाट तो. पंक्तीला पांच पन्नास तरी माणसें असत. ताटांत नेहमीं रुचिसंपन्न नूतन पक्वान्न असे. आगांतुकी करणारा एक ब्राह्मण तेथें आला होता. त्याला वाटलें, समर्थांचा मंत्र घेतला म्हणजे गुरुबरोबर रोज पंक्तीचा लाभ घडत जाईल. समर्थ नको नको म्हणत असतांहि त्यानें त्यांच्याकडून मंत्र घेतला.

पुढें दोन चार दिवसांनीं समर्थ तेथून परिभ्रमणाकरतां बाहेर पडले. रोजची भिक्षांदेही नि उन्हातान्हांतून भटकणें सुरू झालें. हा आगांतुक कंटाळून नि वैतागून साताऱ्यास परत आला. शिष्याच्या ठिकाणीं आवश्यक असलेली पवित्रता, ज्ञानाची खरी तहान व चिकाटी त्याच्या ठिकाणीं नव्हती.

कांहीं दिवसांनीं रंगनाथस्वामी निगडीकर तेथें आले. त्यांचीहि उत्तम बडदास्त छत्रपतींनीं ठेवली. रंगनाथस्वामी राजैश्वर्यी होते. त्यांचा श्रीमंती थाट पाहून तो आगांतुक त्यांना मंत्र देण्याविषयीं गळ घालूं लागला. रंगनाथस्वामींनीं विचारलें,

" ह्याच्या आधीं तूं कुणाचा मंत्र घेतला आहेस का ? "

तो आगांतुक बोलण्यांत अडखळूं लागला; तसे ते म्हणाले,

" खरें सांग. "

" होय, घेतला आहे. "

" कुणाचा ? "

" रामदास स्वामींचा. "

" तर मग आम्हीं मंत्र देऊं शकत नाहीं. "

" कां ? "

" आधीं त्यांचा मंत्र परत देऊन ये. मग आम्हीं मंत्र देऊं. "

समर्थांचा शोध करीत तो भोळा ब्राह्मण निघाला.

उंबरज येथें कृष्णाकांठीं जपाची माळ ओढीत बसलेले समर्थ त्याला दिसले. त्यांच्याजवळ जाऊन तो म्हणाला,

" स्वामीजी, तुम्हीं दिलेला मंत्र परत घ्या. "

" कां रे बाबा ? "

" आम्हांला रंगनाथस्वामी निगडीकरांचा मंत्र घ्यावयाचा आहे. "

गालांतल्या गालांत मिस्कीलपणें हंसत दाढी कुरवाळीत समर्थ म्हणाले,

" ठीक आहे. तोंडांत त्या कृष्णेचें पाणी घेऊन या. "

" कशाकरतां ? "

" घेऊन या. "

त्या ब्राह्मणानें तसें केल्यावर समर्थ म्हणाले,

" आतां त्या दगडावर चूळ टाका नि निघून जा. "

त्याप्रमाणें त्या ब्राह्मणानें करतांच मंत्राचीं अक्षरें त्या खडकावर उमटलीं.

" श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम ॥ "

तो ब्राह्मण तीं अक्षरें डोळ्यांनीं वाचूं शकत होता; पण तोंडानें उच्चारूं शकत नव्हता. त्याची वाचाच निघून गेली होती.

समर्थांना तो सर्वभावें शरण गेला. मुक्यानें खुणवून त्यांची क्षमा मागूं लागला. दया येऊन समर्थ म्हणाले,

" तीं अक्षरेंच चाट बाबा. तुझी वाणी परत येईल. "

त्या ब्राह्मणानें तीं अक्षरें चाटतांच तो पूर्ववत् बोलूं लागला.

## * इथें कां रे उभा श्रीरामा

कृष्णातटाकीं समर्थ विहार करीत असतां वारकऱ्यांचे जथेच्या जथे भजन करतांना त्यांच्या दृष्टीस पडले. हरिप्रेमांत मंडळी तल्लीन होऊन टाळांच्या ठेक्यांत नाचत होती. गळ्यांतून ज्ञानोबा–तुकोबाचे मधुर अभंग बाहेर पडत होते.

" कुठं जातां मंडळी ? " समर्थांनीं कुतूहलानें प्रश्न केला.

" आषाढीच्या वारीला आम्हीं पंढरपूरला जात आहोंत. "

" आपण शिवबाचे सैनिक दिसतां. "

" आहोंतच. पण राजानें वारीला जातां यावं म्हणून रजा दिली आहे. "

" छान ! छान !! "

" आपणहि चला आमच्याबरोबर. आपल्याला भू-वैकुठं पंढरी पहावयास मिळेल व विठोराण्याचेंहि दर्शन घडेल. "

आपल्या तंद्रींतच असलेले समर्थ म्हणाले,

" आपला भाव गोड आहे. देवहि मोठा आहे. पण एका कोदंडरामाखेरीज आम्हांला दुसरं कांहीं गोड वाटत नाहीं.

रामदास म्हणे आतां सांडून रामाची कथा। आणिक सर्वथा चाड नाहीं रे ॥"

रामदासांच्या चोख उत्तरापुढें वारकरी काय बोलणार ? टाळांच्या ठेक्यांत त्यांची पालखी पुढें चालू झाली.

पण भक्तप्रिय विठ्ठलाला राहवेना. रामदासासारख्यानें आपल्या पंढरींत एक दिवस तरी पाहुणे यावें म्हणून त्याच्या मनानें घेतलें. मनांत आल्यावर त्या लीलाधराला काय वेळ ? नट–नाटकीच तो ! समर्थ पालखीच्या उलट

दिशेनें रस्ता आक्रमूं लागल्यावर त्यांना विठ्ठलभट भेटले. डोक्यावर तांबडी पगडी. कपाळाला केशरी गंध. कानांत पाणीदार मोत्याची भिकबाळी. अंगावर उपरणें. बोटांत हिऱ्यामोत्यांच्या आंगठ्या. समर्थांना थांबवून ते म्हणाले,

" आम्ही पंढरपूरचे उपाध्ये, विठ्ठलभट आमचें नांव."

" वा ! पंढरीचे विठ्ठलच कीं तुम्हीं ! "

भक्तानें ओळखलें कीं काय असें वाटून विठूराजा चपापला. पण उसनें अवसान आणून विठ्ठलभट पुढें बोलूं लागले.

" आपल्यासारखा भगवद्भक्त यजमान म्हणून लाभला तर मोठा भाग्यवान समजेन मी स्वतःला. "

" आम्ही असे कंगाल ! आमच्याकडून कसली प्राप्ति होणार तुम्हांला ? "

" आपल्या प्रेमभक्तीची. "

रामदासांना शब्द मोडवेना. वैकुंठीच्या राण्याला यश आलें. रामभक्त पंढरीला निघाला. वाटेंत समर्थ म्हणाले,

" माझ्याकडून आपल्याला खरोखरच कसली प्राप्ति होणार नाहीं हो. "

" कांहीं काळजी करूं नका. आपण द्याल त्यांतच संतोष मानीन मी. "

" पंढरपूरचे बडवे त्रास देण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. "

" आपण माझ्याबद्दल निर्धास्त असा. "

शके १५७१. आषाढी एकादशी ! वारकऱ्यांनीं वाळवंट फुलून गेलें होतें. नामघोषांनीं आकाशाला व्यापून टाकलें होतें. दिंड्यापताकांची पंढरींत गर्दी उडाली होती. महाद्वाराच्या मारुतीच्या देवळांत समर्थांना घेऊन विठ्ठलभट आले. समर्थशिष्य दत्तू नापिकहि त्या गर्दींत त्यांना भेटला. त्याच्याशीं ते बोलण्यांत गुंतले असतांना " आतां येतों. " असें म्हणून विठ्ठलभटानें तिथून पाय काढला. बराच वेळ वाट पाहिली. विठ्ठलभट कांहीं आले नाहींत. रामदासांना पंढरींत आणण्याचें काम करून त्यानें पोबारा केला होता. रामदासहि कच्चे नव्हते. प्रभूचा डाव त्यांनीं ओळखला. त्यांना हंसू आलें. मारुतीरायाला त्यांनीं विचारलें,

" तूंहि अयोध्या सोडून येथें उभा आहेस ? पण —

॥ आम्हां नाहीं चाड ते कोणा एकाची । दृढ राघवाची कांस धरूं ॥ "

मारुतीचें दर्शन घेऊन यात्रेकरूंबरोबर समर्थ नगरप्रदक्षणेस निघाले.

वाळवंटांत आल्यावर त्यांनीं मारुतीरायाचें ध्यान केलें. चंद्रभागा शरयूरूप झाली. पंढरीची अयोध्या झाली. स्नान करतांना वाणी साकार झाली :

" पंढरी ऐसें तिन्ही ताळीं । क्षेत्र नाहीं भूमंडळीं
दुरुनी देखतां कळस । होय अहंकाराचा नाश
होतां संताचिया भेटीं । जन्ममरण पडे तुटी
चंद्रभागेमाजीं नाहतां । मुक्ति लाभे सायुज्यता
रामदासा जाली भेटी । विठ्ठलपायीं दिधली मिठी

पंढरीराया, माझ्या रामभक्तीला भुलून या पंढरीची कीं रे अयोध्या केलीस !

" पंढरपुरीं मनोरथ ज्याचा । धन्य धन्य तो दैवाचा
जो जो पंढरीस गेला । तेणें कळिकाळ जिंकीला
रामदास म्हणें पंढरी । नाना साधनेवीण तारी "

पंढरीची हवा भक्तीला पोषक आहे हें रामदासांनींहि जाणलें. लोटांगण घालीत ते महाद्वारांत आले. गरुडखांबाला उराउरीं भेट दिली. पंढरीच्या राण्यापुढें उभें राहिल्यावर भक्तिकल्लोळानें त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. सद्‌गदीत कंठानें ते म्हणाले,

" कांहीं बोल रे विठ्ठला । मौन वेष कां धरिला
काय मागतों गांठोडीं । बोलसी ना धरिली अढी ।

रागावलास होय रे ! "

मध्येंच त्यांना विटेवर वाटेंत भेटलेल्या विठ्ठलभटाचें रूप दिसूं लागलें. स्वतः पंढरीनाथ त्यांना पंढरीस घेण्यासाठीं आले होते. रामदासांची भक्ति तशी मोठीच होती ! पण त्यांना वाटलें विठ्ठलराण्याची केवढी माया भक्तांवर ! थांबलेली रसवंती पुन्हां ओघानें वाहूं लागली.

" विठ्ठला !

आशा वैभवाची नाहीं । भिऊं नको वद कांहीं
न लगे मज धनदारा । वेगें लोचन उघडा
दास म्हणे वाट पाहे । कृपा करून भेटावें ॥ "

डोळे मिटून ते पंढरीच्या सामोरे उभे होते. पुन्हां मनांतील भाव पालटले. देवाशीं भांडण्याची ऊर्मि आली. रामदास खडसावून बोलूं लागले,

"देवा, मुरली मुकुट घेऊन नुसता विलास करीत व खेळत बसण्याची का ही वेळ आहे ? देशांत काय हलकल्लोळ उडाला आहे, तुला दिसत का नाहीं ? मी नाहीं असल्या तुझ्या विलासी रूपाला नमस्कार करायचा. अधर्माचा बंदोबस्त करण्यासाठीं तुम्हीं हातांत धनुष्यबाण घ्याल तरच मी तुमच्यापुढें नतमस्तक होईन. तुमच्या शस्त्रधारी स्वरूपाचा आविर्भाव पाहून भक्तांनाहि हुरूप येईल. तुझे वारकरी हेच शिवबाचे पायिक आहेत. त्यांना शक्ति दे, यश दे.

इथें कां रे उभा श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा
काय केली शरयूगंगा । येथें आणिली चंद्रभागा ॥
काय केली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ॥
काय केलें धनुष्यबाण । कर कटावरी ठेले
काय केली सीताबाई । येथें राई रखुमाई
काय केला वानरमेळा । येथें हनुमंत एकला
रामीं रामदासीं भाव । तैसा झाला पंढरीराव ॥

समर्थांचा दृढ भक्तिभाव पाहून कटीकर विठ्ठल कोदंडधारी राम झाला ! रामकृष्णांच्या अवताराची ओतीव मूर्ति म्हणजेच हा विठ्ठल नाहीं का ?

समर्थांनीं पाहिलेली ही पंढरी अध्यात्मिक आहे. इथें आत्मदर्शन हेंच विठ्ठल दर्शन आहे. रामदास हे प्रभु रामचंद्राचे निस्सीम भक्त होते. त्यांच्या अनन्य भक्तीमुळेंच विठ्ठलाच्या जागीं सुद्धां त्यांना कोदंडधारी राम दिसूं लागला. आपला हाच भाव त्यांनीं वरील पद्यांत प्रकट केला. शेवटीं आपलेंच दैवत सर्वत्र दिसणें हा भावबळाचा उच्चांकच म्हणावा लागेल, नाहीं का ?

*

१५७७ च्या वैशाख शुद्ध द्वितीयेला माहुली संगमावरून स्नान करून करंजांतून भिक्षा मागत समर्थ साताऱ्च्या मार्गास आले. वाटेंत शिवरायाचा वाडा होता. त्यांत ते शिरले. कर्मधर्मसंयोगानें शिवबा वस्तीला तेथेंच होते. स्वामींची 'जयजय रघुवीर समर्थ' ही हांक ऐकतांच शिवराय स्वतः सामोरे आले. स्वामींना पाहून हंसत म्हणाले, "तुम्हांला आम्हीं काय भिक्षा घालावी ?"

"तुम्हांला योग्य वाटेल ती घाला !"

शिवबांनीं त्यांच्या झोळींत एक चिठ्ठी टाकली. समर्थांनीं ती वाचली. त्यावर लिहिलें होतें —

" श्रीकृष्णे संपादिले तें सर्व श्रीचरणीं अर्पण — "

हंसत हंसत समर्थ म्हणाले,

" मग आपण काय करणार आबासाहेब ? "

" श्री सांगतील ती सेवा करूं आम्ही. "

" उत्तम " ! आपली झोळी शिवबाच्या खांद्यावर ठेवीत ते म्हणाले,

" चला तर आतां आमच्याबरोबर भिक्षेला. "

राजा गोपीचंदाप्रमाणें शिवाजीराजे झोळी घेऊन सद्गुरु समर्थांच्या मागोमाग भिक्षेकरतां बाहेर पडले. समर्थ म्हणाले,

" शिवबा, पाहिलंस ना. आमचं सुख कसं आहे तें ! "

" महाराज ! हें सुख जन्मभर मिळावें अशी इच्छा आहे."

सहज चेष्टा म्हणून समर्थांनीं मजा केली; पण शिवबाच्या मनांत खरोखरच वैराग्य उत्पन्न झालें. शिवाजी महाराज समर्थांना म्हणाले,

" मला हें राज्यधन नको. कारण राज्यांतीं नरक आहे. मला शुद्ध परमार्थ हवा. "

समर्थ गंभीर होऊन म्हणाले,

" शिवबा, राज्यांतीं नरक कोणाला ? स्वधर्मानं स्वराज्य स्थापणाऱ्या माझ्या शिवबाला ? नाहीं नाहीं, तर ऐका—

अनीतीनें स्वार्थ पाहे, राजा पापी होऊन राहे । राज्यांतीं नर्क आहे ॥

तुमच्यासारख्या पुण्यवंत कुलशील असणाऱ्या राजाकरतां नर्क नव्हे. राजा, विचारांचा असा गोंधळ करूं नका. वैयक्तिक न्यायनीतीच्या आणि राजनीतीच्या मर्यादा वेगळ्या. राजसाधनांत कोठेंहि व्यक्तिस्वार्थ नसावा. किंवा तज्जन्य अनीति नसावी म्हणजे झालें. तुम्ही क्षत्रिय आहां. वैराग्याचे विचार तुम्हांला शोभत नाहींत. सज्जनांचा प्रतिपाळ व दुर्जनांचा संहार करून राज्य संपादणें नि तें वाढविणें हेंच तुमचें कर्तव्य. हाच तुमचा खरा धर्म ! नाहींतर—

कैंची वांचतील जनें । कैसी ब्राह्मण्यें राहतील
कैसी क्षेत्र राहेल जगतीं । कैसी देवदेवालयें तगती
कैसे कुटुंबवत्सल लोक जगती । कोणीकडे जातील हे
प्रपंचीं जो सावधान । तोच परमार्थ करील जाण
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा
म्हणुनी आधीं प्रपंच करावा नेटका —

९८३६८ क्र. क्र.

तुमच्यासारख्यांच्यावर तर देशाचा प्रपंच करायची जबाबदारी ! ”

राजे शिवाजी जिवाचे कान करून ऐकत होते. ऐकतां ऐकतां त्यांची समाधि लागली. त्यांचे खांदे हलवून समर्थ म्हणाले,

“ माझी आठवण म्हणून तुमच्या राज्याचा झेंडा भगवा ठेवा. ”

“ जशी आज्ञा. ”

शिवबाच्या स्वराज्याचा झेंडा भगवा होता. त्याची पूजा त्यागानें होत होती. वीरांच्या पराक्रमांतून नि संतांच्या वैराग्यांतूनच हा झेंडा जन्माला आला.

शिवबाची चिठ्ठी त्याच्या हातांत देत समर्थ म्हणाले,

“ घ्या ”

“ एकदां दिलेलें दान हा राजा परत घेत नसतो, स्वामी. ” हंसत हंसत समर्थ पुन्हां समजूत काढूं लागले,

“ ठीक आहे राजा. हें राज्य आतां आमचें झालें. पण तें नीतीनें नि न्यायानें सांभाळण्याकरतां आम्ही तुमच्या स्वाधीन करीत आहोंत. तुम्ही आमचं ऐकणार नाहीं का ? ”

“ नाहीं कसं म्हणणार ? ” शिवाजी राजे हंसले. राजांनीं समर्थांना मुजरा केला व ‘ सलाम ’ म्हटलें. समर्थ म्हणाले,

“ राजे, ह्यापुढें एक करा. ”

“ काय स्वामीजी ? ”

“ सर्वांनीं आपआपसांत रामराम म्हणत जावें – अशी सर्वांना मर्यादा घालून द्या, म्हणजे अनायसें रामनामहि जपलें जाईल. ”

शिवबानें फर्मान काढलें व तेव्हांपासून परस्परांना ‘ राम, राम ’ म्हणण्याचा दंडक चालू झाला. गांवागांवांतून मंडळी भेटली कीं, ‘ राम, राम पाव्हणं ’ किंवा ‘ राम, राम मंडळी ’ हे घोष ऐकूं येऊं लागले.

*

विजयादशमीचे दिवशीं ज्यानें त्यानें आपले घोडे उत्तमप्रकारें शृंगारून श्रीसमर्थांच्या दर्शनास जावयाचें व त्यांचा आशीर्वाद घेऊन मग मुलुखगिरी करण्याकरतां निघायचें असा मराठे सरदारांचा परिपाठ असे. समर्थांना घोड्यांची परीक्षा होती. मनांत येईल त्या घोड्यावर ते स्वार होत. ज्याच्या

घोड्यावर समर्थ बसत तो मोठा भाग्यवान ! अशी त्यांची मनोधारणा होती. हें भाग्य आपणांस लाभावें म्हणून प्रत्येकजण हपापलेला असे.

दसऱ्याच्या दिवशीं पन्नास घोडेस्वार आपआपलीं घोडीं धरून समर्थांच्या समोर उभे होते. दसऱ्याच्या मुहूर्तावर एक उत्तम घोडा शिवाजीराजांस कुणीतरी नजर केला. शिवाजीराजांनीं तो तसाच वस्त्रालंकार व जीनखोगिरासह स्वामींकडे पाठविला. तें उमदें घोडें फुरफुरत होतें. स्वामींना घोडा आवडला. पण ते म्हणाले,

" ह्याला इतका साजशृंगार कशासाठीं ? मोकळा करा त्याला. आज्ञेप्रमाणें लगामासुद्धां सर्व अलंकार सेवकांनीं दूर केले. नंतर त्या घोड्याची आयाळ धरून समर्थांनीं त्याच्या पाठीवर उडी घेतली. बसणारा उस्ताद आहे हें त्या चतुर घोड्यानें तेव्हांच ओळखलें व टापा खडखडत तो भरधांव वेगानें निघाला.

समर्थांची मांड बळकट होती. दोन प्रहरची वेळ. घोडा आपला धांवतोच आहे. चढउतार, कांटेकुटे, दगडगोटे कशाची म्हणून त्यानें पर्वा केली नाहीं. समर्थांनींहि त्याला आवरलें नाहीं. फिटूं दे त्याचीहि धांवण्याची हौस ! धांव !

रामाच्या बाणासारखा तो धांवला म्हणून समर्थांनीं त्याचें नांव ठेवलें रामबाण.

समर्थांना तहान लागली होती. त्यांनीं मागें वळून पाहिलें तर उद्धव गोसावी घोड्यामागें धांवत येत होता. समर्थांनीं त्याच्याजवळ पाणी मागितलें. समर्थांनीं पाणी मागतांच उद्धवानें धांवत्या घोड्यावर त्यांना तें कौशल्यानें दिलें. संतोष पावून समर्थांच्या तोंडून उद्गार निघाला, " शिव. "

त्यावेळेपासून उद्धव गोसावी शिवराम झाले !

*

शके १५७७ च्या वैशाखांत समर्थ व शिवराम दोघेहि एकाच वेळीं साताऱ्यांत होते. पण त्यावेळीं समर्थांचें साताऱ्याला राजवाड्यांत राहणें झालें नाहीं. उलट, शिवबाला त्यांनीं आपल्याबरोबर भिक्षांदेही करायला लावलें. पण शके १५८० च्या पौषांत तसा योग आला.

शिवाजीराजांवर चढाई करण्याची मसलत विजापुरांत घाटत होती. तद्संबंधींच्या बातम्या शिवरायाकडे येत होत्या. त्याबाबतींत जो विचार करायचा तो राजवाड्याच्या खलबतखान्यांत निवांतपणें करतां येईल आणि

समर्थांची सेवा व सहवासहि चार दिवस घडेल अशा विचारानें शिवरायानें चांफळला निरोप धाडला.

चार दिवसांत येतों म्हणून समर्थांकडून निरोप आला. ते दिवस हुरड्याचे होते. वाटेनें गप्पागोष्टी करीत, शेतांतलीं दोनचार कणसें तोडीत ही मंडळी देहगांवपर्यंत आली. तोंपर्यंत बरींच कणसें गोळा झालीं होतीं. चांदणें मस्त पडलें होतें. थंड वारे अंगाला बोंचत होते. समर्थांच्या शिष्यांनीं शेकोटी पेटवली. विहिरीजवळ आंब्याच्या झाडाखालीं एका शेतांत हुरड्याच्या कार्यक्रमाला रंग भरला. पण त्या शेताचा मालक तेथें आला नि त्यानें रंगाचा बेरंग केला. त्या गोसावड्यांना त्यानें यथेच्छ बदडून काढलें. शिष्य धांवले तेव्हां समर्थ म्हणाले,

" त्यांचीं कणसें खाऊन त्यांनाच मारतां ? नका ! नका !! "

" कणसें खाल्लीं तसा आतां मारहि खाऊं या. "

समर्थांची शांति पाहून चिलाजी पाटील मनांतून चमकला. नंतर त्याला समर्थ म्हणाले, " पाटील हीं सर्व कणसें आपल्या मळ्यांतील नाहींत. येतांना प्रत्येक शेतांतून दोन दोन अशी आम्ही तोडून आणलीं आणि आपल्या मळ्यांत विश्रांतीला थांबलों. " नंतर त्याला कळलें कीं हे शिवबाचे गुरु आहेत.

*

शिवाजीच्या वाड्यांत स्नान करतांना स्वामींच्या अंगावर शिवबांना वळ दिसले. शिवबानें विचारलें,

" स्वामी, हे वळ कशाचे ? "

" कणसं खाल्लीं. मारहि खाल्ला. "

" महाराज, काय घडलें तें नीट तरी सांगा. "

" त्यांत सांगण्यासारखें कांहींच नाहीं राजा — "

समर्थ सांगेनात आणि शिवबाला चैन पडेना. शेवटीं एका शिष्याला एकांतांत गांठून शिवबांनीं सगळी माहिती काढून घेतली व चिलाजीस बोलावणें पाठवलें.

समर्थांपुढें त्याला उभें करून शिवबा म्हणाले,

" सांगा, याला काय शिक्षा करूं ? "

" मी सांगेन ती कराल शिक्षा आपण ? "

" हो, करीन. "

" मग चिलाजी, आधीं आपण आबासाहेबांच्या पायांवर डोकें ठेवा पाहूं, चिलाजी पाटलानें तसें केल्यावर समर्थ शिवबाकडे वळून म्हणाले,

" आतां तुम्हीं ह्याला एक शेलापागोटें नि तरवार बक्षिस द्या. "

" स्वामीजी, ही चेष्टेची वेळ नव्हे. "

" नाहीं शिवबा, खरंच चेष्टा करीत नाहीं मी. तुम्हीं राजे आहांत. तुमची कशी चेष्टा करीन ? आणा. एक तरवार आणा. "

स्वतः त्याच्या कमरेला तरवार लटकावीत समर्थ म्हणाले,

" काय शिवबा, चिलाजी अगदीं नामी सरदार दिसतो कीं नाहीं ? असल्या शूर सरदारांची आपल्याला आतां जरुरी आहे. असल्या चांगल्या शिपायाला उगीच भलतीसलती शिक्षा देण्यांत काय फायदा ? तरवारीनें त्यांना मारायचं नाहीं, तर तरवार त्यांच्या कमरेला लटकावून त्यांच्याकडून पराक्रमाच्या गोष्टी करवून घ्यायच्या. "

समर्थांनीं त्या निमित्तानें शिवबाला लोकवशीकरणाचा मंत्र सांगितला. साधुसंतांच्या त्या निवाडा पद्धतीनें मराठ्यांचा राजा थक्क झाला.

*

शके १५७१ च्या ज्येष्ठांत शहाजींची सुटका झाली तरी १५७५ पर्यंत त्यांना कर्नाटकांत जाण्यास परवानगी मिळाली नाहीं; त्यामुळें शिवाजीचे हातहि बांधल्यासारखे झाले. समर्थांचें राजकारणहि लंगडें पडलें. कांहीं वेळ थांबावें लागेल नि वेळ फुकट जाईल म्हणून मधला काळ ते शिवथर घळींत जाऊन राहिले. तेथें दासबोधाचें पुढील काम त्यांनीं सुरू केलें. दासबोधाचें काम चालू असतांहि चंद्रराव मोऱ्यांच्या हालचालींवर समर्थांचें लक्ष होतेंच !

*

कर्नाटकांत बंडें उपस्थित झाल्यामुळें त्यांच्या बंदोबस्तासाठीं शके १५७६ च्या हिंवाळ्यांत शहाजीराजे विजापूर सोडून कर्नाटकाचे मोहिमेवर गेले. अफझलखानहि तोरणगडकडील जहागिरीवर गेला होता. त्यामुळें शहाजीराजांच्या अटकेपासून शिवरायाच्या आक्रमक राजकारणांस जे बंध पडले ते एकदम सुटले; आणि शिवाजीराजे चढाईच्या राजकारणासाठीं उतावीळ झाले. पदरचे मुत्सद्दी आणि शिवाजीराजे यांच्यांत मतभेद झाला. त्यांचाहि विचार चढाईस अनुकूल नव्हता. शिवाजी राजे रुसले, ही गोष्ट

समर्थांच्या कानावर आली. त्यांचा रुसवा काढण्यासाठीं शहाजींची भेट घेण्याच्या हेतूनें समर्थांनीं रामेश्वर यात्रेस जाण्याचें ठरविलें. पुढील राजकारणाचा आराखडा शहाजीच्या सल्ल्यानें ठरणार होता. शहाजीराजांनाहि उपदेशाच्या चार गोष्टी सांगणारा कुणीतरी अधिकारी पुरुष हवा होताच.

पण तिकडे जायचें कोणी ? कारण पदरचा एखादा प्रमुख विश्वासू मुत्सद्दी कर्नाटकांत पाठवणें धोक्याचें होतें, आणि सामान्य जासूदाच्या हातून तें काम होण्यासारखें नव्हतें. म्हणून हें कार्य समर्थांनीं स्वतः अंगिकारलें. रामेश्वराच्या यात्रेची तयारी चालविली. सगळा वैशाख महिना घालमेलींत गेला. आतां निघायचें इतक्यांत मातुश्रींचा अंतःकाळ समीप आल्याचें समर्थांना कळलें. घाईघाईनें समर्थ जांबेस गेले. मरणाच्या दारांत उभी असलेली ती वृद्ध माता समर्थांची आठवण काढीत होती. श्रेष्ठांच्या मांडीवर डोकें ठेवून निजलेली ती वृद्धा विचारत होती,

" नारोबा कुठंय ? अजून नाहीं का रे आला ? "

" हा बघ मी आलोंय् आई. " म्हणत रामदास तेथें उभे राहिले. आपले थरथरते हात त्यांच्या अंगावरून फिरवीत दासांची आई म्हणाली,

" तुझी भेट झाली, आतां मला कसलीच इच्छा नाहीं रे नारायणा. "

" आई ! "

" तुला जन्म देऊन धन्य झालें रे बाळा. "

" आई, केवळ तूं माझी माता नाहींस. विश्वमाता आहेस तूं ! "

" नको रे. असा नसता मोठेपणा नको चिटकवूंस मला. "

" खरंच आई, माझ्या हातून जें जें घडलें तें तें साऱ्या तुझ्या पुण्याईचेंच फळ आहे. तुला मोठेपणा देण्याचा प्रश्नच नाहीं. तूं स्वयंसिद्धा आहेस. "

" श्रीराम ! "

मातेच्या तोंडून अखेरचे शब्द बाहेर पडले आणि त्या जगन्मातेनें डोळे मिटले. तो दिवस म्हणजे शके १५७७ ज्येष्ठ शु. तृतीया.

मातोश्रींचें और्ध्वदैहिक यथाविधि करून ज्येष्ठ वद्यामध्यें समर्थ परळींत संध्यामठीचे बाहेर प्रगट झाले. पुढें शुभमुहूर्तावर ते रामेश्वराचे यात्रेस निघाले. डोक्यांत राजकारण खेळत होतें आणि मधूनमधून आईच्या गोड आठवणीनें मन भरून जात होतें.

शहाजीराजांच्या सुटकेनंतर मावळ प्रांतावरचा आपला ताबा मजबूत करण्याकरतां शिवाजीला मोऱ्यांचा पाडाव करावा लागला. कारण तसें केलें नाहीं तर आपला उद्योग साफ फसणार अशी शिवाजीला काळजी वाटली.

शिवाजीच्या उद्योगाला आळा घालण्याचें सामर्थ्य आतां विजापूर दरबारांत अजिबात राहिलें नव्हतें. उलट, शहाजीला त्यांनीं 'महाराज' व 'फर्जंद' अशीं विशेषणें लावलीं. अफझूलखान जावळीखोऱ्यांत नाहीं असें पाहून शिवाजीनें आपली फौज जावळीवर रवाना केली. यावेळीं युद्ध होऊन हणमंतराव मोरे मारला गेला; आणि प्रतापराव मोरे विजापुरास पळून गेला. जावळीचें ठिकाण शिवाजीनें हस्तगत केलें. मोऱ्यांची पागा मोठी होती. जावळी प्रांत समृद्ध आणि उत्पन्नाचा असल्यामुळें मोऱ्यांच्या पाडावानें शिवाजीस मोठा फायदा झाला. त्या प्रांतांतले शूर लोक शिवाजीच्या सैन्यांत दाखल झाले. शिवाजीची फौज दुप्पट झाली. बाळाजी आवजी चिटणीस झाला.

नंतर शिवाजीनें रायगड किल्ला घेतला. प्रतापगड बांधला. तुळजापूरला नित्य जाणें होत नाहीं म्हणून प्रतापगडावर देवीची स्थापना केली. मोऱ्यांचा पाडाव झाल्यापासून विजापूर दरबारावर एकामागून एक संकटें येऊं लागलीं. जावळी, सिंहगड, पुरंदर, रायगड, प्रतापगड हीं नाक्याचीं ठिकाणें घेऊन शिवाजी स्वतंत्र झाला. तेव्हां लढून किंवा कपटानें त्याचा पाडाव करणें विजापूर दरबाराला अपरिहार्य झालें. अफझूलखान हा एक हिंमतीचा वीर विजापूर दरबारीं होता. कपटविद्येंत खानाचा लौकिक मशहूर होता. विजापूर दरबारांत शिवाजीला पकडण्याचा विडा उचलून तो निघाला.

* **तुझा तूं वाढवी राजा**

अफझूलखान निघाला त्याच्या अगोदर चारसहा महिने समर्थ महाबळेश्वर, जावळी, वाई इत्यादि आसपासच्या भागांत संचार करीत होते. ह्या दाढीवाल्या बैराग्यानें इतक्या गुप्तरीतीनें टिपणी चालविली असेल अशी कुणाला शंकासुद्धां आली नाहीं. पण भिक्षेच्या निमित्तानें सर्व परिस्थिति सूक्ष्मपणें पाहिली जात होती नि त्याप्रमाणें शिवबाकडे निरोप जात होते.

विजापुराहून अफझूलखान निघाल्याची बातमी शिवबाच्या कानांवर आली तेव्हां पुढील तजविजीसाठीं कार्यकर्त्यांची खास बैठक भरली. शिवाजीराजे

चिंताक्रांत होते. तेवढ्यांत स्वामींकडून आलेला लखोटा हुजऱ्यानें आणून दिला. शिवबानें वंदन करून तो फोडला व वाचण्यास सुरुवात केली :

विवेकें करावें कार्यसाधन
जाणार नरतनु हें जाणोन
पुढील भविष्यार्थी मन
रहावेंचि नये ॥ १ ॥
चालों नये असन्मार्गी
सत्यता बाणल्या अंगीं
रघुवीर कृपा ते प्रसंगीं
दास महात्म्य वाढवी ॥ २ ॥
रजनीनाथ आणि दिनकर
नित्यनेमें करिती संचार
घालताती येरझार
लाविलें भ्रमण जगदिशें ॥ ३ ॥
आदिमाया मूळ भवानी
हेंचि जगाची स्वामिनी
येकांतिं विवेक धरूनी
इष्ट योजना करावी ॥ ४ ॥

त्याच लखोट्यांत दुसरी चिठ्ठी होती :

इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहों नये ।
लिहायचें सांगो नये । जबानीनें ॥

स्वामींच्या राजकारणनैपुण्यानें शिवबा थक्क झाले.

*

प्रतापगडावर राजकारणी बैठकी घडत होत्या आणि इकडे रामदास जावळीच्या रानांतून भटकत होते. भटकतांना कांहीं गोष्टी हेरून ठेवत होते.

भटकत भटकत ते पारघाटांत प्रतापगडाजवळ देवीच्या दर्शनास आले. प्रसन्न रामवरदायिनी समोर उभी. भोंवतीं कोयनेचें खोरें, प्रतापगड, महाबळेश्वर, जावळी आणि रडतोंडीचा तो घाट ! सारेजण गुप्त संकेताची जणुं वाट पहात होते.

देवीसमोर टांगलेली घंटा त्यांनीं वाजविली तेव्हां तिचा आवाज दऱ्या-खोऱ्यांतून घुमत राहिला. समर्थांनीं राजकारण केलें तें कोणत्या स्वार्थी हेतूनं केलं नाहीं. आईपाशीं त्यांनीं एकच मागणें मागितलें,

येकचि मागणें आतां । द्यावें तें मजकारणें
तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हांसी देखतां
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी

एवढें मागणें मागून त्यांनीं दोन्हीं हातांची ओंजळ देवीपुढें मिटली. आई, माझ्या शिवराजाला यश दे, वैभव दे ग !

जीवाला जीव देणारे सवंगडी जसे शिवबाला लाभत होते तसे त्यांचा अभिमान वाटावा असे शिष्योत्तम स्वामींनाहि मिळत होते. भोळाराम हा त्यांपैकींच एक.

ह्याचें मूळ नांव राम. हा औरंगाबादचा. आळशी नि जडबुद्धीचा. कुठलेंहि काम तो धड करीत नसे. त्याला समजावून सांगितलें तरी कळत नसे. बापानें त्याला हांकलून दिलें नि हा समर्थांकडे येऊन राहिला.

एकांतवासासाठीं समर्थांना घळी फार पसंत पडत. जरंडेश्वरांतील गुंफा, चंद्रगिरीची घळ, चांफळची रामघळ, दासघळ, भैरवघळ, शिवथरची घळ, तारळ खोऱ्यांतली कळव्याची घळ, हेळवाकची किंवा कोंढवळची घळ. इथेंच आलटून पालटून समर्थांचें वास्तव्य असे. उन्हाळ्यांतहि घोंगडी पांघरून थंडीचें निवारण येथें होत नसे, तिथें दिशांचा महापट पांघरून पहांटेच्यावेळीं वरतून पडणाऱ्या गार पाण्यांत स्नान करणाऱ्या स्वामींना शीतबाधा झाली असल्यास नवल नाहीं.

समर्थांना कफाची व्यथा होती. एकदां पिकदाणी भरली. ती स्वच्छ करण्यास कुणीं दिसेना. त्यांनीं हें काम रामास सांगितलें. त्यानें भोळेपणानें तें काम केलें म्हणून समर्थ त्यास भोळाराम म्हणूं लागले. पुढें ह्याच नांवानें लोक त्याला ओळखूं लागले. समर्थकृपेमुळें हा पुढें मोठा महन्त बनला. समर्थांनीं त्याला स्वतःच्या हातानें मेखला, जपमाळ, छाटी, झोळी दिली. सोबतीकरतां दासबोध व मनाच्या श्लोकांच्या प्रती दिल्या. वऱ्हाडांत एलिच-पूर येथील मठाचीं सूत्रें त्याच्याकडे दिलीं; आणि वियोग होतांना त्यास आशीर्वाद दिला.

*

**शके १५८१**

निवडक बारा हजार फौज घेऊन अफझूलखानानें विजापुराहून कूच केलें. शिवाजीचें अधिष्ठान पुणें असल्यामुळें तिकडेच जाण्याचा रोख धरून तो पंढरपूर, माणकेश्वर, करकंब, भोसे, शंभुमहादेव, मलवडी, आदि गांवांवरून रहिमतपुरीं आला. वाटेंत हिंदूंचीं देवळें त्यानें उद्दामपणें उध्वस्त केलीं. पंढरपूरच्या विठोबाची दुर्दशा केली. तुळजा भवानीची विटंबना केली. मलवडी येथें बजाजी निंबाळकरास पकडून हिंदूंचा पुरस्कार केल्याबद्दल त्यास तंबी दिली.

रामदासी बैराग्यांकडून आणि आपल्या हेरांकडून शिवबांना ह्या बातम्या गडावर कळत होत्या. विचार करून गोष्टी ठरत होत्या. पुण्याकडील मैदानी प्रदेशांत खानाशीं सामना देणें श्रेयस्कर नाहीं असें ठरवून त्या बाजूचा पक्का बंदोबस्त केला व ते प्रतापगडावर येऊन राहिले. वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या अवघड प्रदेशांत खानास गांठून त्याची दुर्दशा उडवावी असा बेत शिवबांनीं योजला. हिंदु देवस्थानांच्या उच्छेदामुळें लोकांचीं मनेंहि प्रक्षुब्ध झालीं होतीं. खानाचा पाडाव करण्यासाठीं मराठ्यांचे बाहू स्फुरण पावत होते. तरीहि सामना अवघड होता ह्याची शिवबांना कल्पना होती. ते चिंताक्रांत होते.

रामदासांनीं योग्यवेळीं शिवबांना चार गोष्टी लिहून कळविल्या—

ऐसे लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं
पापी अपस्मार जनीं । राक्षस जाणावे ॥
समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें
हट्ट निग्रहीं न पडावें । विवेकीं पुरुषें ॥
बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडले तट
कोणी येकाचा शेवट । जाला पाहिजे ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भोवानी
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥
अखंडचि सावधाना । बहुत काय करावी सूचना
परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥

म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड
याकारणें अखंड । सावधान असावें ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार
परीक्षिणें परांतर । देणें ईश्वराचें ॥
महायेत्न सावधपणें । समई धारिष्ट धरणें
अद्भुत कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥
येश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥

शिवबा,

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥
गनिमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुरफुरती भुजा
ऐसा पाहिजे कीं राजा । कैंपक्षीं परमार्थी ॥
हीं धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥
घटासी आणावा घट । उद्धटासी पाहिजे उद्धट
खटनटाशीं खटनट । अगत्य करी ॥

शिवबा,

अनेक प्रसंग अनेक वेळां येतात नि जातात. त्यांतूनच माणसं तयार होतात. आपण धीर सोडूं नये. आपल्या कसोटीची हीच वेळ आहे.

सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें
परंतु तेथें । भगवंताचें अधिष्ठान पाहिजे

तुझ्यामागें तें निश्चितच आहे रे राजा !

*

शिवाजी प्रतापगडावर आहे अशी खबर लागतांच खानानें पुण्याकडील रोख सोडून वाईस येऊन वास्तव्य केलें. अफझूलखानातर्फे कृष्णाजी भास्कर कुळकर्णी व शिवाजीतर्फे पंताजी गोपीनाथ बोकील ह्यांच्या, एकमेकांचे निरोप घेऊन चकरा सुरू झाल्या. राजकारणाच्या पटावरील हत्ती-घोडेहि पुढेंमागें सरकूं लागले. विश्वासराव नानाजी मुसेखोरेकर फकिराच्या वेषांत खानाच्या छावणींत जाऊन, शिवाजीस, ‘ खानाचें सैन्य मोठें असून प्रतापगड-

जवळील वेढा त्यानें आवळत आणला आहे ' अशा गुप्त बातम्या आणून देत होताच. शेवटीं शिवाजीनें शक्तीला बुद्धीनें आव्हान केलें व खानाकडे निरोप पाठविला,

"एवढ्या मोठ्या सैन्याशीं सामना करण्याची आमची ताकद नाहीं. झालेले अपराध पोटांत घालून खान जीवदान देतील तर आम्ही आमच्या ताब्यांतील कांहीं मुलूख सोडून देण्यास तयार आहोंत."

हुरळला! बलाढ्य खान हुरळून गेला!! त्याला वाटलें, शिवाजी भ्यायला. आपली मोहीम आतां फत्ते होणार!!!

डोंगराळ व झाडीच्या गर्द प्रदेशांत लढाई करण्याची त्याचीहि इच्छा नव्हतीच. भेटीला बोलावून दगाफटका करून ह्या डोंगरी उंदराला पकडावें असा मनसुबा खानानें रचला.

खानाचें सैन्य वाईपासून महाबळेश्वरपर्यंत पसरलें होतें. उलट, शिवाजीचें सैन्य झाडीझुडपांतून लपल्यामुळें दिसून येत नव्हतें.

एकमेकांच्या वाटाघाटींतून उभयतांची भेट किल्ल्याच्या पायथ्याशीं व्हावी असें ठरलें.

शके १५८१.

मार्गशीर्ष शु. ७ गुरुवार. आज मराठ्यांचे शिवाजीराजे अफझूलखानाला भेटणार.

भेटीची व पुढील व्यवस्था कशी ठेवावयाची ह्याबद्दल बारीक सारीक तपशील आगाऊच ठरले होते. अनिष्ट गोष्ट घडल्यास किल्ल्यांचा व राजाचा बंदोबस्त कसा करायचा ह्याची निरवानिरव करून भवानीमातेचें दर्शन नि आशीर्वाद घेऊन व मातोश्रींच्या पायां पडून सद्गदित कंठानें शिवबा म्हणाले,

"आम्ही ही होड आरंभिली, श्री सिद्धीस नेईलच. कदाचित् वांकडें झाल्यास शत्रूस बुडवावें व राज्य रक्षावें. जय भवानी!"

आणि अखंड स्थितीचा निर्धारू, श्रीमंत योगी, नरपति, हयपति, गजपति भूपति, वरदवंत, पुण्यवंत, सुकुलीन, नीतिवंत जाणता–नेणता राजा, मराठ्यांचा पोशिंदा, स्वामी रामदासांचा शिष्य, महाराष्ट्राचा भाग्यविधाता नि स्वराज्याचा शिल्पकार प्रतापगडाच्या खालीं उतरूं लागला.

अंगांत चिलखत व त्यावर अंगरखा. डोकीस शिरस्त्राण व त्यावर पागोटें, उजव्या हातांत भवानी तरवार. असा शिवाजी ठरल्याजागीं खानाला सामोरा आला. प्रतापगड चिंताक्रांत होता. वैरी चिंतिणार नाहीं असे विचार त्याच्या मनांत येत होते. आणि त्याहिपेक्षां अमंगळ विचारांची गर्दी अफझूलखानाच्या मनांत झाली होती.

अफझूलखान शिवाजीकडे टकमक पाहात होता. शिवबांच्या अंगांत चुणीदार अंगरखा व पायीं तंग सुरवार होती. गळ्यांतल्या मोत्यांचा कंठा लक्ष्यवेधी होता. छातीवर काळीभोर दाढी रुळत होती. असा सुंदर चेहरा, असे पाणीदार तीक्ष्ण व भेदक डोळे, गरुडासारखें बांकदार व जरासें खालीं आलेलें नाक! खानानें सौंदर्य पाहिलें आणि हेंहि जाणलें कीं इथें निश्चय आहे, करारीपणा आहे. जागरूकता आहे. बोलतां बोलतां मंदस्मित करण्याची त्यांची संवय खानाला मोहक वाटली. खानानें भेटीला बोलावल्यावर मध्यम उंचीचे, रेखीव बांध्याचे चपळ शिवबा प्रथम दबकतच खानाजवळ आले.

प्रेमालिंगन देतांना खानानें शिवाजीस आपल्या डाव्या बगलेंत आंवळून टाकलें. शिवाजी सावध होते. त्यांनीं खानाच्या पोटांत वाघनखें खुपसलीं. त्याबरोबर खानानें "दगा रे दगा" म्हणून शिवाजीच्या डोक्यावर वार केला. परंतु डोक्यावरील शिरस्त्राणानें शिवाजीस संरक्षण दिलें. शिवाजीनें आपली सुटका करून घेतली व तरवारीनें खानास खांद्यावरून पोटापर्यंत चिरत नेलें. सय्यद बंडा अफझूलखानाच्या साह्यार्थ धांवला, तेव्हां शिवबाच्या जिऊ महाल्यानें त्यालाहि अफझूलखानांच्या मागोमाग यमसदनास पाठविलें. नंतर शिवाजीच्या फौजेनें खानाच्या फौजेवर हल्ला करून तिचा पाडाव केला. "हर हर महादेव!" ह्या गर्जनेनें आकाश भरून गेलें.

मराठ्यांचा राजा विजयी झाला! रामदासांना धर्मकार्यांत यश आलें. ती आनंदाची बातमी समर्थांच्या कानीं गेली. समर्थ कृतार्थ झाले. शिवबा भेटीला आल्यावर त्यांच्याकडे वात्सल्यानें पहात ते म्हणाले,

"विजयी होऊन आलांत राजे! यावं. बसावं!!"

"स्वामीजी, आपल्याच आशीर्वादाचं हें फळ!"

"राजे, आपल्या शौर्याला ही शालीनतेची झालर फारच शोभून दिसते."

"उगाच कां स्तुति करतां, स्वामीजी?"

" सोडून द्या राजे आमचं पटत नसेल तर. आधीं त्या प्राणसंकटांतून आपण सुटलांत कसें तें तरी ऐकू द्या. "

" त्या धिप्पाड खानानें आम्हाला बगलेंत दाबलें. आम्ही सावध होतोंच. त्यावेळीं अंगीं असं बळ आलं म्हणतां ! स्वामींच्या आशीर्वादानेंच त्या काळमिठींतून सुटलों."

" आमच्या आशीर्वादानें कसले ? श्रीरामाच्या, भवानीमातेच्या — "

" भवानीचें स्मरण करतांच अशी शक्ति अंगीं संचारली कीं त्यावेळेस तसें एकच काय हजारों खान आम्ही लोळविले असते. निमित्त मात्र आम्ही उभे राहिलों. पण आशीर्वाद तुमचा. शक्ति भवानीमातेची, आणि इच्छा श्रीरामचंद्राची ! नाहींतर काय करूं शकणार होतों आम्ही ? काय सांगावं नि किती सांगावं स्वामींना......"

" सारं समजलं आम्हांला. राजे, हें खरोखरच ईश्वराचें देणें आहे तुम्हांला. "

" ईश्वराचें देणें नि आपला आशीर्वाद ! "

" अशीं अनेक कामें व्हावयाचीं आहेत आपल्या हातून. "

" ह्या आनंदाच्या प्रसंगीं कांहीं तरी मागावं स्वामींनीं. "

" मला कांहीं नको. माझ्या मारुतीला कांहींतरी द्या म्हणजे झालं. "

समर्थांनीं स्थापन केलेल्या अकरा मारुतींना शिवबांनीं अकरा बिघे जमीन नैवेद्यासाठीं दिली.

## * अहंकाराचा वारा न लागो राजसा

शिवाजीला जिंकण्यासाठीं अफझूलखान निघाला होता, तसाच सर्व पंडितांना जिंकण्यासाठीं एक प्रकांड पंडितहि निघाला होता. दौरा करीत करीत तो महाराष्ट्रांत आला. सदाशिवशास्त्री हें त्यांचें नांव. दिवसा मशाली पेटवून व यज्ञोपवीतास सुरी बांधून हे शास्त्रीबुवा सभेस जात. त्यांची प्रतिज्ञा अशी कीं सभेस गेल्यावर जयपत्र तरी घेऊन परत येईन किंवा अपयश आलेंच तर स्वहस्तें मशाल विझवून सुरीनें जीभ कापून टाकीन.

छत्रपतींचें नांव ऐकून त्यांच्या दरबारांतील पंडितांकडून जयपत्र घेण्याच्या इच्छेनें सदाशिवशास्त्र्यांनीं राजगडावर चाल केली. भेटींत गागाभट म्हणाले,

" शिवबांचे खरे गुरु स्वामी श्रीसमर्थच ! आपण त्यांच्याकडून जयपत्र घेतलेलें बरें. "

" ठीक आहे. त्यांच्याकडून घेतों. "

उपरणें झटकावित सदाशिवशास्त्री रामदासांच्या शोधार्थ निघाले.

भैरोबाचे वाडीजवळ रस्त्याच्या एका कडेला हत्तीसारख्या एका प्रचंड शिळेवर कांखेंतल्या कुबडीवर रेलून समर्थ जपमाळ ओढीत बसले होते. कुणीतरी ब्राह्मण येत आहे असें पाहून कल्याणानें त्यांना विनयानें नमस्कार केला व सदाशिवशास्त्र्यांना घेऊन कल्याण श्रीसमर्थांकडे आला.

समर्थांनीं उठून सदाशिवशास्त्र्यांना नमस्कार केला. शास्त्रीबुवा मात्र आपल्याच ज्ञानघमेंडींत होते. उद्धटपणानें समर्थांना ते म्हणाले,

" आपली आमची बरोबरी झाली कीं मगच आम्ही आपल्याला उलट नमस्कार करूं. "

" बरोबरी न झाली तर – ? "

" तर आशीर्वाद देऊं. "

" आपण साक्षात् भूदेव ! आपण आम्हांला आशीर्वादच देणें योग्य " समर्थ हंसत हंसत म्हणाले.

त्यांच्या ठिकाणीं असलेल्या विनयाची दखल सुद्धां न घेतां शास्त्री म्हणाले,

" तें परीक्षा झाल्यावरच ठरवूं. "

" कसली परीक्षा ? "

" आम्हांला आपली परीक्षा घ्यावयाची आहे. प्रश्न विचारावयाचे आहेत. वादविवाद करावयाचे आहेत. "

" आम्हांला वितंडवाद करायचा नाहीं. "

" तर मग आम्हांला सरळ जयपत्र लिहून द्या. "

" जयपत्र कशासाठीं ? कसलें ? "

" वादविवादांत तुम्ही हरलांत म्हणून– "

" समजा, आम्ही जिंकलों तर—? "

" तर ही मशाल विझवून टाकून ह्या सुरीनें आमच्या हातानें आमची जीभ आम्ही कापून टाकूं. "

" पण हें सारें कशाकरितां ? "

" तुम्हांला जिंकण्याकरतां —"

" समजा, आम्हांला जिंकलंत तरी स्वतःच्या अहंकाराला कसें जिंकाल ? त्याला जिंकणें महाकठिण ! खरं त्याला जिंकायला हवें, आम्ही कोण ? "

" आपण राजगुरु आहांत !"

" म्हणतात लोक असं ! पण आम्ही कांहीं शास्त्री-पंडित-पुराणिक नाहीं. आम्ही केवळ वनचर–त्या रामाचे दास ! आमच्याशीं वादविवाद न घालणें बरें. "

" आपला उपदेश ऐकायला नाहीं आलों आम्ही. एक वाद तरी घाला किंवा आपण हरलांत हें कबूल करून आम्हांला जयपत्र तरी लिहून द्या. तिसरी गोष्ट आम्ही ऐकणार नाहीं. "

त्यांनीं अगदीं हट्टच धरला म्हणून समर्थांनीं एका सामान्य मोळीविक्या-कडून त्याची जिरविली. त्याचा पराभव केला. त्याला निरुत्तर केलें, साध्या एका मोळीविक्याकडून !

सदाशिवशास्त्री अपमानित होऊन आपली जीभ कापूं लागले, तेव्हां त्यांना समर्थ म्हणाले,

" शास्त्रीबुवा, विचारी नि विद्वान आहांत. पण अहंकाराच्या शापांतून आपली सुटका झाली नाहीं म्हणून ही फजितीची वेळ आली. "

" खरं आहे स्वामीजी. आपण म्हणतां तेंच खरं आहे. "

" आतां असं सांगा कीं ही जीभ कोणाची ? व ती कापणारे आपण कोण ? ही मशाल लावली कुणी ? नि विझवणारे तुम्ही कोण ? श्री रघुपतीच्या दरबारांत अनेक विद्वान आहेत. मीच प्रकांडपंडित हा दुरभिमान कशासाठीं ? "

श्रीसमर्थांचे सवाल ऐकून शास्त्रीबुवा अवाक् झाले. सर्वभावें समर्थांना शरण आले. तिकडे शिवबा विजयी झाले आणि इकडे त्यांचे गुरु राम-दासहि विजयी ठरले. प्रभु रामचंद्राच्या कृपेनें महाराष्ट्राच्या राजकारणाला व धर्मकारणाला तेजी होती.

सदाशिवशास्त्र्यांनीं समर्थांकडून अनुग्रह घेतला.

पण पूर्वसंस्कार थोडेच जातात ? समर्थांचा अनुग्रह घेऊनहि शास्त्रीबुवां-जवळ थोडा अहंकार राहिलाच. रामार्चन चंद्रिकेच्या आधारानें न्यासध्यान-पूर्वक जपपद्धतीचें पुस्तक सिद्ध करून शास्त्रीबुवांनीं नमस्कारपूर्वक समर्थांपुढें आणून ठेवलें.

नमस्कार वरकरणी होता. मनांत मात्र पांडित्य मिरविण्याचीच हौस होती. दुसऱ्यांचें मनोगत तेव्हांच जाणणाऱ्या समर्थांनीं हें ताडलें. त्यांनीं तें पुस्तक पाहिलें सुद्धां नाहीं. तें तसेंच त्यांच्या हातीं दिलें. सदाशिवशास्त्र्यांची वाचा गेली. आक्कामार्फत त्यांनीं समर्थांकडे विचारणा केली, "आमचा अपराध तरी कोणता ?"

समर्थ रागावून म्हणाले,

"श्रीच्या आज्ञेनुसार त्यांना मंत्र मिळाला. पण त्यांचा त्यावर विश्वास नाहीं. ग्रंथाधारें नवीन पद्धति निर्माण करून आपलें पांडित्य मिरवायला गेले. ह्या दोषामुळें श्रींनेंच त्यांना शासन केलें. आम्ही काय करणार !"

अक्का काकुळतीला आल्या तेव्हां दया येऊन समर्थ म्हणाले,

"त्यांना सांगा – परमार्थांत गुरुआज्ञा प्रमाण मानून तसें वागाल तरच वाचा परत येईल नि आपलें कल्याण होईल."

आयुष्यभर पुस्तकें वाचल्यामुळें बुद्धि पुष्ट झाली. पण त्यामुळें आपली आध्यात्मिक उन्नति मात्र कांहींच झाली नाहीं असें शास्त्रीबुवांना वाटूं लागलें. मनाची तळमळ वाढली नि हृदय व्याकुळ झालें. सर्वभावें ते समर्थांना शरण आले. अहंकार पार जळून गेला. कायावाचामनें ते पवित्र झाले. हेच शास्त्रीबुवा पुढें वासुदेव गोसावी म्हणून प्रसिद्धीस आले

*

उडपी येथील मध्वमठांतील एक शिष्य पीठावरील आचार्यांचें पत्र घेऊन समर्थांकडे आला. मस्तकीं धरून समर्थांनीं तें पत्र वाचलें व त्यास सांगितलें,

"नैवेद्याची सिद्धता आहे. स्नानसंध्या उरकून चलावें."

"आम्ही तप्तमुद्रांकित वैष्णव. आम्हाला दुसऱ्याच्या हातचा स्वयंपाक चालत नाहीं."

"मग आपण आमच्याकडे भोजन घेणार नाहीं ?"

"आमचा स्वयंपाक आम्ही हातानें करून भोजन करूं."

"ठीक आहे. जशी आपली इच्छा."

त्या शिष्यानें स्वयंपाक स्वतः तयार केला. वाढून घेऊन तो पाटावर बसला. समर्थांनीं पुढें होऊन त्याला मोठ्या प्रेमानें तूप वाढलें. तो पाहुणा समर्थांच्या अंगावर वसकन् ओरडला,

" हें काय केलेंत ? विटाळ झाला आम्हांला. आतां कसें जेवावें ? "

" विटाळ कसा झाला ? "

" वैष्णवांच्या खेरीज इतरांच्या हातचें आम्हांला चालत नाहीं. "

" मीहि वैष्णवच आहे. "

" पण आमच्यासारखें तप्तमुद्रांकित नाहीं. "

तें ऐकून समर्थांनीं रडण्यास आरंभ केला. मठांतील सारे शिष्य भोंवतीं गोळा झाले.

" काय झालें स्वामी ? " कल्याणानें विचारलें.

" केवढा हो मी पापी ! माझ्यामुळें ह्या ब्राह्मणाचें जेवण अंतरलें. "

" आपण पुनः स्वयंपाक करूं या. "

" त्यांना त्रास ! "

" त्याला काय इलाज ? "

" पण...? "

" पण काय ... ? "

" मला वाईट वाटतें, कीं खरंच का मी इतका अपवित्र आहे ? कुत्र्याच्या स्पर्शानें विटाळलेलें अन्न विष्णुतीर्थानें शुद्ध होतें आणि माझ्या स्पर्शानें अशुद्ध झालेलें अन्न मात्र शुद्ध होत नाहीं अं ! "

समर्थांची ही भाषा कुणालाच कळली नाहीं. मध्वमठांतून आलेल्या त्या उडपी शिष्याचा मात्र चेहरा पडला. त्याला वाटलें, ' हें ' समर्थांना कसें कळलें ? समर्थांच्या शिष्याकडून ' हा ' प्रकार त्यांना कळला होता. त्यांच्या शिष्यानें भ्रमंतींत पाहिलेला एक प्रकार समर्थांना रंगवून सांगितला होता.

—वाटेंत स्वयंपाक करून नदीवर पाणी आणण्यासाठीं हा उडपी शिष्य नदीवर गेला होता. इकडे कुत्र्यानें त्याच्या अन्नाला स्पर्श केला. हा जवळ आला तसें कुत्रें पळून गेलें. आतां काय करायचें ? अन्न टाकून देऊन दुसरा स्वयंपाक करावा तर भूक कडाडून लागली होती. थोडासा विचार करून त्यानें विष्णुतीर्थानें अन्न शुद्ध केलें नि भोजन केलें.

तोच हा उडपी शिष्य ! त्याच्या खाणाखुणांवरून समर्थांनीं ओळखलें.

तो त्यांनीं विटाळविलेलें अन्न खात नव्हता म्हणून समर्थांना त्याचा दंभस्फोट करणें भाग पडलें.

शरण येऊन त्या उडपी शिष्यानें अन्न ग्रहण केलें.

*

## खंडोबाचा येळकोट

शके १५८५.

चिंचवडच्या देवाची भेट घेऊन समर्थ जेजुरीच्या शिवारांतून चांफळला चालले होते. तिकडून आपल्या मावळी सोबत्यांबरोबर शिवबा येतांना दिसले म्हणून समर्थ थांबले. शिवबाहि घोड्यावरून खालीं उतरून म्हणाले,

" स्वामीजींचे खंडेरायाच्या दर्शनाला जाणें झालें होतें कीं काय ? "

" नाहीं. चिंचवडला गेलों होतों आम्ही. आतां तिकडून चांफळाकडे. "

" खंडोबाचें दर्शन घेतल्यावांचून तसेंच पुढें जाणार ? "

" जरा गडबड आहे मागें. "

" आमच्याजवळ एक घोडा मोकळा आहे. स्वामींनीं फार तर त्यावर बसून घाईनें चलावं. पण दर्शन घेतल्याशिवाय ... "

" पण आपण कुठें निघाला होतात ? "

" आम्ही पुरंदरास गेलों होतों. "

" आतां कुठें ? "

" पुण्यास — "

शिवरायांचा आग्रह पाहून त्यांच्याबरोबर समर्थ गडावर गेले. शिवरायांनीं त्यांना गड चढून महाद्वारापर्यंत सोबत केली. समर्थ मंदिरांत गेले. 'घोडे बांधून येतों ' म्हणून शिवबा बाहेर गेले. डोळे मिटून समर्थांनीं ध्यान केलें व खंडोबाची आरती केली :

जय देव जय देव जय शिव मल्हारी<br>
वारी दुर्जन वारी, तारी सज्जन तारी, निंदक अपहारीं<br>
रघुवीरस्मरणीं शंकर हृदयीं निवाला<br>
तो हा मल्लांतक अवतार झाला<br>
यालागीं आवडी भावें वर्णीला<br>
रामी रामदासा जिवलग भेटला ॥ जय देव जय देव ॥

खंडोबाचा येळकोट! सदाशिवाचा येळकोट!! मल्हारी म्हाळसाकांताचा येळकोट !!!

खंडोबाचा जयजयकार करून समर्थांनीं खोबरें नि भंडारा उधळून शिवबाला प्रसाद देण्यासाठीं मागें वळून पाहिलें तर शिवबा होता कुठें? कोणी नव्हतें तेथें! समर्थ समजले. पंढरीला यावें म्हणून जशी विठ्ठलानें लीला केली तशीच बतावणी इथें खंडोबानें केली. आपली प्रिय व्यक्ति म्हणून त्यानें शिवबाचें सोंग घेतलें. परमेश्वराचें आपल्यावरील प्रेम पाहून समर्थ गहिंवरून गेलें. ती रात्र त्यांनीं तेथेंच काढली. त्या रात्रीं खंडोबापुढें गोंधळ घातला. दुसऱ्या दिवशीं निघतांना खंडोबापुढें हात जोडून ते म्हणाले,

देव शिवाचा अवतार। जाऊनि बसला गडावर
एक निळ्या घोड्यावर। एक ढवळ्या नंदीवर
एका विभूतीचें लेणें। एका भंडार भूषणें
रामदासी एक जाला। भेदभाव तो उडाला

समर्थ चांफळला आले तर त्यांच्या कानांवर एक शुभ बातमी आली. चार वर्षें आपला राहता वाडा दाबून बसल्याबद्दल खानाचा सूड घेऊन शिवबानें शाहिस्तेखानावर रात्रीं हल्ला केला. त्याचीं चार बोटें कापलीं. ज्या रात्रीं जेजुरीच्या गडावर खंडोबापुढें समर्थांनीं गोंधळ मांडला त्याच रात्रीं शिवबानें खानावर हल्ला करून त्याच्या वाड्यांत गोंधळ उडवून दिला.

उदो उदो जगदंबे। उदो उदो जगदंबे!

* **पिंजऱ्यांतून पक्षी उडाला**

शिवरायांच्या पराक्रमाची वाढती चढती कमान चालू असतांनाच औरंगजेब दिल्लीच्या तख्तावर आला. त्यानें दक्षिणेंत नजर फेंकली तर शिवाजीचा पराक्रम आपल्या दक्षिणेंतील सत्तेला धक्का देत आहे असें वाटलें. कारण अफझुलखानासारख्या धिप्पाड माणसाला त्यानें मातींत लोळविलें. आपला मामा – शाहिस्तेखान त्याच्या वाड्यांत शिरून त्याचीं बोटें कापलीं. तेव्हां औरंगजेबानें मोठी फौज देऊन जयसिंगास दक्षिणेकडे पाठविलें. हें संकट अफझुलखानाच्या स्वारीपेक्षांहि मोठें होतें. जयसिंगानें पुरंदर घेतला, रुद्रमाळ घेतला, तेव्हां शिवाजीनें सामोपचारानें आपलें काम साधून घेण्याचें ठरविलें. शिवबापुढें दोन मार्ग होते. एक बादशहास शरण येऊन आपल्या जीविताचें व वित्ताचें रक्षण करणें किंवा तळकोंकणचा

विजापुरी प्रदेश आदिलशहास परत देऊन त्यास जाऊन मिळणें. शिवाजीनें पहिलाच मार्ग पत्करला.

सिंहाच्या गुहेंत आपण होऊन शिरणें योग्य नव्हे असें अनेकांचें मत पडलें. या संबंधानें शिवाजीनें आपल्या मंडळींत खूप चर्चा केली. भवानीदेवीचा कौल घेतला. देवीनें 'जावें' असा कौल दिला. 'जावें. त्यांत यश प्राप्त होईल,' असें ज्योतिषांनींहि मत प्रतिपादन केलें. 'आम्ही तुमचे जीवास कुठलाहि अपाय होऊं देणार नाहीं,' अशी जयसिंगानें शपथ घेतल्यावर शिवाजीराजे आग्र्यास जाण्यास तयार झाले.

निघण्यापूर्वी आपल्या राज्याची व्यवस्था शिवाजीनें ठरवून दिली. प्रधान मोरोपंत, मुजुमदार निळो सोनदेव व सेनापति प्रतापराव गुजर या तिघांनीं सर्वत्र दृष्टि ठेवून जिजाबाईच्या आज्ञेनें वर्तावें असें ठरवून दिलें. किल्लेदारांनीं रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून सावध राहावें असें सांगून आपले किल्ले व मुलूख जाण्यापूर्वी त्यांनीं स्वतः एकदां डोळ्यांखालून घातले. आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीला जाण्यापूर्वी त्यांनीं प्रथम श्रीसमर्थांची भेट घेतली. त्यावेळीं समर्थांनीं साश्रुनयनांनीं शिवबांस निरोप दिला. जवळ घेत त्यांच्या पाठीवर हात फिरवीत ते म्हणाले,

"शिवबा, राज्याची जबाबदारी ही अशी असते.

न जावेंचि तेथें लागेल जावें । न खावेंचि जें तेंचि लागेल खावें
वदावेंचि ना तेंचि लागे वदावें । स्वभावेचि निर्माण केलेचि देवे
प्रसंगे घडे तेचि मानून घ्यावें । अहंतागुणें दुःख शोका न यावें
पुढें काय होईल तें तें पहावें । विविकेंचि ज्ञानेंचि सुखें राहावें
देहभोग होणार कांहीं सुटेना । जनाच्या मना सांगताहि तुटेना
म्हणे दास उदास कांहीं न व्हावें । बरें वोखटें सर्व साहोनी न्यावें ॥

सोमवार, फाल्गुन शुद्ध ९ शके १५८८.

समर्थांचा आशीर्वाद, भवानीमातेचा कौल, रायगडाचा निरोप, पुत्र संभाजी, कित्येक निवडक मंडळी नि चार हजार घोडेस्वारांचा लवाजमा बरोबर घेऊन शिवाजीराजे उत्तरेकडे निघाले. बरोबर तानाजी मालुसरे, येसाजी कंक, सर्जेराव जेधे, हिरोजी फर्जंद, बाळाजी व निराजी आवजी, रघुनाथ बल्लाळ कोरडे, त्रिंबक सोनदेव डबीर इत्यादि जीवाला जीव देणारी मंडळी होती.

दिवाण-इ-आमच्या शृंगारलेल्या जागेंत मोठा दरबार भरला होता. शिवाजीराजे दरबारांत आले. बरोबर राजपुत्र संभाजी व दहा अंमलदार होते. पण शिवबांना दरबारांत त्यांच्या योग्यतेला अनुरूप असा मान दिला गेला नाहीं. त्यांचा अपमान झाला. भरदरबारांत आपला अपमान झालेला पाहून मराठ्यांच्या राजाच्या अंगाचा तिळपापड झाला. सह्याद्रींत ज्वालामुखी पेटला. बादशहानें वचनभंग करून आपणांस फसविलें अशी त्यांनीं उघड उघड हांकाटी केली. जवळच्या माणसांनीं एकाचें दोन करून बादशहाच्या कानांवर घातलें. त्यामुळें बादशहास राग येऊन त्यानें शिवाजीस कैद केलें. शिवबांचे मनोरथ व्यर्थ जाऊन ते बादशहाचे कैदी झाले. औरंगजेबाची कैद म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूची दरी! जीवास केव्हांहि धोका होता. शिवबांना ह्याची पूर्ण जाणीव होती.

पण भवानी पाठीशीं होती. समर्थांचा आशीर्वाद माथ्यावर होता. जीजाबाईनीं रोखलेली प्रेमळ नजर समोर दिसत होती. मराठे नि महाराष्ट्र राज्य महाराजांची वाट पहात होतें. महाराजहि सुटायला उतावीळ झाले होते. त्यांनीं युक्ति काढली. चक्रें फिरलीं गेलीं. शिवाजीराजे आजारी झाले नि दानधर्म म्हणून त्यांनीं आपल्या निवासस्थानांतून मिठाईच्या पेट्या पाठविण्यास सुरुवात केली. असें अनेक दिवस चाललें नि शेवटीं एक दिवस मिठाईच्या पेटाऱ्यांतून महाराष्ट्राचा गोड पेढा औरंगजेबाच्या पापी मिठींतून निसटला. पक्षी मोकळा झाला. बाकीचीं साथ देणारीं पांखरेंहि पंख फडफडावीत उडालीं. पाठीला माती लागली. औरंगजेब एकदम चीत झाला. त्याच्या पिंजऱ्यांत आलेला डोंगरी उंदीर निसटून गेला. कुणी म्हणे गुप्त झाला, तर कुणी म्हणे उडून गेला. विचार करतां करतां औरंगजेबाच्या मेंदूला मुंग्या आल्या.

हूल देण्यासाठीं दक्षिणेची वाट न धरतां राजे प्रथम मथुरेंत आले. मथुरेला गोकुळाष्टमीच्या यात्रेच्या गर्दींत मिसळून ते पुढें निसटले. पुढें दक्षिणेंत कसें यावें हा मोठा प्रश्न होता. कारण औरंगजेबानें सगळीकडे पहारे व चौक्या बसविल्या होत्या. तानाजी, नेताजी व हिरोजी बरोबर होते. पण त्यांना उत्तर हिंदुस्थानची माहिती नव्हती. भाषाहि अवगत नव्हती. मुलूख परका. भाषा परकी. मुसलमानांचे गुप्त हेर चहूंकडे पसरलेले. अशावेळीं शिवबांना समर्थांच्याच तत्प्रांतीय शिष्यांचें साह्य झालें. मथुरेंतला

त्यांचा शिष्य हरिकृष्ण, शिवाजी राजांच्या मदतीस धांवला. अयोध्येला रामकृष्ण ह्या शिष्याचें साह्य झालें, तर काशींत रामचंद्र नांवाच्या शिष्यानें त्यांना कसलीच उणीव भासूं दिली नाहीं. मथुरेंतल्या शिष्यानें संभाजीस आपल्या घरीं राहून घेतलें. समर्थशिष्यांनीं शिवाजीस एका गांवाहून दुसऱ्या गांवापर्यंत पोंचविण्याचें काम केलें.

गंगासागराकडे हरिवंश, तेलंगणांत शिवराम, बेदरांत श्रीराम व वऱ्हाडांत महारुद्र व बाळकृष्ण, ओढ्या पर्वतावर बल्लाळ, घृष्णेश्वरीला आनंद, परळी जगन्नाथास मल्लारी, गोकर्ण क्षेत्रीं भैरव, गोमांतकास गोविंद असे ठिकठिकाणीं समर्थांचे शिष्य मार्गातून येतांना शिवबास मदत करीत होते. यात्रा–मार्गानें शिवाजी महाराज चार महिन्यांनीं कोल्हापूरमार्गे सातारा प्रांतीं आले. यादव, चक्रपाणी, नारायण नि विश्वनाथ ह्या शिष्यांनीं फिरत्या जासूदाचें काम केलें. शिवाजीमहाराज कोठून कोठें गेले ह्याची माहिती श्रीसमर्थ व जिजामाता ह्यांना ते आणून देत.

*

रायगडावर सकाळच्यावेळीं ‘जयजय रघुवीर समर्थ’ ही हांक ऐकूं येतांच राजमाता जिजाबाई डोक्यावरचा पदर सारखा करीत घाईघाईनें बाहेर आल्या. त्यांना वाटलें श्रीसमर्थ रामदासस्वामी आले असावेत. पण आला होता दुसराच कुणीतरी गोसावी, तसाच समर्थांच्या वेषांत. भगवी कफनी. हातांत कुबडी नि कमंडलू. उजव्या डाव्या बाजूला त्याच्यासारखेच आणखी दोनदोन गोसावी. मुसलमान हेरांनीं ओळखलें नाहीं तरी जिजाईनें ओळखलें. त्यांचा शिवबा ! महाराज रायगडावर येऊन पोहोंचले ही बातमी स्वराज्यांत कर्णोपकर्णीं झाली. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. रायगड आनंदानें हंसत होता. मावळे राजांच्या बुद्धीनें व पराक्रमानें चकीत झाले होते. हंसतां हंसतां सारे आनंदाश्रु ढाळीत होते. शिवाजीराजे सुखरूप आले म्हणून गडावर साखर वाटण्यास सुरुवात झाली. तुळजा भवानी प्रसन्न झाली होती. स्वराज्य हंसत होतें. रायगड उल्हासानें फुलला होता.

ह्या आनंदोत्सवाची बातमी मोंगल अधिकाऱ्याकडून औरंगजेबाच्या कानीं गेली तेव्हां त्यानें कपाळावर हात मारून घेतला.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ......................... दि: .....................
क्रमांक ......................... नों दि: .....................

# किती पृथ्वीचें वजन

शके १५९२

चांफळच्या उत्तरेस डोंगरापलीकडे पाली येथें खंडोबाचें प्रसिद्ध देवस्थान आहे. तेथें यात्रा भरली होती. कलगीवाले व तुरेवाले ह्यांच्यांत अटीतटीचा सामना लागला होता. सभोंवतालीं तमासगिरांची दाटी झाली होती. भटकत भटकत समर्थ तेथें आले. गर्दी पाहून त्यांनीं विचारलें,

" कसली गर्दी हो ? "

समर्थांना पहातांच शाहिरांनीं प्रथम मानाचे मुजरे केले नि एकानें उत्तर दिलें, " अटीतटीचा सामना चालू आहे. कुणाची तरी हारजित झाल्याशिवाय... "

समर्थ म्हणाले, " आम्ही देतों तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें. "

शाहिरांनीं प्रश्न फेंकले नि समर्थांनीं भराभरा उत्तरें दिलीं. नंतर ते म्हणाले,

" आतां तुमचे सर्व फड एका बाजूला. "

" नि तुम्ही दुसऱ्या बाजूला. "

" बरोबर. आतां आमच्या प्रश्नांना तुम्हीं उत्तरें द्यायला हवींत. "

" कबूल, स्वामीजी, एकदम कबूल. "

तुणतुणें वाजूं लागलें. डफांतून आवाज निघूं लागला. ढोलकीं घुमूं लागलीं. उजव्या बाजूस कल्याण नि डाव्या बाजूस उद्धव उभे राहिले. समर्थांनीं डफगाणें म्हणण्यास सुरुवात केली.

किती पृथ्वीचें वजन। किती अंगुलें गगन।
आहे सिंधूचें जीवन। किती टांक ॥
वायुसरिसे उडती। सांग अणुरेणु किती।
लक्ष चौऱ्यांशीं उत्पत्ति। रोम किती ॥

कितो आकाशीचा वारा। किती पर्जन्याच्या धारा।
तृणभूमीचें चतुरा। किती आहे ॥
बीज वडी आणि पिंपळी। किती आहे भूमंडळी।
सर्व धान्यांची मोकळी। संख्या सांग ॥
सांग माझें डफ गाणं। नाहींतरी सोडी जाणपण।
देहबुद्धीचें लक्षण। सोडवीन ॥

असले सवालच कधीं शाहिरांनीं ऐकले नव्हते. ते बिचारे काय उत्तर देणार ? ते अवाक् झाले. मग समर्थ म्हणाले,

श्रोती व्हावें सावचित्त। आतां सांगतों गणित।
सर्व आहे अगणित। सत्य वाचा ॥

समर्थांना मुजरे करून शाहिरांनीं शरणचिठ्ठी दिली. समर्थांच्या मनाच्या श्लोकांची त्यांना ओळख होती. दासबोधहि त्यांच्या कानावरून गेला होता. पण ह्या बैराग्याच्या पोटीं असे कांहीं कूटप्रश्न लपले असतील ह्याची मात्र त्यांना अजिबात जाणीव नव्हती.

## * योगी ओळखावा योगेश्वरें

त्या दिवशीं चांफळास एकाच गोष्टीची चर्चा चालू होती. पालीहून समर्थ आले नि रात्रींत त्यांच्या पायाला एक मोठें गळूं झालें. व्याधीनें समर्थ नुसते तळमळत होते. एरवीं हूं का चूं न करणारा तो वज्रदेही पुरुष ठणका लागल्यामुळें सारखें " आईऽगऽऽ" करीत होता. एकानें विचारलें,

" वैद्य आणूं का, स्वामीजी ? "

" नको रे. तो येऊन काय करणार ? "

" औषधोपचार करील. "

" त्याचा इलाज चालणार नाहीं. "

" मग उपाय तरी सांगा. "

" सांगून काय उपयोग ? "

" असं कां म्हणतां, स्वामीजी ? "

" मग काय म्हणूं ? एकच उपाय आहे, पण ... "

" पण काय ? "

" तुमच्यानें तो होणें नाहीं. "

" झालाच पाहिजे. सांगा तरी उपाय — "

" कुणीतरी चोखलें पाहिजे. चोखणारा मरेल नि मी जगेन. आहे कुणी कबूल ? "

कोण कबूल होणार ? सारेजण गप्पच बसले. समर्थ कातावून म्हणाले,

" अरे बोला ना. गप्प कां सारे ? उपाय सांगत नव्हतों तर ' सांगा, सांगा ' म्हणून डोक्यावर घेतलेंत. "

समर्थांची पुढील बडबड ऐकायला कुणीहि उभें राहिलें नाहीं. अक्का, वेणा, उद्धवासकट लहानथोर आपआपल्या उद्योगाला लागले. असलें लोकविलक्षण औषध करायला वेळ कुणाला होता ?

मातोश्रींना भेटायला गेलेला कल्याण शिरगांवहून दोनप्रहरीं परत आला. मंडळींची खिन्नता पाहून त्यानें विचारलें,

" आज मंडळी अशी खिन्न कां ? "

" स्वामी फार आजारी आहेत. "

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या खोलींत जाऊन कल्याणानें साष्टांग नमस्कार घातला.

" स्वामी, आपणांस काय होत आहे ? "

" सकाळपासून प्रत्येकाला तेंच सांगतो आहे. काय उपयोग झाला ? "

" मला तरी सांगा — "

" तूं तरी जास्त काय करणार आहेस. ऐकशील नि गप्प बसशील. "

" नाहीं, असें होणार नाहीं स्वामीजी. "

" पाहिलेंस हें गळूं ? " स्वामींनीं त्याच्यापुढें पाय ठेवला.

" थांबा फोडून टाकतों, म्हणजे हलकें वाटेल जरा. "

" छान. म्हणजे गळवाचा निचरा होईल नि माझेहि प्राण जातील. "

" असं कसं म्हणतां स्वामीजी ? आपल्याला हलकें वाटेल —"

" अरे, कुणी हळूंहळूं चोखलें तें तरच आराम वाटेल मला — "

" मग त्यांत काय अवघड स्वामीजी ? "

कल्याणानें पुढें होऊन गळूं चोखायला सुरुवात केली. पहाणाऱ्यांना किळस उत्पन्न झाली. पण कल्याणाच्या चेहऱ्यावर मात्र अमृत प्याल्याचा आनंद !

कारण समर्थांनीं परीक्षा पाहण्याकरतां पोटरीला एक आंबा बांधून ठेवला होता. समर्थ का कुणाला असें गळूं चोखायला सांगतील ?

योगी ओळखावा योगेश्वरें हेंच खरें !

## * हिंवताप घोंगडींत कोंडला

समर्थ चांफळ येथें असतांना शिवबा त्यांना भेटायला आले. त्या दिवशीं समर्थांना थंडीतापानें घेरलें होतें. पण शिवाजीशीं नीट बोलतां यावें म्हणून आपल्या अंगावरची घोंगडी त्यांनीं बाजूला ठेवली. महाराजांनीं पाहिलें तर थंडी आलेल्या माणसासारखी ती घोंगडीच थरथर कांपत होती. शिवबांनीं विचारलें,

" छाटी कां कांपत आहे, स्वामीजी ? "

" आम्हांला थंडीताप आला होता, शिवबा. पण आपल्याशीं बोलतां यावें म्हणून हिंवताप या घोंगडींत कोंडला आहे. "

श्वास रोखून शिवबा ऐकत होते. शेवटीं त्यांनीं विचारलें,

" स्वामी, आपलें एवढें सामर्थ्य असतां आपण हे शरीर-क्लेश कां भोगतां ? "

" प्रारब्ध भोगूनच संपवायचं असतं, शिवबा. " समर्थांनीं हंसत हंसत उत्तर दिलें.

## * प्रत्ययावाचून बोलणें नाहीं

श्रीस्वामी रामदास समर्थ प्रत्ययावाचून कधीं बोलले नाहींत. ते सहज बोलले तरी तें शास्त्राला सोडून नसे. त्यांचें बोलणें आकर्षक असे. एकदां वाक्प्रचार सुरू झाला म्हणजे श्रोते देहभान विसरून जात. श्रोत्यांना शंका विचारण्यास मोकळीक असे. श्रोतेहि मोकळ्या मनानें शंका विचारीत नि समर्थहि प्रेमानें त्यांचें समाधान करीत.

समर्थांचें निरुपण ऐकून शहापूरच्या एका तरुण गृहस्थास वैराग्य धारण करण्याची इच्छा झाली. समर्थांजवळ येऊन तो म्हणाला,

" स्वामीजी, वैराग्यानें राहावेसें वाटतें. पण — "

" पण काय ? "

" हा संसार मागें लागलाय्. तो कांहीं केल्या सुटत नाहीं बघा. "

" असं ? "

" तर काय हो ! कांहीं उपाय असल्यास सांगा. "

" उपाय काय सांगणार ? संसार सोडणें किंवा धरणें हें सर्वस्वीं आपल्याच हातीं असतें. "

" नाहीं स्वामीजी, मला आपलें म्हणणें पटत नाहीं. मला संसार सोडावासा वाटतो. पण तो सुटतच नाहीं पहा. "

" खोटं. साफ खोटं. "

" तर मग आपण मला आपल्याजवळ ठेवा नि ह्या संसारांतून सोडवा. "

" आमच्याजवळ राहिलांत तर आमच्या आज्ञा पालन कराव्या लागतील. "

" करीन मी. "

समर्थ त्याला घेऊन निघाले. वाटेंत एक विहीर होती. समर्थ थांबून म्हणाले,

" श्यामबा, इकडे या. झाडावर चढून विहिरीवरच्या त्या आडव्या फांदीवर जा. "

समर्थांची पहिलीच आज्ञा ही ! श्यामबाला त्या आज्ञेचें उल्लंघन करतां येणें शक्यच नव्हतें. कसाबसा तो त्या फांदीवर गेला. खालीं असलेलें अथांग पाणी पाहून त्याचे डोळे गरगरायला लागले. लागलीच समर्थांची दुसरी आज्ञा झाली.

" फांदीला दोन्ही हात धरून पाय खालीं सोडा. "

नाईलाज होऊन श्यामबानें तीहि आज्ञा पाळली. बराच वेळ झाल्यावर हाताला रग लागली. फांदी सोडावी तर खालीं खोल विहीर. तो मोठ्यानें ओरडूं लागला,

" सोडवा मला, स्वामीजी, सोडवा मला. "

समर्थ हंसून म्हणाले,

" अहो, धरलाय् कुणी तुम्हांला ? फांदीला तुम्हीच घट्ट धरून ठेवलें आहे. "

" स्वामीजी, ही चेष्टेची वेळ नव्हे. "

" छे, छे. आम्ही तरी चेष्टा कशी करूं ? अगदीं खरें तेंच सांगतों आहोंत. फांदी सोडून द्या नि पहा तुम्ही मोकळे होता कीं नाहीं तें. "

शेवटीं कळ असह्य होऊन श्यामबानें फांदी सोडली नि तो विहिरींत पडला व पाण्यांत गटांगळ्या खाऊं लागला. समर्थांनीं लागलीच उडी मारून त्याला वर काढलें. नंतर समर्थ त्यास म्हणाले,

" ही फांदी म्हणजे तुमचा संसार समजा. त्या फांदीसारखें तुम्हीच त्याला धरलें आहे. फांदी सोडलीत तसा तोहि सोडून द्या नि मोकळे व्हा. आतां वेळ कां घालवितां उगाच ?

घटका गेली, पळें गेलीं, तास वाजे झणाणा । आयुष्याचा नाश होतो राम कां रे म्हणाना ॥ जा, बाबा, जा. तुमच्यानें संसार सुटणार नाहीं. तें येऱ्या गबाळाचें काम नव्हे. संसारांत राहूनच रामजप करीत जा म्हणजे झालं."

## * सर्वांभूतीं भगवंत

चांफळला रामाचा उत्सव चालू होता. धान्याचीं कोठारें भरलीं होतीं. कांहीं चोरट्यांनीं पाळत ठेवून एका रात्रीं डाका घातला. आरडाओरडा झाल्यावर शिष्य धांवले. त्यांना अडवून समर्थांनीं विचारलें,

" कुठें निघालांत ? "

" मठावर दरोडा पडलाय् "

" तुम्ही काय करणार आहांत ? "

" चोरट्यांचा समाचार घेणार आहोंत. "

" कां ? "

" कां म्हणजे ? "

" ते कांहीं तुमचें गांठोडें नेत नाहींत — "

" मठांतील चिजवस्तु आपलीच नाहीं का ? "

" नाहीं. रघुनाथाचें भांडार आहे तें. "

" मग त्याच्याच चीजवस्तूंचें संरक्षण करण्यास आम्ही जात आहोंत. "

" तो समर्थ आहे. "

" तेंहि खरेंच. "

" तुम्ही तेवढे देवाचे. नि मग चोर कोणाचे ? "

" चोरांनीं चोरी केल्यावर त्यांना अडवूं नये ? "

" नका अडवूं. रघुपतीची शपथ आहे तुम्हाला. "

कल्याण पुढें होऊन धिटाईनें म्हणाला,

" स्वामी आज्ञा प्रमाण आहे. पण शपथ घालून मात्र अन्याय केलात. "

" तो कसा रे, कल्याणा ? "

" शपथ घालून आमच्यावर अविश्वास दाखविलात. नसती शपथ घातलीत तर आम्ही ऐकलें का नसतें ? आपली आज्ञा आम्ही कधीं मोडली आहे का ?"

प्रसन्नपणें समर्थ हंसले तेव्हां कल्याण पुढें म्हणाला,

" स्वामी, भांडार देवाचें खरें ! पण भिक्षा समाजाकडून गोळा केलेली. तिचा उपयोग उत्सवाप्रित्यर्थ झाला असता तर बरें झालें असतें. "

" चोरांनीं नेलें तें पोट भरण्यासाठींच ना ? तुम्ही तरी दुसरें काय केलें असतेंत ? "

पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें ॥ "

" ह्यावर उत्तर आहे, स्वामीजी. पण मर्यादा उल्लंघली जाईल ही भीति वाटते. "

" बोल कल्याणा, अगदीं मोकळेपणी बोल. "

" सर्वांभूतीं परमेश्वर आहे हें तत्त्व खरें असलें तरी पापी व पुण्यवंत ह्यांतला भेद मानलाच पाहिजे. "

" तुझें म्हणणें बरोबर. पण भेददृष्टीनें पहावें असें तरी कुठें म्हटलें आहे ?"

" विधिनिषेधाच्या मर्यादा तरी कशा सांभाळाव्यात मग ? "

" तूं जिंकलास कल्याणा. ह्याला उत्तर नाहीं. आणि म्हणूनच तुझ्या मर्जींत येईल तसें कर. पण चोरांना छळूं मात्र नकोस हो. "

धिप्पाड कल्याणानें त्या चोरट्यांचा पाठलाग करून त्यांना गांठलें. त्याचे ते प्रचंड भूजदंड पाहून चोरट्यांची पांचावर धारण बसली. चांफळच्या उत्सवांत मोकाट सुटलेला हत्तीसुद्धां कल्याणानें एकदां अडविला होता, तेथें चोरट्यांची काय डाळ शिजणार ? ते शरण आले. समर्थांनीं सांगितलें होतें म्हणून त्यांनीं चोरांना मारलें नाहीं. फक्त त्यांच्याजवळून मठाची चीजवस्त घेऊन तो परत फिरला. रात्रीच्यावेळीं रामाला पाळण्यांत घालून गोड गळ्यानें समर्थ पाळणा म्हणत होते.

जोजो जोजो रे श्रीरामा । निजगुणसुखविश्रामा
रामा जोजो रे ॥ धृ० ॥

गुरुमाऊलीच्या मुखांतून निघणारे तें अंगाईगीत कल्याण कितीतरी वेळ ऐकत बसला. त्या अमृत रसवंतीनें त्याचे सारे श्रम नाहींसे झाले.

## * समर्थांची दिवाळी

एका दिवाळीला चांफळ येथें अक्कानीं समर्थांना सकाळींच कुंकुमतिलक लावून ओवाळलें. कण्हेरीला आतुबाईनें त्यांना दीपावलीचें मंगल स्नान घातलें. मिरजेस वेणाबाईकडे फराळ केला नि भोजनासाठीं सिऊर येथें बहिणाबाईकडे पोंहोचले.

जेवणाची सारी सिद्धता होतीच. समर्थ हातपाय धुवून व सोंवळें नेसून पाटावर बसले. श्रीस नैवेद्य दाखवून समर्थांनीं भोजनास आरंभ केला. दोडक्याची भाजी समर्थांना फार आवडे म्हणून ती संपली कीं बहिणाबाई त्यांना ती पुनः पुनः वाढत.

जेवण झाल्यावर आंचवून समर्थ आसनावर बसले. त्यांची आज्ञा घेऊन बहिणाबाई जेवायला बसल्या. समर्थांना आवडलेल्या भाजीचा घांस त्यांनीं प्रथम घेतला, तों काय ? ती भाजी अगदीं कडू जहर होती. त्या म्हणाल्या,

" हें काय ? कडू भाजी का खाल्ली स्वामींनीं ? "

" ती रामाला अर्पण केली होती ना ? मग तिला कडू कसं म्हणायचं ? "

" कडू असल्यावर कडू नको म्हणायला ? "

" वा ! रामाला नैवेद्य दाखविल्यावर त्यानें सुद्धां तक्रार केली नाहीं. मग आम्ही कशी करायची ? आपणहि ती गोडच मानली पाहिजे. "

" तुमच्यापुढें बोलणं कठीण बाई ! "

जीवन करी जीवित्वा अन्न हें पूर्ण ब्रह्म ।
उदर भरण नोहे जाणीजे यज्ञ कर्म ॥

समर्थांनीं हात जोडल्यावर बहिणाबाई म्हणाल्या, " जयजय रघुवीर समर्थ ! "

आयाबहिणींनीं केलेल्या स्वयंपाकाला कधीं नांवें ठेवायचीं नाहींत असा समर्थांचा कटाक्ष असे. मीठ विसरलेले पदार्थहि अशा वेळीं ते चवीनें खात. स्वयंपाकाबद्दल त्यांनीं स्वतः कधीं तक्रार केली नाहीं नि आपल्या शिष्यवर्गालाहि करूं दिली नाहीं. हौशीनें केलेल्या आपल्या स्वयंपाकाला कुणीं नांवें ठेवलीं तर त्या माऊलीला काय वाटेल, अशी अपार जिव्हाळ्याची जाणीव त्यामागें होती. स्त्रियांसंबंधीं अनुदारपणा त्यांनीं कुठेंच दाखविला नाहीं. जीवनांत नि वाङ्मयांतसुद्धां ! वाणीचेंहि त्यांनीं पावित्र्य राखलें. समर्थांचे आचार, विचार नि वाणी तीनहि पवित्र !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम.................... वि: ..............
क्रमांक.................... ग्रं: क्र: ..............

# सज्जनांचा गड

शके १५९७.

चैत्र वद्य दशमीला शिवाजीराजांनीं विजापूरकरांच्या ताब्यांतून परळीचा गड घेतला.


परळीहून पश्चिमेकडील डोंगरमाथ्यावरच्या पाऊल, वाटेनें दक्षिणेकडे तारळ्याजवळची कळंब्याची घळ. तेथून रामघळ व चांफळ. उत्तरेच्या बाजूस महाबळेश्वर, जावळी, शिवथर, रोहिडखोरें, वेलखंडखोरें, आणि पलीकडील मावळ पुणें येथपर्यंत जाण्यायेण्याची व परस्परांशीं गुप्तपणें संबंध ठेवण्याची सोय होती. समोर अजिंक्यतारा. उत्तरेला प्रतापगड, रायगडाच्या वाटा. असा या गडाचा थाट होता.

शिवाजीराजांचा राज्याचा विस्तार वाढला होता नि वाढत होता. समर्थांच्या भेटीची इच्छा झाली, कधीं सल्लामसलतीची जरूर लागली तर आतां वारंवार चांफळला जाणें कठीण होऊं लागलें. म्हणून महाराजांनीं समर्थांना परळीच्या गडावर येऊन रहाण्यास विनंती केली व समर्थांनींहि ती प्रेमळ सूचना मान्य केली.

महाराजांनीं समर्थांना चांफळहून मोठ्या समारंभानें आणलें. गड सजविण्यांत आला होता. स्वामींच्या राहण्याची खास व्यवस्था ठेवली होती. समर्थ गडावर रहावयास आले म्हणून शिवरायांना अतिशय आनंद झाला. समर्थांसारखे सज्जन तेथें आले म्हणून गडानेंहि ‘सज्जनगड’ असें नांव धारण केलें.

समर्थांना गड अतिशय आवडला. उंच उंच डोंगरांनीं वेढलेला हा गड! जणूं कांहीं आसपासच्या प्रदेशाचा पहारेकरीच. समर्थांना सज्जनगडाचा लळा लागला. त्याच्या विशाल खांद्यावर त्यांना विश्रांति वाटली. तो जितका

आवळ तितकाच त्यांना तो रेखीव वाटला. सकाळीं प्रकाश प्रभूचें दर्शन त्यांना सज्जनगडावरून व्हावयाचें नि ते हरखून जायचे. रात्रीच्या वेळीं तारकांनीं आकाश फुलून जायचें. जिकडे तिकडे तारकांचीं दलें दिसायचीं.



घाईघाईनें जातांना दूध सांडावें तसा आकाशगंगेचा पट्टा दिसायचा. कधीं कधीं उल्काफुलें पडतांना दिसायचीं.

ज्येष्ठाषाढांत ढग जमूं लागले कीं उल्काफुलें दिसत नसत. पण घनधार पावसांत सज्जनगड न्हाऊन निघे. आकाशाचें औदार्य निळ्या आकाशांत

मावेनासें होई. त्याच्या अंगावरून सहस्त्रधारा न्हाऊं लागत. दऱ्याखोऱ्यांतून पाण्याचा आवाज घुमत राही. चार महिने सज्जनगडाला महामंगल स्नान चालू असे.

पावसाळ्यानंतर सूर्याचीं किरणें हिरव्या वनश्रीवर पडून परावर्तित होत. तासन् तास ऊनपावसाचा – ऊनसांवलीचा खेळ पाहात समर्थ बसून राहात. गडावर त्यांना चांगलाच एकांत मिळाला. रमणीय सृष्टीचा सुखकर स्पर्श लाभला. ते खूष होते. त्यांना सृष्टीचा अनुग्रह मिळत होता. इतक्या उंचीवरून खालचा प्रदेश गरुडनजरेनें पहावयास मिळत होता. सज्जनगडाच्या दारांतून ऐश्वर्य डोकावत होतें.

अंगापूरच्या डोहांत रामाच्या मूर्तींबरोबरच त्यांना रामवरदायिनीची मूर्ति सांपडली होती. रामाची स्थापना त्यांनीं चांफळच्या मंदिरांत केली. नि रामवरदायिनीची स्थापना त्यांनीं सज्जनगडावर केली. तिच्या सान्निध्यांत ते तासन्तास विचार करीत बसत. तेथें त्यांचा बसण्याचा एक ओटा होता. त्यावर बसून समोरचें उघडें खोरें मोठें रमणीय दिसे.

एक दिवस ते असा विचार करीत बसले असतांना त्यांच्या डोक्यांत संतपरिषदेचे विचार आले. ती कल्पना त्यांनीं शिवबापुढें मांडली नि लागलीच कार्याचीं सूत्रें हलूं लागलीं.

शिवबानें तत्कालीन साऱ्या संतांना – सत्पुरुषांना गडावर येण्यास पाचारण केलें. त्या वेळीं सारी थोर मंडळी गडावर जमली. सत्पुरुष नि राजकारणी माणसें एकत्र जमलीं. सज्जनगडासारखी निवांत, निर्वेध, सुंदर नि सुरेख जागा ! संतमंडळी जमलेली. मराठ्यांचा मेळावा जमलेला. जातीनें त्यांचा राजा हजर. तरवारींचे खणखणाट ऐकून कान किटले होते. पराक्रम दाखवून शरीरं थकलीं होतीं. अशा वेळीं ‘ बरवा नामघोष ’ ऐकायला मिळाला. भजनाचे फड रंगले. कथाकीर्तनांतल्या निरुपणानें परमार्थाची शीग गांठली. संतांची ती प्रेमळ, पवित्र नि अमृतरसवंती पिऊन गो–ब्राह्मणप्रतिपालक शिवबा संतुष्ट झाला. खुद्द शिवरायालाहि स्फूर्ति येऊन त्यानें कीर्तन केलें.

महाराज गरीब नवाज। अजि हो महाराज गरीब नवाज ॥धृ०॥
सेवक होकर सेवा मंगो। इतना साहेब काज
बंदा कमीन हीन में साहेब। रखो मेरी लाज
छत्रपति तुम शेखदार। शिव रखे हमारी लाज

*

**राम !**

समर्थ गडावर राहवयास आल्यापासून पुढें पांच-सहा वर्षांच्या काळांतील बरेंचसें समर्थचरित्र इथें घडलें. जवळ जवळ ते कायम इथेंच राहूं लागले. फक्त रामनवमीच्या उत्सवासाठीं ते चांफळला जाऊन येत. कुणी नसलें तरी राम बोका त्यांना सोबत करी. त्याच्याशीं खेळतांना गडावरचे त्यांचे दिवस हां हां म्हणतां सरले. समर्थ सज्जनगडीं असतां मठांत एक बोका असे. लाडानें त्याचें नांव त्यांनीं 'राम' असें ठेवलें. स्वतःच्या हातानें ते त्याला दूधभात भरवीत. त्याच्या पाठीवरून प्रेमभरानें हात फिरवीत, नि कौतुकानें त्याला विचारीत,

"रामा, झाली ना तृप्ति ?"

त्याचें जेवण झालें कीं मग आपण जेवावयास बसत.

एक दिवस जेवणाचे वेळेस तो दिसला नाहीं. समर्थ म्हणाले,

"रामाचें जेवण झाल्याशिवाय आम्ही कसें जेवावें ?" आक्कांना वाटलें, ते नैवेद्य दाखविला कीं नाहीं म्हणून विचारीत असतील.

त्या म्हणाल्या "नैवेद्य दाखवून झाला."

"अक्का, देवांतला राम नाहीं. बोकोबा राम. त्याला नैवेद्य झाला का ?" सर्वजण हंसले. समर्थ रागावून म्हणाले,

"चेष्टा करूं नका. आज कां दिसत नाहीं तो ? त्याला कुणी त्रास दिला का ?"

"नाहीं."

"मग जा. शोधून आणा त्याला. त्याचें झाल्यावरच आमचें जेवण होईल."

सर्वांची शोधाशोध सुरू झाली. शेवटीं एका कोठींत तो सांपडला. त्याचे डोळे लाल झाले असून त्यांतून पाणी गळत होतें. समर्थांनीं त्याचे डोळे स्वच्छ धुतले. त्याच्या पाठीवरून प्रेमभरानें हात फिरवीत ते सारखे विचारत होते, "कुणी त्रास दिला आमच्या रामाला ?"

"तो फार त्रास देऊं लागला म्हणून आपण त्याच्या डोळ्यांत तिखट घातलें" म्हणून एका शिष्यानें शेवटीं कबूल केलें.

समर्थ रागावून म्हणाले, "तुम्ही दूधभात खातां, मग त्यानें कां खाऊं

नये. तुम्ही रामाचे नि तो नाहीं रामाचा ? फार तर तुमचे जिन्नस तुम्ही झांकून ठेवा, पण त्या मुक्या प्राण्याला असा त्रास देण्यांत काय फायदा ? ”

समर्थांनीं त्याच्या डोळयाला तूप लावलें. त्याला जेवूं घातलें व मग आपण जेवले.

## * किती वेळां दासबोध वाचलात ?

समर्थ आतांशा थकले होते. कफाची व्यथा बळावली होती. “ किल्यावरील पाणी सांचलेलें असल्यामुळें तें पचण्यास जड व कफकारक असतें. वहातें पाणी पिण्यास मिळालें तर त्रास होणार नाहीं ” असें समर्थांनीं कुणाला तरी सांगतांना कल्याणनें ऐकलें. लागलीच दुसऱ्या दिवसापासून दोन मोठे हंडे घेऊन खालच्या उरमोडी नदी वरून तो समर्थांसाठीं पाणी आणूं लागला.

समर्थांचीं वस्त्रें आपल्या पायांचा स्पर्श न होतां नीट धुवावीत. हंडे घांसून त्यांत नदीचें पाणी गाळून भरावें व डोक्यावर भरलेले हंडे आणि खांद्यावर धुण्याचे पिळे ठेवून गड चढावा असा नित्यनेम चालू झाला. समर्थांनीं हें पाहिलें व ते म्हणाले,

“ देहाची अशी हेळसांड बरोबर नाहीं. ”

“ स्वामींच्या कारणीं देह झिजला तर त्याचें सोनेंच होईल. ”


“ उद्यांपासून खालीं जातांना कोठीवाला देईल तें खाऊन जात जा. ”

“ जशी आज्ञा. ”

दुसऱ्या दिवसापासून कल्याणला कोठीवाल्याकडून अधोलीभर हरभऱ्याची डाळ व अडीसरी गूळ मिळूं लागला. मेहनतीला कुणी तयार नव्हतें. पण कल्याणला खुराक मिळाला म्हणून कित्येक भोजनभाऊंच्या पोटांत दुखूं लागलें. “ आम्हांला पण असा खुराक द्या. ” म्हणून कोठीवाल्याकडे त्यांनीं टुमणें लावलें. पण त्याचें सांगणें एकच, “ समर्थांकडून आज्ञा आणा, म्हणजे देतों. ” आतां समर्थांकडे कोण जाणार ? आणि जाऊन त्यांना काय सांगणार ? सगळेजण कल्याणला ‘ डाळगप्पु ’ म्हणून चिडवूं लागले. त्याचा एखादा दोष कुठें दिसतो का ते पाहूं लागले. आणि त्यांना एक दोष दिसला. गुरुसेवा अप्रतिम खरी ! पण माणसाला कांहीं नित्यनैमित्तिक हवें

कीं नाहीं ? आणि कामाच्या रगाड्यांत कल्याणला अजिबात वेळ होत नव्हता. मग कसली उपासना, जपजाप्य नि दासबोध वाचन ?

त्याच्यामागें नित्यनेम नि उपासनेचा लकडा लावला कीं त्याची गुरुसेवा अंतरेल नि आपोआपच गूळडाळीचा रतीब बंद होईल असा विचार करून सर्व शिष्यांनीं स्वामींकडे "हा कांहीं नित्यनेम करीत नाहीं." म्हणून



तक्रार केली. स्वामींनीं त्यांचें कपट केव्हांच ओळखलें होतें; पण तक्रारीला न्याय द्यावा म्हणून त्यांनीं सर्व शिष्यांची बैठक घेतली. समर्थांनीं सर्वांना प्रश्न केला,

" दासबोधाचीं किती पारायणें तुम्हीं केलींत ? "

" पांच वेळां. " एकानें उत्तर दिलें.

" दहा वेळां. " दुसऱ्यानें उत्तर दिलें.

" वीस वेळां. " तिसऱ्यानें उत्तर दिलें.

अशा तऱ्हेनें सर्वांनीं भराभर उत्तरें दिलीं. तेव्हां स्वामी म्हणाले,

" ठीक आहे. आतां एकाच प्रश्नाचें उत्तर द्या. "

ऐसा सद्‌गुरु पूर्णपणीं । तुटे भेदाची कडसणी ।
देहेवीण लोटांगणीं । तया प्रभूसी ॥ —

ही ओवी कुठें आहे ? "

सगळे स्तब्ध ! तेवढ्यांत एकजण धीर करून म्हणाला,

" ग्रंथ कितीहि वेळां वाचलेला असला तरी एखादी ओवी नेमकी कुठें आहे तें कसें सांगतां येईल ? "

" कां येऊं नये ? लक्ष देऊन ग्रंथ वाचला असेल तर ही गोष्ट शक्य आहे."

" आमचा विश्वास नाहीं. "

" थांबा, आमचा तो डाळगप्पू कुठें आहे ? "

आपण कुत्सितबुद्धीनें कल्याणला ठेवलेलें नांव स्वामींना कसें कळलें म्हणून साऱ्यांना आश्चर्य वाटलें. एकजण मत्सरानें पेटून म्हणाला,

" त्या बिचाऱ्याला कधीं पोथी उघडायलाहि वेळ नाहीं. तो काय सांगणार ? "

" ठीक आहे. त्याला येतें कीं नाहीं तें पाहूं या तरी. आणा पाहूं त्याला बोलावून — "

बोलावणें गेल्यावर सारवणें अर्धवट सोडून कल्याण तेथें आला.

" कल्याणा, अरे हात तरी धुवून यायचें. "

" तुमचा शब्द आल्यावर हात धुवावयाला तरी वेळ कोठला ! "

" कल्याणा, दासबोध कधीं वाचलास ? "

" लिहितांना वाचला तेवढाच ! "

" रोज कां वाचीत नाहींस ? "

" गुरुसेवेंतच सारा वेळ जातो. "

" बरं, एक सांगशील ? "

" काय ? "

समर्थांनीं इतरांप्रमाणें त्याला अमूक ओवी कुठें आहे म्हणून विचारलें. कल्याणानें उत्तर दिलें,

" दशक ७. समास १. ओवी १८.

कल्याणानें ओवी सांगितल्यावर समर्थ शिष्यांना म्हणाले,

" पहा बरं काढून. "

उत्तर अगदीं बिनचूक ! समर्थ हंसत म्हणाले,

" अरे, तुम्ही ग्रंथाचें अध्ययन केलें नाहींत. नुसतें पूजन केलेंत. ग्रंथाचें खरें अध्ययन आमच्या कल्याणानें केलें. " शिष्य काय बोलणार ? तेवढ्यांत समर्थांनीं सर्व दासबोधाची पोथी विस्कळीत केली. पुढचीं पानें मागें. मधलीं पुढें. मागचीं आणखी कोठेंतरी. नंतर शिष्यांपुढें ठेवून ते म्हणाले,

" पारायणें केलींत ना ? आतां दशक नि समास यांचा अनुक्रम लावून दाखवा. "

सगळे गडबडले. कल्याणानें मात्र विस्कटलेला दासबोध एकत्र करून दाखविला. कल्याण आपला सारा काळ गुरुसेवेंत कंठी हें खरें; पण त्या सेवेमुळेंच त्याला ज्ञान स्फुरत होतें. त्याची स्मरणशक्तीहि दांडगी होती. मग साऱ्या शिष्यांना पटलें, कल्याण नुसता डाळगप्पू नाहीं. त्याचें बुद्धि-सामर्थ्यहि अलौकिकच आहे !

*

## फुटो हें मस्तक !

सज्जनगडावर शिष्यांची फार दाटी झाली होती. जो येईल तो शिष्य म्हणून तेथें राहूं लागला होता. पण त्यांत खरे शिष्य फार कमी नि भोजन-भाऊच फार ! गर्दी कमी करावी म्हणून समर्थांनीं एक दिवस नाटक केलें. सगळ्या अंगाला शेंदूर फांसला. कपाळाला कुंकवाचा मळवट भरला. आणि शिवबानें दिलेली पाणीदार तरवार घेऊन ते इतस्ततः धांवत सुटले. वेड लागल्यासारखे ! जो दिसेल त्याच्या अंगावर धांवत जाऊन ते म्हणायचे,

" थांब, तुझें मुंडकेंच छाटून टाकतों.

पळा पळा ब्रह्मपिसा येतो जवळीं। रामनामे हांक देऊनि करीतो खांडोळी ॥"

समर्थांचा हा आग्यावेताळाचा अवतार पाहून बरेच शिष्य गड सोडून खालीं पळून गेले. त्यावेळीं कल्याण शिरगांवीं पोथीच्या हस्तलिखिताचें काम करीत होता.

सगळेजण त्याच्याकडे आले. पण समर्थांच्या आज्ञेप्रमाणें लिहिणें पुरें झाल्याशिवाय कल्याण जागा सोडण्यास तयार होईना. लिहिणें आटोपल्यावर कल्याण गडावर आला. सगळीकडे सामसूम होती. चारपांच माणसें तेवढीं जीव मुठींत धरून कुठें तरी लपून बसलेलीं. कल्याणाला पहातांच समर्थ मनांत म्हणाले, " हा मुळारी आतां आपली भेट घेतल्याशिवाय राहाणार नाहीं. " पण खोटें अवसान आणून तरवार उपसून कल्याणाच्या अंगावर धांवत जात ते ओरडले,

" थांब कल्याणा. पुढें कशाला येतोस ? फुकट मरशील ! "

पण जीव धोक्यांत घालून कल्याण स्वामींच्या पायाला बिलगला. त्याला उठवीत समर्थ म्हणाले,

" कल्याणा, तूंच तेवढा धोका पत्करून माझ्या चरणांजवळ आलास. बाकीच्यांना वाटलें समर्थांना वेड लागलें आहे. "

दिवसेंदिवस कल्याणावर समर्थांचा अधिकच जीव जडत होता. नंतर त्यांच्याकडे कुणी अनुग्रह घेण्यास जरी आले तरी, " आतां गुरुत्व कल्याणाकडे आहे, " असें सांगून ते त्यास कल्याणाकडे पाठवीत.

* 

## विडा रंगला

कफविकारावर औषध म्हणून समर्थ विडा खात असत. विडा करण्याचें काम भोळारामाकडे होतें. पुढें समर्थांचे दांत हालूं लागले म्हणून तो त्यांना विडा कुटून देऊं लागला. कांहीं शिष्यांच्या मनांत विकल्प येऊन त्यांनीं खलबत्ता लपवून ठेवला. समर्थांची विडा खाण्याची वेळ झाली तरी खलबत्ता मिळेना. भोळारामानें आपलें तोंड स्वच्छ धुतलें व विडा चावून समर्थांना नेऊन दिला. समर्थ म्हणाले,

" भोळ्यारामा, आजचा विडा फारच गोड लागतो आहे रे ! "

" खरंच, स्वामीजी ! "

" अगदीं खरं ! रोज असाच विडा करून देत चला आम्हांला. "

रामाला शबरीचीं बोरें गोड लागलीं नि त्याच्या भक्ताला शिष्याचा उष्टा विडा गोड लागला. भाव गोड असला म्हणजे सारें गोड लागतें हेंच खरें !

खलबत्ता अजून सांपडत नव्हता आणि भोळ्यारामाचा हाच क्रम बरेच दिवस चालू होता. एका शिष्यानें शिवाजी महाराजांकडे त्याचें गाऱ्हाणें नेलें. त्या दिवशीं शिवबा आले नि त्यांनीं भोळ्यारामाला खलबत्त्यासह विडा आणण्यास सांगितलें.

भोळ्यारामानें तोंडांत घालून नित्याप्रमाणें विडा चावला आणि आपल्या हातानें मान कापून शिवबांचे हातीं दिली. व्यवहार रोख होता. पण तो प्रकार पाहून राजे मात्र थरारून गेले.

धडाशिवाय लढणारा मुरारबाजी त्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागला. रणांगणांतले पराक्रमी पुरुष त्यांनीं पाहिले होते. पण आतां ते अध्यात्मिक शौर्य पहात होते. स्वराज्यांतील स्वामिनिष्ठेचीं उदाहरणें त्यांच्या परिचयाचीं होतीं; पण आतां ते पारमार्थिक गुरुनिष्ठा अनुभवित होते. राजांच्या डोळ्यांतून आंसवांची माळ तुटली. मागें उभे राहिलेले समर्थ त्यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले,

" आतां ह्या विड्याची गोडी तुम्हाला कळली असेल, शिवबा. "

" धन्य आहे, स्वामी ! आम्ही दिलगीर आहोंत. पण ... "

" खलबत्ता जेथला तेथें ठेवा. "

समर्थांच्या आज्ञेवरून शिवबानें तें शिर धडावर ठेवलें. पण ठेवतांना हात हालल्यामुळें मस्तक किंचित् वांकडें बसलें. वांकडमान्या भोळाराम भोळ्या भावानें समर्थांची सेवा शेवटपर्यंत करीत होता.

*

## उदंड झालें पाणी

आग्र्याच्या सुटकेनंतर सिंहगड व पुरंदर हे किल्ले घेऊन शिवाजीराजे पुनः बळकट झाले. चारहि दिशांस शिवाजीराजांचें राज्य वृद्धिंगत झालें. ठिकठिकाणांहून आणलेला पैसा व लूट सरकारांत जमा होऊन राज्याची शक्ति वाढली. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान शिवाजीस खंडण्या देऊं लागले. मोंगलांच्या राज्यांतील बऱ्याच प्रदेशांतून शिवाजीस चौथाईचे हक्क मिळूं लागले.

आतां जनतेवर छाप पाडण्यास, इतरत्र दरारा वाढविण्यास आणि एकंदरीनें नांवलौकिक पसरविण्यास आपल्या उद्योगाची सांगता राज्याभिषेकानें व्हावी असें समर्थांच्या सल्ल्यानें शिवाजीनें ठरविलें. राज्याभिषेक करण्यासाठीं गागाभट्टांना पाचरण करावें हेंहि श्री समर्थांनींच सुचविलें.

शके १५९६. आनंद संवत्सर ज्येष्ठ शु. १२ शुक्रवार! तीन घटका उरली होती. राजे सिंहासनीं बसले. सिंहासनाच्या डावीकडे सरनोबत सरसेनापति सरदार हंबीरराव मोहिते, रामचंद्र त्रिंबक, रावजी निराजी, रघुनाथ पंडितराव व उजवीकडे मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे, अमात्य रामचंद्र नीळकंठ, अण्णाजी दत्तो व मंत्री दत्ताजी त्रिंबक वाकनीस आपल्या मानाप्रमाणें अभिषेक द्रव्याचे कलश घेऊन उभे राहिले. सुवर्णपुष्पांची व रत्नांची वृष्टि झाली. सुवासिनींनीं पंचारती ओवाळल्या. ब्राह्मणांनीं वेदघोष सुरू केले व शिवबाला आशीर्वाद दिले. महानद्यांचें व समुद्राचें उदक घेऊन सिंहासनावर बसलेल्या शिवबावर अभिषेक केला गेला. गागाभट्टांनीं मंत्र म्हणत राजमुकुट स्वहस्तें शिवाजीराजांच्या मस्तकावर ठेवला. सारा गड आनंद उल्हासानें नाचूं लागला. सर्वच आनंदलें, जिकडे तिकडे मधुर वाद्यांचा गजर होऊं लागला. आपल्या पराक्रमी पुत्राचें हें महद्भाग्य अवलोकन करून मातुश्री जिजाबाई कृतकृत्य झाल्या. खरोखरच, कित्येक शतकांतून असा सोन्याचा दिवस एकदांच येत असतो! गोब्राह्मणप्रतिपालक क्षत्रियकुलावंतस श्रीछत्रपति शिवाजी महाराज की जय! शिवाजी राजांच्या जयजयकारानें दाही दिशा दणाणून गेल्या.

*

तिकडे रायगडावर जिजाबाईच्या डोळ्यांत आनंदाश्रु होते नि इकडे सज्जनगडावर समर्थांच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रु होते.

प्रत्यक्ष राज्याभिषेकाच्या वेळीं समर्थ रायगडावर नव्हते. आपल्या देखत सिंहासनावर बसायला राजे संकोच करतील म्हणून कांहींतरी कारण सांगून समर्थांनीं तेथें हजर रहाण्याचें टाळलें. पण छत्रपति राजा झाला म्हणून त्या विरक्त वैराग्याला केवढा आनंद झाला! केवढा आनंद!!

शिवाजीनें आपली भेट म्हणून त्यांना एक जरीची भगवी कफनी पाठविली. पण समर्थांनीं आपली छाटी कधीं सोडली नाहीं.

आमची प्रतिज्ञा ऐसी। कांहीं न मागावें शिष्यासी। ही तर त्यांची प्रतिज्ञा होती. भरजरी कपड्यांचा स्पर्श राजगुरु झाल्यावरहि त्यांनीं कधीं होऊं दिला नाहीं. भरजरी कफनीकडे पहात ते म्हणाले,

"तुझा मला काय उपयोग? झाडांच्या साली वल्कलें पुरवितात. पहाडांतून खळाळणारे निर्मळ झरे तहान मिटवितात. पर्वतांच्या गुहांमुळें निवाऱ्याच्या जागेचीहि उणीव नाहीं. जा, ही भरजरी कफनी, राजाला देऊन माझे मनोगत सांग. त्याला विचार, तुझ्या राज्यांत मला काय कमी आहे? पण नको. शिवबाला वाईट वाटेल."

स्वतःशीं बडबडत समर्थांनीं ती भरजरी कफनी रामाच्या अंगावर घातली. त्यांना स्वतःकरतां कांहींहि नको होतें. हवाच असेल तर त्यांना आपल्या शिष्याचा पराक्रम हवा होता तो त्यांना मिळाला आणि ते समाधान पावले.

महाराष्ट्रांत पुन्हां अयोध्या अवतरली म्हणून समर्थांना समाधान झालें. न्यायाचें, धर्माचे राज्य पुन्हां प्रकटलें. साडेतीनशें वर्षांच्या पारतंत्र्याच्या शृंखला निखळून पडल्या. अंधार गेला, विषण्णता गेली, दैन्य गेलें, नैराश्यता लोप पावली, दुःख पळालें, समतेचें, ममतेचें, धर्माचें नि श्रद्धेचें सिंहासन उभें राहिलें. सांवलीला छत्र मिळालें. अवघ्यांना माहेर लाभलें. विश्रांतीला आधारखंड गवसला. स्वराज्य व स्वधर्म एकत्र नांदूं लागले. सह्याद्रीला हर्षवायु झाला. शिवरायाच्या अभिषेकानंतर महाराष्ट्र सुखसंपन्न झाला आणि सज्जनगडावरचा योगी हातांतली कुबडी हवेंत उंच उडवीत निर्भर निळ्या आकाशाकडे पाहून आनंदानें गर्जूं लागला,

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं। तें तें तैसेंचि होतसे
हिंडतां फिरतां गेलों। आनंदवनभूवनीं ॥
खौळले लोक देवाचे। मुख्य देवचि उठिला
कळेना काय रे होतें। आनंवनभूवनीं ॥
स्वर्गींची लोटली जेथें। रामगंगा महानदी
तीर्थासी तूळणा नाहीं। आनंदवनभूवनीं ॥
त्रैलोक्य चालिल्या फौजा। सौख्य बंदविमोचनें
मोहीम मांडिली मोठी। आनंदवनभूवनीं
अनेक वाजतीं वाद्यें। ध्वनि कल्लोळ उठिला

छबीने डोलती ढाला । आनंदवनभूवनीं
कल्पांत मांडिला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया
कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभूवनीं
बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावलें
अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभूवनीं
येथून वाढला धर्मु । रमाधर्म समागमें
संतोष मांडीला मोठा । आनंदवनभूवनीं
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला
मोडिली मांडिली क्षेत्रें । आनंदवनभूवनीं
उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया
जपतप अनुष्ठानें । आनंदवनभूवनीं
लिहीला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला
चढता वाढता प्रेमा । आनंदवनभूवनीं
बंड पाषांड उडालें । शुद्ध आध्यात्म वाढलें
रामकर्ता रामभोक्ता । आनंदवनभूवनीं
देवालयें दीपमाळा । रंगमाळा बहूविधा
पूजिला देवदेवांचा । आनंदवनभूवनीं
गीत संगीत सामर्थ्यें । वाद्य कल्लोळ उठिला
मिळाले सर्व अर्थार्थी । आनंदवनभूवनीं

ज्याच्यासाठीं एवढा अट्टाहास केला होता तें समर्थांचें आनंदभुवनाचें स्वप्न शेवटीं साकार झालें. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु ओघळले. पंचवटीला जें स्वप्नीं पाहिलें तें आज प्रत्यक्षांत साकार झाले. शिवप्रभूचें कार्य पाहून आपला रामच त्यांच्या रूपानें वावरत आहे असें समर्थांना वाटलें.

राज्याभिषेकाला समर्थ येऊं शकले नाहींत म्हणून शिवबा त्यांना भेटायला गेला. सातआठ दिवस शिवबा गडावर होते. गुरुशिष्य एकत्र बसले, बोलले. हितगूज झालें. समर्थांनीं शिवबाला जातांना एकच सांगितलें. समर्थ म्हणाले,

“ देह मर्त्य आहे. तो एक दिवस जाणारच. म्हणून देहाची पर्वा न करतां हातीं घेतलेल्या महाव्रताची सांगता अशीच चालू ठेवा. आनंदवनभुवनाला जपा. संतसज्जनांच्या सन्मानासाठीं, मुला-लेकरांच्या आनंदासाठीं, मायबहिणीच्या सौभाग्यासाठीं आणि स्वधर्मस्वराज्यासाठीं हंसत हंसत मरा. पण

तसूभर म्हणून मागें हटूं नका. हेंच तुमचें पुण्य. हाच तुमचा धर्म नि ह्यानेंच आपण चिरंजीव व्हाल. ''

समर्थांचा निरोप घेऊन शिवाजीराजांनीं घोडा भरधांव फेंकला तरी त्यांचें मन मात्र समर्थांच्या खडावापाशींच घुटमळत होतें.

* **स्वराज्याचा सूर्योदय**

शिवरायाच्या राज्याभिषेकानंतर महाराष्ट्र सुखसंपन्न झाला. मराठी राज्याचा विस्तार झाला. महाराष्ट्राच्या भूमीवर नवे नवे गड उभे राहूं लागले. अप्पाजी दत्तो यांचे देखरेखीखालीं सामानगड बांधण्याचें काम चाललें होतें. त्या ठिकाणीं अनेक सुतार, गवंडी, पाथरवट, मजूर खपत होते. कामाची पाहणी करण्यासाठीं शिवाजीराजे स्वतः आले होते. क्षणभर शिवरायांच्या मनांत आलें कीं आज आपण हें गडाचें काम काढलें आहे त्यामुळें इतक्या लोकांचीं पोटें भरत आहेत. मीच ह्यांचा पोशिंदा आहे. जर हें काम मी न काढतों तर — किती ? एक क्षणभरच असा विचार शिवबांच्या मनांत आला असेल. शिवबाचा हा अहंकार कांहीं अगदींच अयोग्य नव्हता. पराक्रम केल्यावर माणसाची छाती अभिमानानें कां फुगूं नये ? आपल्या विशेष कर्तृत्वानें माणसानें हुरळून कां जाऊं नये ? पण ही झाली सामान्यांची गोष्ट ! शिवबा एक आदर्श राजे होते, श्रीसमर्थ रामदास स्वामींचे शिष्य होते. अहंकाराचें एवढेंहि किल्मीष त्यांच्या मनांत नसावें. माझे शिवबा अहंकारापासून दूर असावेत, असें समर्थांना वाटलें. माझ्या राजसाला जरासुद्धां अहंकाराचा वारा लागूं नये, असें त्यांच्या मनानें घेतलें. शिवरायाच्या चेहऱ्यावरील भाव ओळखीत ते म्हणाले,

" राजांच्या मनांत आज कांहीं विपरीत आलेलें दिसतेंय्. ''

शिवबा दचकले पण स्वतःला सांवरीत म्हणाले,

" स्वामींनीं असा कां प्रश्न विचारला ? ''


" आम्ही जाणतों सारें. पण आज आम्ही तुम्हांला एक मजा दाखविणार आहोंत. ''

एका पाथरवटाला बोलावून समर्थांनीं त्याला एक दगड फोडावयास सांगितला. त्यांतून एक जिवंत बेटकुळी उडी मारून बाहेर पळाली. तिच्याकडे बोट दाखवीत समर्थ म्हणाले,

" शिवबा, फत्तरांत हिला पाणी कुणीं दिलें ? "

" आश्चर्यच आहे हें ! "

" आश्चर्य कसलें ? अरे सर्वदाता तो राम आहे. मानवानें वृथा अभिमान कां नि कशाला बाळगायचा ? आपण नुसतें निमित्ताला कारण असतों. "



शिवबांचा हात हातांत धरून समर्थ गाऊं लागले —

आम्ही काय कुणाचें खातों रे। तो राम आम्हांला देतो रे ॥ धृ० ॥

बांधिले घुमट किल्ल्यांचे तट। तयाला फुटती पिंपळ–वट
तेथें कोण लावितो मोट। बुडाला पाणी घालतो ॥ १ ॥

खडक फोडितां सजीव रोडकी। पाहिली सर्वांनीं बेडकी
सिंधु नसतां तियेचे मुखीं। पाणी कोण घालितो ॥ २ ॥

पहा रे पहा मातेचियें स्तनीं । चिंतितां रक्त–मांस मलखाणी
तिथें विमल दुग्ध घालोनी । कोण पोसीतो ॥ ३ ॥
नसतां पाण्याचे बुडबुडे । सदा सर्वदा गगन कोरडें
दास म्हणे जीवन चहुंकडे । पाडुनि सडे पीक उगवीतो ॥ ४ ॥"

दासांना रागा–तालाची माहिती होती. ठेका धरून ते गात होते. शिवबा डोलत होते. त्यांच्या चित्तांतला अहंकार साफ जळून जात होता. शिवबा मराठ्यांचे राजे तर झालेच होते. समर्थ आतां त्यांना मनाचा राजा व्हायला शिकवीत होते. बाह्य मुलूख त्यांनीं जिंकला होता. समर्थ त्यांना अंतरमनावर चढाई कशी करावी त्याचे धडे देत होते. शत्रूला जिंकणें हें कुठल्याहि शूर माणसाला जमतें; पण मनाला जिंकणें फक्त संतानाच जमतें.

*

## दहींफळ

शके १५९९. फाल्गुन वद्य १४. ह्या दिवशीं दहींफळ येथें समर्थांच्या मोठ्या भावानें—श्रेष्ठींनीं–आपला देह ठेवला. त्यांची पत्नी त्यांच्याबरोबरच सती गेली. पोरं उघडीं पडलीं. पहिला वज्राघात आईच्या मृत्यूचा आणि आतां हा दुसरा मोठ्या भावाच्या मृत्यूचा ! समर्थांनीं मुलांकरवीं सर्व विधि केले व मुलांना चांफळला ठेवून त्यांना उपदेश केला :

बरें सत्य बोला यथातथ्य चाला
बहू मानिती लोक येणें तुम्हांला
धरा बुद्धि पोटीं विवेकें मुलें हो
बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥
सदा दांत घांसोनि तोंडा धुवावें
कळाहीन तें शूद्रमूखीं नसावें
सदा सर्वदा यत्न सोडूं नये रे
बहूकाळ हा खेळ कामा नये रे ॥ २ ॥
दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें
प्रसंगीं अखंडित वाचीत जावें
गुणश्रेष्ठ उपास्य त्यांचें करावें
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥

वरी चांगला अंतरीं गोड नाहीं
तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं
वरी चांगला अंतरीं गोड आहे
तयालागिं कोणीतरी शोधिताहे ॥ ४ ॥
भला रे भला बोलती तें करावें
बहूतां जनांचे मुखें येश घ्यावें
परी शेवटीं सर्व सोडोनी द्यावें
मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ५ ॥

समर्थांचे पुतणे आपल्या काकांच्या प्रेमळ नजरेखालीं वाढत होते.

## * तुळशी मंजिरी तेथें डोलत असते

शके १६००.

आग्लांईच्या देवळांतल्या कट्टयावर समर्थ बसले होते. सूर्य अस्तास जाऊन बराच वेळ झाला होता. वेणाबाई समर्थांशीं बोलत होत्या. बोलतां बोलतां काळोख केव्हां पडला तें कळलें देखील नाहीं. एक शिष्य देवीजवळ तेलवात लावून गेला, तेव्हां ते भानावर आले. समर्थांनीं नि वेणाबाईनीं देवीला हात जोडले. कातरवेळीं आज त्यांना फार उदास वाटत होतें. समर्थांना त्या म्हणत होत्या,

"आतां इथं रहावंसं वाटत नाहीं."

"आम्हांला सोडून जाण्याची इतकी घाई कां बरं झाली?"

"घाई कसली! नुसता मनोदय सांगितला."

"आपण गेल्यावर मठाची व्यवस्था कोण पाहणार? आपल्या हातचें गोड अन्न आम्हांला कसें मिळणार? शिवाय प्रभु रामचंद्रालाहि आपल्या हातचा नैवेद्य अजून हवा आहे."

"स्वामीजी क्षमा करा. आपल्यासारखे कैवल्यदाते जवळ असतांना मी वैकुंठाला निघण्याची भाषा चुकीनेंच बोललें."

"जाऊं द्या झालं. ह्या कातरवेळीं अशा गोष्टीच नको."

"माझा 'सीतास्वयंवर' ग्रंथ आपण डोळ्यांखालून घातलात कीं नाहीं?"

" आपण पहातांच आहां आमच्या मागची धांवपळ. आतां असें करा. ह्या रामनवमीला आपण ह्याच ग्रंथावर कीर्तन करा म्हणजे झालें. "

" जशी आज्ञा. "

रामनवमीला वेणाबाईनीं रसाळ कीर्तन केलें. शेवटीं त्या म्हणाल्या,

" असें बोलिले वाल्मिके मूळ ग्रंथीं । तसें काय साधेल आम्हांस अर्थीं ॥
समयीं करावी यथासांग पूजा । दिना दुबळा बेल भावार्थ माझा ॥ "

कीर्तनानें सर्वांनाच डोल आले.

' सीता–स्वयंवर ' अनेकांनीं वर्णिलें आहे. पण वेणाबाईच्या ग्रंथाची चव काहीं आगळीच हें रसिकांनींही मान्य केलें आहे.

शके १६०० चैत्र वद्य चतुर्दशीचा दिवस उजाडला. समर्थांनीं शिष्यांना आज प्रेतदहनाची तयारी ठेवा असें सांगितलें तेव्हां सर्वांना आश्चर्य वाटलें. वेणाबाईनीं स्वहस्तें स्वयंपाक करून रामाला नैवेद्य दाखविला. समर्थांना नमस्कार करून त्या कीर्तनाला उभ्या राहिल्या.

पांढरेंशुभ्र पातळ नेसलेलें, कपाळाला बुक्का, गळ्यांत वीणा, हातांत चिपळ्या, तोंडावर तेज, श्रोत्यांवर त्यांची छाप पडे. त्यांचा कंठ मधुर होता. वेणाबाईच्या कीर्तनाला आज श्रोत्यांनीं खूपच गर्दी केली होती. प्रत्यक्ष समर्थहि कीर्तनांत डोलत होते. कीर्तन संपून आरती झाली. वेणाबाई समर्थांच्या पायांशीं गेल्या. आपली वीणा त्यांच्या हातांत देऊन त्यांच्या पायांवर त्यांनीं डोकें ठेवलें व आपला प्राण सोडला. वेणाबाई नमस्काराला खालीं वांकल्या त्या परत उठल्याच नाहींत. त्या रामरूप झाल्या. गडावर रामधून उठला. प्रेताचें दहन झालें. तेराव्या दिवशीं तेथें एक चंपक वृक्ष उगवला. त्या जागीं वेणाबाईचें समाधी–वृंदावन बांधलें गेलें. वाऱ्यानें वेडावलेली तुळशी मंजिरी तेथें डोलत असते.

## * मरावें परी कीर्तिरूपें उरावें

राज्याभिषेकानंतर भीमेच्या कांठीं छावणी देऊन शिवबानें कर्नाटकावर स्वारी करण्याचा विचार केला. त्याप्रमाणें चित्रदुर्ग, बल्लारी, रायदुर्ग, कनकगिरी, हरपनहळ्ळी इत्यादि ठिकाणें हस्तगत केलीं. अशा रीतीनें अवघ्या दीड वर्षांत त्यानें आपल्या राज्यापासून सहाशें मैल दूर असें एक मोठें राज्य कमावलें.

शके १६००. कर्नाटक स्वारी आटोपून शिवाजी पन्हाळ्यावर दाखल झाले. शिवाजीनें मोंगलांविरुद्ध युद्ध केलें. त्यांत त्यांना थकवा आला नाहीं, पण प्रापंचिक दुःखानें मात्र मराठ्यांचा राजा खचून गेला. मोंगलांकडून थप्पड खाऊन संभाजी पन्हाळ्यास आला होता. संभाजीला आतां मोंगलांचा चांगलाच अनुभव आला होता. म्हणून शिवाजीनें त्या पश्चात्तप्त मुलाचें मन जास्त दुखावलें नाहीं. त्यास नाना प्रकारें बोध केला. पण संभाजीच्या वर्तनामुळें एकंदरींत कष्टी होऊन शिवबांची प्रकृति क्षीण होत चालली. शिवबा पन्हाळ्यावर एक महिना राहिले. पुढें राज्य कोण सांभाळणार याची विवंचना करीत दोघांनीं एकत्र बसून राज्याची व दौलतीची मोजदाद केली. खजिना, गडकोट, जंजिरे, मुलूख, जिन्नस, जडजवाहीर, सुवर्णचांदी इत्यादि सर्वांच्या याद्या झाल्या. संभाजीवर कांहीं मंडळींना देखरेख ठेवण्यास सांगितलें. मुलाच्या वर्तनाचा अत्यंत खेद वाटून कष्टी शिवबा रायगडावर जाण्यास निघाले. ज्या पुरुषानें कपटी औरंगजेबाच्या कैदेंतून आपली इतक्या शिताफीनें सुटका करून घेतली त्याची मति पोटच्या मुलापुढें मात्र गुंग झाली.

संभाजी आपला राज्यकारभार हलका करील किंवा निदान केलेला राष्ट्रीय उद्योग टिकवील अशी शिवाजीस मुळींच खात्री वाटली नाहीं. उलट, त्याला नजरकैदेंतच ठेवणें त्यांना जरूर पडलें. पण ह्या सर्व बनावामुळें शिवबांस अत्यंत मानसिक त्रास झाला. त्यांना आशेचा तंतु कोठेंच दिसत नव्हता. दुसरा मुलगा–राजाराम–लहान असल्यामुळें कारभारांत उपयोगी पडणारा नव्हता. घरांत बायकांतील धुसपूस शिवाजीला चैन पडूं देत नव्हती. विशेषतः सोयराबाईच्या खटपटी स्वभावाची त्यांना फार धास्ती वाटत होती. दरबारांत मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांजमध्यें उघड उघड द्वेष असून अष्टप्रधानांकडे राज्यकारभार सोंपविल्यास ही मंडळी एकमेकांच्या माना कापून राज्य बुडवतील, अशीच शिवाजीची भावना झाली. अंतस्थ तंटेबखेडे, चांगल्या माणसांचा नि नेत्यांचा अभाव ह्यांमुळें शिवबाला पुढें काळोख दिसूं लागला. खंबीर धीराचा राजा मनानें खचला. त्याला कुणाचा तरी आधार हवा होता. कुणाचें तरी मार्गदर्शन हवें होतें. कुणी तरी त्याला धीर द्यायला हवें होतें. पण सिंहाला धीर कुणी द्यायचा ? इथं शरीराची ताकद अपुरी नव्हतीच. मनोधैर्य गेलें होतें. मन दुबळें झालें कीं सारेंच संपलें.

मनाची ताकद देणारे फक्त संतच असतात. आयुष्यांत शेवटच्या क्षणीं संततत्त्वज्ञानच उपयोगी पडते. मनाचे श्लोक लिहिणारे रामदासच आपल्या मनाला धीर देतील असें शिवबांना वाटलें नि शिवबा शके १६०१ च्या पौष महिन्यांत सज्जनगडावर येऊन राहिले. मराठ्याच्या राजाला इथं दिलासा मिळाला. मनाची शांति मिळाली. उभयतांची भावी व्यवस्थेसंबंधीं खूप बोलणीं झालीं. निरनिराळ्या तऱ्हेनें शिवबांना चार गोष्टी सांगून समर्थ शेवटीं एवढेंच सार सांगत : ह्या जगांत कायमचें टिकणारें कांहींच नाहीं. आलेला प्रत्येक जण जावयाचा आहे. उभी राहिलेली प्रत्येक गोष्ट आज ना उद्यां ढांसळायची आहे. एवढा मोठा प्रखर नि तेजस्वी सूर्य, पण तोहि उगवतो नि मावळतो. एवढं सुंदर फूल. पण तेंहि कोमेजून जातें. एवढा मोठा तेजस्वी तारा, पण त्याच्याहि नशिबीं उल्कापात ! म्हणून सांगतों शिवबा— मरावें परी कीर्तिरूपें उरावें !

## * तोल सांभाळावा

सज्जनगडावर शिवाजी महाराज आले आहेत ही संधि साधून एक कोल्हाटी आपला खेळ दाखविण्यासाठीं तेथें गेला. हेतु हा कीं राजासारख्या थोरामोठ्यांसमोर आपला खेळ झाला तर बराचसा द्रव्यलाभ होईल. त्याचा खेळ झाल्यावर समर्थ म्हणाले,

" वा ! छान. तारेवरची कसरत तर फार छान झाली. "

" केवढा शरीराचा तोल सांभाळणें ! " शिवबा म्हणाले.

" शरीराचा तोल कां ? मनाचाहि ! " समर्थ म्हणाले.

" खरें आहे स्वामीजींचें म्हणणें. तारेवरून चालतांना आम्ही सारें जग विसरतों. मनापुढें एकच गोष्ट असते. तारेवरून चालणें ! त्यावेळीं दुसरा कसलाच विचार आमच्यापुढें नसतो. "

" मनाची अशी धारणा असतांना तूं योगाभ्यास कां करीत नाहींस ? "

" महाराज, आम्हां गरिबांना कसला योग ? पोटाची खळगी भरतां भरतां पूर्वेचा सूर्य पश्चिमेला कसा सरकतो तेंच कळत नाहीं. "

" खरं आहे बाबा ! परमेश्वरानें पोट सर्वांच्याच मागें लावलेंय्. पण ज्यानें आपल्याला जन्म देऊन ऋणी करून ठेवलें त्याच्याकरतां तरी कांहीं करायला नको का ? "

" तसें केलें तर काय होईल ? "

" पोटाबरोबर रामहि जोडला जाईल. "

समर्थांनीं त्याला पुष्कळ द्रव्य देऊन योगाचें एक आसन सांगितलें. त्यानें नमस्कार केल्यावर त्याला निरोप देतांना ते म्हणाले,

" विमळ विमळ भासे । भासतां भास नाशे
निखळ सुख विलासें । बुद्धि बोधें विकासे
वचन जनित सूखा । कोण संख्या करावी
निजखुण निजभावें । दृढ जीवीं धरावी ॥

जयजय रघुवीर समर्थ ! "

## * महाराष्ट्राचा सूर्य मावळला !

माघ शु. १५ ला स्वामींचा निरोप घेऊन महाराज परत रायगडीं निघाले. जातांना स्वामींच्या चरणांवर त्यांनीं डोकें ठेवलें तेव्हां स्वामी म्हणाले,

" जा, सुखानं जा राजा, तूं गेल्यावर आम्हांला रामावाचून कोणीच नाहीं.
आम्हां ये प्रपंचीं कोणी नाहीं सखा । एका रघुनायका वाचोनियां
आकाश अवचितें जरी कोसळेल । मज तेथें राखेल आत्मारामू
शिवाजी महाराज सज्जनगडावरून गेले ते कायमचे जाण्याकरतांच ! "

दोन महिन्यांनीं उघडा बोडका जासूद मान खालीं घालून गडावर आला. शिष्यांना पेंच पडला कीं ही बातमी समर्थांना कशी सांगायची ? समर्थ मठाचे अंगणांतील चांफ्याच्या वृक्षाखालीं ओट्यावर बसले होते तिकडे ते गेले. पण शब्दांची जरुरीच नव्हती. त्यांना पाहून डोळ्यांत पाणी आणून समर्थ म्हणाले, " आम्हांला समजलं ! "

समर्थांना एकटे सोडून शिष्य मागल्या पावलीं परतले.

वज्राघात !

नाहीं नाहीं ह्या दुर्घटनेला हा शब्दहि अपुराच पडला असता अशी ती घटना होती.

महाराष्ट्र अस्मितेचा देदिप्यमान आविष्कार, शांति, पुष्टि, तुष्टि या मंत्राचा रचनाकार, मंगलतेचा सहजोद्धार, गोब्राह्मणप्रतिपालक क्षत्रियकुलावंतस श्री छत्रपति शिवाजी महाराज आज दासांना सोडून, त्यांच्या भवानीला सोडून, जीवलग मावळ्यांना पोरकें करून शके १६०२ रौद्र संवत्सरी चैत्री

पौर्णिमेच्या दिवशीं रविवारीं निजधामास गेले! नव्हे नव्हे, एक देवमाणूस आपलें अवतारकार्य संपवून देवाच्या घरीं गेला. शिवबांच्या रूपानें स्वराज्यांतला एक देदीप्यमान ध्रुवताराच जणूं निखळून पडला. त्यांच्या मरणानें अवघा महाराष्ट्र पोरका झाला.

शिवबा हें एक महाराष्ट्राचें सुंदर प्रतीक होतें. बुद्धि व भावना, श्रद्धा व तर्क, स्थिति व गति, परंपरा व प्रगति या परस्परविरोधी द्वंद्वांचें तें एक अतिमनोहर मिश्रण होतें. धर्म व राजकारण, मुत्सद्देगिरी व ऋजुता यांचा तो एक सहजसुंदर समन्वय होता. आतां शिवबा दिसणार नव्हता नि त्याचे पराक्रमहि ऐकूं येणार नव्हते. एवढे मोठे निःस्पृह, वैराग्यशील नि आत्मज्ञानी समर्थ! पण महाराजांच्या मृत्यूची बातमी ऐकून तेहि उद्विग्न झाले. "श्रींची इच्छा!" एवढेच शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले. डोळ्यांतून अश्रु ढाळून त्यांनीं शिवबाला भावसुमनांजलि वाहिली.

पण शिवबा गेला नि स्वतःच्या जीवनांतला राम गेल्यासारखें त्यांना वाटलें. जणूं कांहीं शिवरायासाठींच त्यांचा अवतार होता. तो गेला नि आपलें अवतारकार्य संपलें असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांनीं स्वतःला खोलींत कोंडून घेतलें. फिरणें सोडलें, अन्न सोडलें, फक्त दूधच तेवढें घेत. शिवबा गेले नि त्यांच्या तोंडाची चवच गेली. शिवबा गेले नि त्यांच्या डोळ्यांपुढचीं स्वप्नंच वितळलीं. त्यांना कशांतच गोडी वाटेनाशी झाली. शिवबा समर्थांचा श्वास होता. धातूंचीं पात्रें सोडून ते मातीचीं भांडीं वापरूं लागले. सर्व प्रकारेंच त्यांना उदासीनता आली. त्यांच्या आनंदवनभुवनांतला राजा गेला. मराठ्यांचा राजा गेला. खरोखरच भरून न येणारें नुकसान झालें होतें. आतां स्वामींनीं कुणाकरतां जगायचें ?

जन्मदात्या आईचा मृत्यु त्यांनीं सहन केला. त्यांचे बंधु गंगाधरस्वामी ऊर्फ श्रेष्ठी यांचा व पट्टशिष्या वेणाबाई यांचाहि अंत त्यांनीं पाहिला. त्यांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ शिष्य शिवाजी महाराजहि त्यांना सोडून गेले. आतां कुणासाठीं जगायचं ? किती जगायचं नि कशाकरतां ? आतां जगणं नको. आतां माहेरीं रामाकडे जावें असें त्यांच्या मनानें घेतलें.

शिवछत्रपतीनंतर संभाजी महाराज गादीवर आले.

संभाजीच्या राज्याभिषेकाचें निमंत्रण समर्थांना आलें होतें, पण ते गेले

नाहींत. " आपणांस येणें होत नाहीं " असें कळवून त्यांनीं दिनकर गोसावी यांना समारंभास पाठविलें.

## * चांफळचा निरोप

पुढील वर्षी म्हणजे शके १६०३ ला समर्थ चांफळ येथें रामनवमीच्या उत्सवाला गेले. १६०४ ची रामनवमी घडायची नव्हती हें त्यांनीं ओळखलें. आपल्या हातानें त्यांनीं रामाच्या पाळण्याची शेवटची दोरी ओढली. सकाळीं पाळण्यांतल्या रामाला आपल्या गोड आवाजानें भूपाळी म्हणत उठविलें,

उठीं उठीं बा रघुनाथा । विनवी कौसल्या माता ।
प्रभात झालीसे समस्ता । दाखवी आतां श्रीमुख ॥
माझा जिवींचा जिव्हाळा । दीनबंधू दीनदयाळा ।
भक्तजनांचिया वत्सला । देई दयाळा दर्शन ॥

हनुमानजयंतीपर्यंत समर्थ चांफळ येथें रामाची सेवा करीत होते. तेथून निघतांना स्वहस्तें उभारलेल्या त्या राममंदिरांतील रामाचा त्यांनीं अखेरचा निरोप घेतला. जातांना ते म्हणाले,

" हा देह निर्माण करून सेवा केली ती घेतलीत. पुढें जे आपली सेवा करतील त्यांचेंहि कल्याण व्हावें. या संप्रदायाचा श्रीस अभिमान आहेच.

रामा कृपा बहुत असों देणें । आम्ही धन्य जाहालों तुझे गुणें
रामा गोड लागती तुझ्या गोष्टी । हर्षे गुदगुल्या होताती पोटीं "

चांफळची भैरवी संपवून समर्थ पुनः सज्जनगडावर आले.

याच वर्षी मार्गशीर्ष महिन्यांत कल्याणस्वामी डोमगांवहून स्वामींच्या दर्शनाला गडावर आले तेव्हां दासबोधाचा विसावा दशक त्यांच्याकडून त्यांनीं लिहून घेतला

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम.............................. दि: ..........................
क्रमांक .............................. नों. दि: ..........................

# शिवरायाचें आठवावें रूप

शिवाजी महाराजांच्या निधनानें समर्थ उदास झाले होतेच. त्यांतच संभाजी महाराजांनीं चालविलेल्या स्वराज्यांतील अत्याचारांमुळें त्यांत आणखीनच भर पडली. स्वराज्याचे एक एक आधारस्तंभ संभाजीनें क्रूरपणानें नष्ट करण्याचा सपाटा चालविला होता. बाळाजी आवजीला त्यांनीं हत्तीच्या पायांखालीं दिला. अण्णाजी दत्तो, विठोजी फर्जंद ह्यांना चुन्याच्या भट्टींत चिंदून मारलें. समर्थांच्या कानीं ही बातमी आली तेव्हां समर्थ म्हणाले,

" शिवाजी महाराजांच्या पोटीं असा पुत्र जन्माला यावा ना ! कालाय तस्मै नमः " नंतर त्यांनीं संभाजीला सूचनावजा आशीर्वादात्मक पत्र पाठविलें :

" शंभूराजे,

दुश्चितपणा सोडून येकांतांत तजवीजा करीत बसावें. उग्रस्थिति टाकून जरा सौम्यपणा धरावा. परहिताची चिंता वहावी. कारभाऱ्यांचे अपराध क्षमा करून त्यांना सुखी करून कामाला लावावें. पाटांतील पाणी जसें तुंबून उपयोगी नाहीं त्याप्रमाणें मुत्सद्दी व कार्यकर्ते एके ठिकाणीं डांबून राहिले तर घातक. राज्यकारभाराच्या प्रवाहांत ते मिसळले पाहिजेत. वडिलार्जित मिळकतीसाठीं आपआपसांत भांडत बसल्यास शत्रूचें फावेल. यास्तव यादवी मिटवून मोठ्या धैर्यानें व दूरदर्शीपणानें महत्कार्यें हातीं घ्यावींत. राग अगदींच नाहींसा करावा असें नाहीं, पण समयप्रसंग ओळखून तरी वागावें. सगळ्या प्रजेस प्रेमानें वागवून सुखी करावें. म्लेंच्छांचा बींमोड करून जिकडे तिकडे

महाराष्ट्र राज्य करावें. म्हणजे तुमची कीर्ति वडिलाप्रमाणें दिवसें-दिवस वाढत जाईल. तुमचा वारसा मोठा आहे. जबाबदारी मोठी आहे. फार काय लिहावें ... ...

शिवरायासी आठवावें । जीवित्व तृणसमान करावें ।
येहलोक परलोकीं तरावें । कीर्तिरूपें ॥
शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा साक्षेप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ॥
शिवरायाचें कैसें बोलणें । शिवरायाचें कैसें चालणें ।
शिवरायाची सलगी देणें । कैसें आहे ॥
सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्य साधावया लगबग । तैसी करावी ॥
आहे तितकें जतन करावें । पुढें आणिकें मिळवावें ।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ॥
लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥
त्याहून करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष ।
याउपरी आतां विशेष । काय लिहावें ? ॥

राजे संभाजी, आपल्या वडिलांचें चरित्र म्हणजे शिवशक्तीचा एक महान मंत्रच आहे."

संभाजीनें तें पत्र आदरपूर्वक स्वीकारलें. त्याच्यावर विचार करून त्याला मान दिला व त्यानंतर शिवाजीच्या मृत्यूनंतरच्या चौकशा आणि अमानुष शिक्षा थांबल्या.

★ ★ ★

# मृत्यु न म्हणे हा संत

माघ महिन्याच्या प्रारंभालाच समर्थांची प्रकृति काळजी करण्याइतकी बिघडली. कुणी तरी सुचविलें, "सज्जनगडापेक्षां चांफळची हवा बरी." समर्थ म्हणाले, "आतां दुसरीकडे जाणें नाहीं. कांहीं जागा मनाला विलक्षण ओढ लावतात. ही जागा अशीच आहे. देवाच्या अस्तित्वाची जाणीव मला खरोखर इथूनच होते. आतां जीवनग्रंथांचें शेवटचें पान इथेंच मिटायचें."

उद्धव आणि अक्का नित्य समर्थांजवळ असत. त्या दोघांखेरीज त्यांच्या जवळ ते कुणाला येऊं देत नसत. संभाजीराजे भेटून गेल्यावर समर्थांनीं शेवटची निरवानिरव सुरू केली. आपल्याजवळचें जें कांहीं वस्त्रपात्र, भांडीं-कुंडीं व इतर वस्तु होत्या त्या सर्वांची यादी करून त्या सर्व वस्तु त्यांनीं देवाच्या नांवें लिहून दिल्या. कांहीं वस्त्रपात्र, भांडींकुंडीं शिष्यांस व मठांस दिलीं. सर्वसंगपरित्याग करून ते रामचिंतनांत गढून गेले. त्यांच्या व्याधिशमनार्थ औषधोपचार व जपजाप्य अनुष्ठान करण्याची परवानगी समर्थांजवळ त्यांच्या शिष्यांनीं मागितली. पण समर्थांनीं ती दिली नाहीं. ते म्हणाले,

"आतां कांहीं नको. आपला ऋणानुबंध संपला आहे."

आणि हातांतली माळ पुनः रामजप जपूं लागली.

*

पूर्वीं समर्थ व्यंकोजीराजाच्या निमंत्रणावरून तंजावरास गेले असतांना तेथें त्यांनीं राम, लक्ष्मण, सीता व मारुति अशा चार मूर्ति करण्याबद्दल आज्ञा केली. समर्थ त्या मूर्ति केव्हां येतील म्हणून सारखी वाट पहात

होते. जणूं त्यांच्याकरतांच त्यांनीं जीव धरला होता. रामरायांनीं भक्ताला फार वेळ ताटकळत ठेवलें नाहीं. माघ वद्य पंचमीला मूर्ति गडावर येऊन पोहोंचल्या. समर्थांनीं मूर्तींच्या नेत्रांवरील मेण काढलें व मूर्तींची स्थापना केली. समर्थांच्या हातचें हेंच शेवटचें कार्य !

माघ शुद्ध षष्ठीचे दिवशीं सर्व शिष्यमंडळींना जवळ बोलावून समर्थांनीं उपदेश केला. समर्थ म्हणाले,

" आतां आम्ही थोड्या दिवसांचे सोबती आहोंत. सांगतों तें शांतपणें ऐकून घ्यावें. नित्य नूतन हिंडावें. भिक्षा मागून योगक्षेम करावा. भिक्षा मागण्यांत कमीपणा नाहीं. फक्त ती निव्वळ पोट भरण्याचें साधन नसावें. पैसे घेऊन कीर्तन करूं नये. कामक्रोध रामार्पण करावेत. परद्रव्याला स्पर्शहि करूं नये. वैराग्यानें विवेकयुक्त राहावें. जें बोलावें तें स्वतः करून दाखवावें. सदासर्वकाळ रामरायाची आठवण ठेवून आपला मोठेपणा त्याच्या चरणीं अर्पण करावा.

दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करुनी ॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊनी जनांस सिकवावे ।
उदंड समुदाय करावे । परी गुप्तपणें ॥
मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसे जनांसी सिकवावें । हळुहळु ॥
महंती सुखाची नाहीं । तेथें दुःख उदंडहि ।
उदंड दुःख लोकांचें । एकतां ऊर फुटतो ॥

सांगतां सांगतां समर्थांना गहिंवरून आलें. उद्धव कळवळून म्हणाला,

" स्वामी, तुम्ही आम्हांला सोडून जाणार ? "

" हो; जाणार नि गेलेंच पाहिजे. ह्या शरीराला मृत्यु अटळ आहे. "

" पण— " अक्का पदरानें डोळे पुशीत म्हणाल्या. त्यांना पुढें बोलायचें होतें, पण दुःखानें त्यांच्या तोंडून शब्द उमटेनात. समर्थच पुढें म्हणाले,

" नाहीं अक्का, आतां पण बिण कांहीं नाहीं. संकल्प झाला म्हणजे झाला. आतां मृत्यूला सामोरें जाऊनच मृत्युंजय व्हावयाचें. "

नंतर समर्थांनीं मृत्यूवर सुंदर निरुपण केलें :

नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गती ॥
कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देशीं विदेशीं ॥
सरतां संचिताचे शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।
भरतां न भरतां निमिष । जाणों लागे ॥
मृत्यु न म्हणे कीं हा क्रूर । मृत्यु न म्हणे हा झुंजार ।
मृत्यु न म्हणे संग्रामशूर । समरांगणीं ॥
मृत्यु न म्हणे कीं हा कोपी । मृत्यु न म्हणे हा प्रतापी ।
मृत्यु न म्हणे उग्ररूपी । महांखळ ॥
मृत्यु न म्हणे हा बलाढ्य । मृत्यु न म्हणे हा धनाढ्य ।
मृत्यु न म्हणे आढ्य । सर्वगुणें ॥
मृत्यु न म्हणे विख्यात । मृत्यु न म्हणे श्रीमंत ।
मृत्यु न म्हणे हा अद्‌भुत । पराक्रमी ॥
मृत्यु न म्हणे हा भूपति । मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती ।
मृत्यु न म्हणे हा करामती । कैवाड जाणें ॥
मृत्यु न म्हणे हा मुद्राधारी । मृत्यु न म्हणे हा व्यापारी ।
मृत्यु न म्हणे परनारी । राजकन्या ॥
मृत्यु न म्हणे कार्याकारण । मृत्यु न म्हणे वर्णावर्ण ।
मृत्यु न म्हणे हा ब्राह्मण । कर्मनिष्ठ ॥
मृत्यु न म्हणे पुराणिक । मृत्यु न म्हणे हा वैदिक ॥
मृत्यु न म्हणे हा याज्ञिक । अथवा जोसी ।
मृत्यु न म्हणे शास्त्रज्ञ । मृत्यु न म्हणे वेदज्ञ ।
मृत्यु न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणें ॥
मृत्यु न म्हणे रागज्ञानी । मृत्यु न म्हणे तालज्ञानी ।
मृत्यु न म्हणे तत्त्वज्ञानी । तत्त्ववेत्ता ॥
मृत्यु न म्हणे योगाभ्यासी । मृत्यु न म्हणे संन्यासी ।
मृत्यु न म्हणे काळासी । वंचू जाणें ॥
मृत्यु न म्हणे हा गोसावी । मृत्यु न म्हणे हा तपस्वी ।
मृत्यु न म्हणे हा मनस्वी । उदासीन ॥
मृत्यु न म्हणे हा संत । मृत्यु न म्हणे हा महंत ।

मृत्यु न म्हणे हा गुप्त । होत असे ॥
श्रोतीं शोक न करावा । हा मृत्युलोक सकळांस ठावा ।
उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्युपंथें ॥

समर्थांना बोलावणें आलें. काळानें नेत्रपल्लवी केली. चार दिवसांनंतर माघ वद्य नवमी उजाडली. सकाळचीं उन्हें वाढीला लागलीं. शिष्यांना जवळ बोलावून ते म्हणाले,

रघुकुळटिळकाचा वेळ सन्निध आला
तदुपरी भजनाचा पाहिजे संग केला ॥

पुढें समर्थांच्या तोंडून शब्द उमटेनात. मग पुढचे चरण उद्धव गोसाव्यांनीं पुरे केले.

अनुदिनीं नवमी ही मानसीं आठवावी
परम लगबगीनें कार्यसिद्धि करावी ॥

समर्थांनीं त्याची पाठ थोपटली.

" कल्याणावांचून सर्व शिष्यमंडळींना मला भेटायला बोलवा. " समर्थांनीं सांगितल्यावरून सर्वांना पत्रें गेलीं होतीं. भेटायला येणाऱ्यांनीं सज्जनगड गजबजून गेला. सर्वांचीं मनें खिन्न होतीं तरी नामघोषानें सज्जनगड दुमदुमून गेला.

भर दुपार. बारा वाजण्याची वेळ. सूर्य माथ्यावर आला होता. उन्हें रणरणत होतीं. झाडांचे सांगाडे स्वस्थ उभे होते.

समर्थ पलंगाखालीं उतरून पांढऱ्या घोंगडीवर सिद्धासन घालून बसले. ज्या स्थितींत आलों त्या स्थितींत जावयाचें म्हणून त्यांच्या अंगावर कांहींहि वस्त्र नव्हतें. उत्तर दिशेकडे त्यांनीं तोंड वळविलें, रघुटिळकावर दृष्टि लावून ध्यान धरलें, चित्त एकाग्र केलें. समोरच्या राममूर्तीकडे पाहून ते म्हणाले,

आज्ञेप्रमाणें परमार्थ । केला जाण म्यां यथार्थ
आतां देहाचा कंटाळा । आला असें जी दयाळा
आतां एकचि मागणें । कृपा करोनियां देणें
ज्याची दर्शनाची इच्छा । त्याची पुरवावी आस्था ॥

जयजय रघुवीर समर्थ !

लोकांच्या डोळ्यांतील अश्रु पाहून ते म्हणाले,

"आजपर्यंत जवळ राहून आमच्या जाण्याच्या मंगलप्रसंगीं असे कष्टी होता ? हेंच का आमच्या शिकवणुकीचें फळ ?"

अक्का म्हणाल्या,

"आम्ही दुबळीं माणसं. ह्यापुढें आपल्या सगुण मूर्तीचें दर्शन होणार नाहीं म्हणून वाईट वाटतें."

समर्थ म्हणाले,

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणीं
परी मी आहे जगज्जीवनीं । निरंतर ॥
आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध
असतां न करावा हा खेद । भक्तजनीं ॥

ज्यांना ज्यांना म्हणून आम्हांला पहावेसें वाटेल, आमच्याशीं बोलावेसें वाटेल, त्यांनीं आमचा दासबोध ग्रंथ उघडून पहावा. त्यांत त्यांना आमचें दर्शन घडेल. आमच्या दासबोध ग्रंथांतून जिज्ञासूंना आम्ही जरूर भेटूं. जयजय रघुवीर समर्थ !

उद्धव गोसावी, केशव गोसावी व श्रीराम गोसावी दाराजवळ उभे होते. अक्का फक्त त्यांच्याजवळ होत्या. तो शेवटचा क्षण आला. महाराष्ट्राच्या महाप्रस्थानाचा तो क्षण ! जितका उदात्त तितकाच गंभीर !!

हाताची अंजुळी जोडून समर्थ अतिशय करुणपणें म्हणत होते :

कोणा भोगाची चिंता । कोणा रोगाची चिंता
कोणा त्यागाची चिंता । कोणा योगाची चिंता
कोणा नेमाची चिंता । कोणा नामाची चिंता
कोणा प्रेमाची चिंता । मला रामाची चिंता
मला रामाची चिंता ......

नंतर

श्रीराम ! श्रीराम !! श्रीराम !!!

असा तीन वेळां नामोच्चार करून स्वामींनीं आपला देह रामाच्या चरणीं ठेवला. त्यांच्या मुखांतून एक दिव्य ज्योत निघून ती रामाचे मूर्तींत समाविष्ट झाली. एक पवित्र बिंदु विश्वाच्या पसाऱ्यांत मिसळून गेला. रामरायानीं आपल्या परम भक्ताला आपल्याजवळ बोलावून त्याला चिरशांति दिली. समर्थ

गेले नि पावित्र्याची गंगोत्रीच आटली. एका पवित्र नि परोपकारी जीवनाचा शेवट झाला. जनसमुदाय दुःखांत बुडाला. सज्जनगडहि थरारला. प्रत्येकजण रामनाम घेत होता.

श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम

उद्धव गोसाव्यांनीं आपला शोक आवरला. ते पुढील व्यवस्थेस लागले. त्यांना आठवण झाली.

— मठाचे उत्तरेस एक मोठा खड्डा होता. शिवाजी राजे तो बुजवून घेत असतांना समर्थ म्हणाले होते, "बुजवूं नका. याचें पुढें काम पडेल." समर्थांनीं तो खड्डा बुजवूं दिला नव्हता. समर्थांच्या बोलण्यांतील गर्भित हेतु लक्षांत घेऊन त्यांची चिता त्या खड्ड्यांत रचण्यांत आली. शास्त्रोक्त विधीनें बेल, तुळस, चंदनादि काष्टें, कापूर घालून देह दहन केला.

ही गोष्ट शके १६०३ दुर्मुखनाम संवत्सरीं माघ वद्य नवमीस घडली. तिसऱ्या दिवशीं रक्षा काढून घेऊन त्या जागीं एक चिरा बसविली गेली. मंडळी दर्शनास आली असतां त्या चिऱ्यांतून शरीरवाणी निघाली :

माझी काया गेली हें खरें । परि मी आहे जगदाकारें ।
ऐका स्वहीत उत्तरें । सांगेन तीं ॥
नका करूं खटपट । पहा माझा ग्रंथ नीट ।
तेणें सायुज्याची वाट । ठाई पडे ॥
राहा देहाची विसरें । वर्तू नका वाईट बरें ।
तेणें मुक्तीचीं हीं द्वारें । चोजवीती ॥
रामदास म्हणे । सदास्वरूपीं अनुसंधान ।
करा श्रीरामाचें ध्यान । निरंतर ॥
जयजय रघुवीर समर्थ ॥

शरीर गेलें तरी आत्मा अजूनहि रामाचीच भक्ति सांगत होता. जातांना ते म्हणालेच होते ...

मला रामाची चिंता ! मला रामाची चिंता !! मला रामाची चिंता !!!

★ ★ ★

" आजपर्यंत जवळ राहून आमच्या जाण्याच्या मंगलप्रसंगीं असे कष्टी होता ? हेंच का आमच्या शिकवणुकीचें फळ ? "

अक्का म्हणाल्या,

" आम्ही दुबळीं माणसं. ह्यापुढें आपल्या सगुण मूर्तीचें दर्शन होणार नाहीं म्हणून वाईट वाटतें. "

समर्थ म्हणाले,

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणीं
परी मी आहे जगज्जीवनीं । निरंतर ॥
आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध
असतां न करावा हा खेद । भक्तजनीं ॥

ज्यांना ज्यांना म्हणून आम्हांला पहावेसें वाटेल, आमच्याशीं बोलावेसें वाटेल, त्यांनीं आमचा दासबोध ग्रंथ उघडून पहावा. त्यांत त्यांना आमचें दर्शन घडेल. आमच्या दासबोध ग्रंथांतून जिज्ञासूंना आम्ही जरूर भेटूं. जयजय रघुवीर समर्थ !

उद्धव गोसावी, केशव गोसावी व श्रीराम गोसावी दाराजवळ उभे होते. अक्का फक्त त्यांच्याजवळ होत्या. तो शेवटचा क्षण आला. महाराष्ट्राच्या महाप्रस्थानाचा तो क्षण ! जितका उदात्त तितकाच गंभीर !!

हाताची अंजुळी जोडून समर्थ अतिशय करुणपणें म्हणत होते :

कोणा भोगाची चिंता । कोणा रोगाची चिंता
कोणा त्यागाची चिंता । कोणा योगाची चिंता
कोणा नेमाची चिंता । कोणा नामाची चिंता
कोणा प्रेमाची चिंता । मला रामाची चिंता
मला रामाची चिंता ......

नंतर

श्रीराम ! श्रीराम !! श्रीराम !!!

असा तीन वेळां नामोच्चार करून स्वामींनीं आपला देह रामाच्या चरणीं ठेवला. त्यांच्या मुखांतून एक दिव्य ज्योत निघून ती रामाचे मूर्तींत समाविष्ट झाली. एक पवित्र बिंदु विश्वाच्या पसाऱ्यांत मिसळून गेला. रामरायानीं आपल्या परम भक्ताला आपल्याजवळ बोलावून त्याला चिरशांति दिली. समर्थ

गेले नि पावित्र्याची गंगोत्रीच आटली. एका पवित्र नि परोपकारी जीवनाचा शेवट झाला. जनसमुदाय दुःखांत बुडाला. सज्जनगडहि थरारला. प्रत्येकजण रामनाम घेत होता.

श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम

उद्धव गोसाव्यांनीं आपला शोक आवरला. ते पुढील व्यवस्थेस लागले. त्यांना आठवण झाली.

— मठाचे उत्तरेस एक मोठा खड्डा होता. शिवाजी राजे तो बुजवून घेत असतांना समर्थ म्हणाले होते, "बुजवूं नका. याचें पुढें काम पडेल." समर्थांनीं तो खड्डा बुजवूं दिला नव्हता. समर्थांच्या बोलण्यांतील गर्भित हेतु लक्षांत घेऊन त्यांची चिता त्या खड्डयांत रचण्यांत आली. शास्त्रोक्त विधीनें बेल, तुळस, चंदनादि काष्ठें, कापूर घालून देह दहन केला.

ही गोष्ट शके १६०३ दुर्मुखनाम संवत्सरीं माघ वद्य नवमीस घडली. तिसऱ्या दिवशीं रक्षा काढून घेऊन त्या जागीं एक चिरा बसविली गेली. मंडळी दर्शनास आली असतां त्या चिऱ्यांतून शरीरवाणी निघाली :

माझी काया गेली हें खरें । परि मी आहे जगदाकारें ।
ऐका स्वहीत उत्तरें । सांगेन तीं ॥
नका करूं खटपट । पहा माझा ग्रंथ नीट ।
तेणें सायुज्याची वाट । ठाईं पडे ॥
राहा देहाची विसरें । वर्तू नका वाईट बरें ।
तेणें मुक्तीचीं हीं द्वारें । चोजवीती ॥
रामदास म्हणे । सदास्वरूपीं अनुसंधान ।
करा श्रीरामाचें ध्यान । निरंतर ॥
जयजय रघुवीर समर्थ ॥

शरीर गेलें तरी आत्मा अजूनहि रामाचीच भक्ति सांगत होता. जातांना ते म्हणालेच होते …

मला रामाची चिंता ! मला रामाची चिंता !! मला रामाची चिंता !!!


★ ★ ★

# गुरु हा संतकुळीचा राजा

कल्याणस्वामींना नंतर पत्र पाठविण्यांत आलें. सज्जनगडावरून आलेल्या पत्रास कल्याणस्वामींनीं नमस्कार करून वाचलें. त्यांत दिलेल्या वेळीं त्याच दिवशीं समर्थ त्यांना डोमगांवीं भेटून गेले होते. आणि पत्रांत तर ही अशी बातमी ! मग समर्थ भेटून गेले हा काय भास होता ? तें काय स्वप्न होतें ? का पत्रांतली बातमी खोटी होती ? थक्क होऊन, बेचैन होऊन कल्याणस्वामी लागलीच सज्जनगडाच्या वाटेला लागले. कांहीं तरी गफलत असेल असें त्यांना वाटलें. पण अमंगल बातम्या खोट्या ठरत नाहींत. कल्याणस्वामी गडावर आले तर समर्थ त्यांना दिसले नाहींत. हुर्मुजी रंगाची कौपीन नि शिरोवेष्टन घातलेले समर्थ त्यांना दिसले नाहींत. कपाळावर आवाळूं असलेले व बोलतांना मंदस्मित करणारे समर्थ त्यांना दिसले नाहींत. आपला आजानुबाहू उंच करीत "केव्हां रे आलास कल्याणा ?" म्हणून येणारी स्वामींची ती नित्यपरिचित गंभीर हांक त्यांना ऐकूं आली नाहीं. ते उदास झाले.

आपण नसतांना गुरुमाऊलीनें जावें म्हणजे काय ? त्यांच्या गुरुभक्तीला तें आव्हानच होतें. समाधीच्या जागीं जाऊन त्यांनीं समाधीला घट्ट मिठी मारली. अन्नपाणी न घेतां समाधीच्या चिर्‍याजवळ धरणें धरलें. त्यांचा शोक कांहीं केल्या आवरेना. त्या आक्रोशानें समाधि पान्हावली. शिष्याच्या भेटीसाठीं समाधि दुभंगली. प्रकृतिधर्म सोडून स्वतः समर्थांना त्यांचें सांत्वन करण्यासाठीं यावें लागलें. दुभंगलेल्या समाधींतून बाहेर येऊन स्वामींनीं त्यांना दर्शन दिलें.

"कल्याणा, तुझ्यासारख्या ज्ञानी मनुष्याला हा शोक शोभतो का ?"



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ कॉ. दि ....................

९८३५८ दा. क्र.

"आपण सर्वांना कळविलेंत नि मलाच तेवढें वगळलेंत. मलाच फक्त कळवूं नका म्हणून सांगितलेंत. सांगा, असा कोणता अपराध केला मी म्हणून आपल्या अंतीम दर्शनाला अंतरलों?"

"माझ्यावर प्रेम करण्याचा!"

"आपल्यावर प्रेम करण्याचा अपराध?"

"होय, कल्याणा. माझ्यावर तूं इतकें प्रेम केलेंस कीं माझा अंतकाळ तुझ्यानें पहावला नसता. देह ठेवल्यावरहि आम्हांला तूं प्रगट होण्यास भाग पाडलेंस. त्यावेळीं हजर असतास तर आम्हांला देह तरी ठेवूं दिला असतास का?"

कल्याणाचें समाधान करून समर्थ अदृश्य झाले. समाधि पूर्ववत् झाली. समाधीवर तेरा अक्षरी मंत्र उमटला.

श्रीराम जयराम जयजय राम । श्रीराम जयराम जयजय राम

कल्याणांनीं अश्रूंचीं फुलें समाधीवर वाहिलीं. समाधीभोंवतीं वारा घोंगावूं लागला. दुभंगलेल्या समाधींतून प्रगट होऊन समर्थांनीं त्यांच्या लाडक्या शिष्याला भेट दिली त्याची साक्ष समाधीवर असलेली चीर आजहि देते. धर्माचा नि स्वराज्याचा प्रसार करणाऱ्या त्या विरागी बैराग्याच्या समाधीवर धर्मवीर संभाजीनें बांधलेलें मंदिर आजहि तुम्ही सज्जनगडावर पाहूं शकतां.

"मला विचारल्याशिवाय समर्थांच्या अस्थि काढूं नका." म्हणून कल्याणस्वामींनीं निक्षून सांगितलें असतांहि आतां अस्थि किती दिवस ठेवावयाच्या असा विचार करून श्रीसमर्थांच्या अस्थि चांफळ येथून काशीस नेण्यासाठीं वृन्दावनांतून काढण्याची बुद्धि केशवस्वामींना झाली. तो दिवस म्हणजे शके १६३६ चा अधिक आषाढ शुद्ध १३.

वृन्दावनांतून समर्थांच्या अस्थि निघाल्या नि त्याच वेळीं कल्याणस्वामींनीं देह ठेवला. केशवस्वामींना हें कळलें तेव्हां ते फार कष्टी झाले. कल्याणाच्या बोलण्यांतील खरें रहस्य आतां त्यांना समजलें. गुरुशिष्यांच्या अस्थि एकत्र घेऊन ते काशीस निघाले.


महाराष्ट्रांतील सूर्य मावळलाच होता. आतां रेंगाळणारा प्रकाशहि नाहींसा झाला!

जय

REFBK-0014364
REFBK-0014364

शुकासारखें पूर्ण वैराग्य ज्याचें
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें
कवी वाल्मिकीसारखा मान्य ऐसा
नमस्कार माझा श्रीसद्गुरु रामदासा !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों. दि: ........................





डोंबिवली येथील श्री. स. कृ. जोशी यांनीं गेल्या कांहीं वर्षांत संतचरित्र व संतसाहित्य या विषयांवर अत्यंत रसाळ व उद्‌बोधक लेखन करून नांव मिळविलें आहे. ताटी उघडा ज्ञानेश्वरा, तुका झालासे कळस, स्वकरें चंदन घाशी, पंढरपुरा नेईन गुढी, कळसाची चमक इत्यादि पुस्तकें आधींच लोकप्रिय झालीं आहेत.

श्री. जोशी हे एक चांगल्या, प्रतिष्ठित व सुसंस्कारित घराण्यांतील तरुण प्रापंचिक आहेत. घरच्या चांगल्या संस्कारांचा परिपाक आतां त्यांच्या चालण्या बोलण्यातून व लिखाणांतून प्रगट होऊं लागला आहे. लहानपणापासून संतवाङ्मयाचें श्रवण, वाचन, मनन, चिंतन त्यांना घडलें आहे आणि त्याचा सुंदर आविष्कार आज त्यांच्या वाङ्मयांतून होत आहे.

श्री. जोशी यांची भाषा प्रसन्न, मोकळी व रसयुक्त आहे. हवें तें वातावरण उभें करण्यास ती समर्थ आहे. शब्द आणि अर्थ जिथें हातांत हात घालून चालतात अशी ही एका सिद्धहस्त कथालेखकाची कलाकृति आहे हें ह्या पुस्तकांतहि पानोपानीं प्रत्ययास येतें. ● ● ●